# आभारपत्र

या अभ्यासाचे संपूर्णतः अंत:कारणाने योगदान दिलेल्या यशस्वी समाप्ती असलेल्या सर्व लोकांबद्दल धन्यवाद आणि स्नेह व्यक्त करण्याचा मला आनंद होत आहे. पहिल्यांदा मी इकोनेट संस्था,पुणे यांची ऋणी आहे कि ज्यांनी समावेशक सामाजिक विकास संस्था,औंध यांना पहिल्यांदा दुष्काळी भागातील महिलांच्या प्रश्नावर संशोधन करण्याची संधी दिली.

हा अभ्यास यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी समावेशक संस्थेचे विश्वस्त,मा.प्रा.गणेश पांढरे पुणे.विद्यापीठ यांनी केलेले मार्गदर्शन,परिवेक्षण आणि अभ्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार व्यक्त करते.तसेच मा.डॉ.मनिषा शिरोडकर समाजकार्य महाविद्यालय जकातवाडी ,सातारा यांचे ही मोलाचे मार्गदर्शन मिळाले.त्यांचे ही मी मनापासून आभार मानते.

तसेच माझ्या मित्रमंडळीतील राजू भोसले,एकता पवार,कोमल पवार, सायली पवार,अमित एकल,तसेच समावेशक संस्थेचे कार्यकर्ते मा.अरुण जावलीकार मा.गौरी सोनवणे पाणी फौंडेशनमध्ये काम करणारे मित्र मंडळी यांनी केलेले सहकार्य आणि मदत त्यांचे ही मी मनापासून आभार व्यक्त करते.

विशेष संशोधनासाठी महत्वपूर्ण असणारा टप्पा म्हणजे माहिती संकल प्रश्नावली भरून दिल्या त्या आमच्या गावपातळीवरील स्वयंसेविका प्रनया माने,(डिस्कळ) प्यारण सिक्कलगार,(खटाव) सुवर्णा सरगर,(गुरसाळे) वैशाली पवार(मायणी) माधुरी यादव (औंध) सुरेखा पवार (पुसेसावळी) इतर सर्व भटके-विमुक्त समाज बांधव आणि शासकीय अधिकारी यांनी ही मोलाचे वेळ आणि सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचे ही आभार व्यक्त करते.

ठिकाण :औंध

दि: ३१/५/१७

आपली विश्वासू

शैला यादव

(अध्यक्ष,समावेशक संस्था,औंध)

## संशोधन विषय :- " खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटक्या - विमुक्त महिलांच्या सद्यस्थितीचा अभ्यास."

## प्रकरण १ ले. – प्रस्तावना

### अनुक्रमणिका


| अ.क्र.नं. | तपशील | पान नं. |
|---|---|---|
| १ | **प्रस्तावना** | २ – ७ |
| १.१. | प्रस्तावना | २ – ३ |
| १.२. | महाराष्ट्रातील दुष्काळ | ३ – ६ |
| १.३. | खटाव तालुक्यातील दुष्काळाचे स्वरुप | ६ – ७ |


## १.१. प्रस्तावना:-

भारतास स्वातंत्र्य मिळुन ६५ वर्षे झाली. अकरा पंचवार्षीक योजना झाल्या, जेट विमाने, अंतराळयाने आली, संगणक, भ्रमणध्वनी आले. दळणवळण आणि वाहतुकीची अत्याधुनिक साधने उपलब्ध झाली. हरित क्रांतीने देशातील धान्याची गुदामे ओसंडली. धवलक्रांतीचे दुधाचे पाट वाहू लागले. चीज-आयस्क्रीम- चॉकलेट दुकाने सजली. मात्र याचवेळी देऊळगावमध्ये, असवलीमध्ये, निमगाव भोगीमध्ये तसेच माण – खटाव मध्ये आणि अशाच हजारो खेड्यांमध्ये गरिबांना खायला अन्न नाही, प्यायला पाणी नाही, लोकांना गावे सोडून रोजगाराच्या शोधात वणवण फिरावे लागत आहे. महाराष्ट्रात धरणे व विहिरी यांची संख्या मोठया प्रमाणात वाढूनही असे का होते? याच्या मुळाशी आर्थिक- राजकीय कारणे आहेत,आणि त्यामुळे पाणी व जमीन या निसर्ग संपत्तीचा गैरवापर व नासधूस चालू आहे. याचा अर्थ सध्याचा पाण्याचा दुष्काळ हा मुख्यतः शासननिर्मीत दुष्काळ आहे. तेव्हा सिंचन विकास आणि पाण्याचे वाटप याबाबतचे आतापर्यंतचे धोरण नेमके कुठे चुकले आहे व दुष्काळ हटवायचा असेल तर आर्थिक –राजकीय आणि तंत्रवैज्ञानिकधोरणात बदल करायला पाहिजेत.

ब्रिटीशांच्या सत्ता काळामध्ये लहान मोठे २५ हून अधिक दुष्काळ पडले होते. १७७० च्या बंगालच्या दुष्काळाने प्राण गमावणाऱ्यांची संख्या ३५ ते ४० लाख होती. दुष्काळाचा प्रश्न महाराष्ट्रास, भारतास नव्हे तर आफ्रिका, लॅटीन अमेरिका यामधील अनेक देशांना ग्रासून आहे. आज जगातील ५० कोटी जनता कुपोषित आहे, त्यातील २० कोटी जनता भारतात आहे. म्हणून दुष्काळामुळे एवढया मोठया  गंभीर समस्येला देशाला सामोरे जावे लागत आहे, म्हणून या

परिस्थितीवर तसेच दुष्काळावर मात करण्यासाठी  या विषयाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## १.२. महाराष्ट्रातील दुष्काळ :-

महाराष्ट्रात १९६२ मध्ये सर्वात मोठा दुष्काळ पडला होता. त्यानंतर सर्वांच्या आठवणीत राहणारा दुष्काळ म्हणजे १९७२ चा दुष्काळ प्रत्येकाला आठवण करून देणारा आहे. १९७२ च्या दुष्काळात महाराष्ट्रात पावसाची नोंदलेली सरासरी ५२३ मी.मी. होती आणि राज्याचे १००% क्षेत्र अवर्षण पिडीत झाले होते. गेल्या १२५  वर्षात अशीच बिकट परिस्थिती १८७७ ला १८९९ ला आणि १९१८ ला निर्माण झाली होती. असे उपलब्ध माहितीवरून कळते.

दुष्काळाच्या प्रश्नाचे गांभीर्य दिवसेंदिवस वाढत आहे. २०११ साली सरासरीएवढा पाऊस पडूनही डिसेंबर २०११ पासून पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढत गेली.२०१२-१३ साली पाऊस सरासरीच्या ९२% होता आणि सर्वात कमी पाऊस ४८% जालना जिल्यात झालेला होता. अशीच अवघड परिस्थिती थोडयाफार फरकाने नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिकचा पूर्व भाग, नगर, सोलापूर, सांगली, औरंगाबाद, बीड,उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, वाशीम, बुलढाण्याचा पश्चिम भाग, पुणे, पूर्व सातारा व सांगली भागात होता.पर्जन्यछायेत येणारा राज्याचा हा उत्तर-दक्षिण पट्टा ५०% भाग व्यापत आहे.

आपल्या देशाची पावसाची वार्षिक सरासरी ११५० मि.मी.आहे. त्यापैकी ७३% पाऊस १०० दिवसात कोसळून मोकळा होतो. हे पाणी साठवण्याची व्यवस्था आपण निर्माण करू शकलेलो नाही.पाण्याचे वितरण विषम आहे. शासकीय पातळीवर हा धोरणाचा दुष्काळ आहे, व समाजाची उदासीनता तेवढीच घातक आहे. वेगवेगळया अभ्यासातून असे दिसून येते की आपल्या देशाला पाऊस व हिमनग वितळून दरवर्षी ४हजार अब्ज घन मिटर पाणी मिळते. तरी देशातील तब्बल २० कोटी लोकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळू शकत नाही. पिण्याच्या पाण्याच्या दरडोई उपलब्धतेबाबत भारत जगात १०८ क्रमांकावर आहे इतकी भीषण परिस्थिती आहे. अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांच्या मते, ‘ माणसांची क्रयशक्ती कमी होते तेव्हा दुष्काळ निर्माण होतो.’ परंतु महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील लोकांची क्रयशक्ती चांगली आहे.

सलग तीन वर्षे राज्यात पाण्याचा साठा समाधानकारक झाला नाही.तरीही राज्यात पाण्याचे नियोजन करण्यात आले नाही. सरकारी/शासकीय योजना ग्रामीण भागात, दुष्काळग्रस्त भागात योग्यरीत्य, नियोजनपूर्वक राबविल्या जात नाहीत. सरकारी पातळीवरची अनास्था आणि उसासारख्या भरघोस पाणी पिणाऱ्या पिकांची जोमाने लागवड करण्यात आली. राज्यात ५३% नागरीकरण झाल्याने ६ कोटींहून अधिक जनता शहरात राहत आहे. शहरांना धरणांतून पाणीपुरवठा होत आहे. मागील तीन वर्षात २८ ते ३० टक्के पाणी बिगरसिंचनासाठी देण्यात आले आहे. यंदा राज्यातील धरणांतील पाणी केवळ पिण्यासाठीच राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याने शेती आणि

उद्योगांवर पाणीटंचाईचे तीव्र परिणाम होणार हे निश्चित आहे. राज्यात सध्या भूगर्भातील पाण्याची पातळी सरासरी २०० ते २५० फुटांवर गेली आहे. ही अत्यंत चिंतेची बाब मानली जाते. भूगर्भात १२० फुटानंतर प्रत्येक एक फुट पाणी मुरण्यासाठी चार महिने लागतात. या हिशेबाने २०० ते ३०० फुटांवर आज गेलेले पाणी किमान ७५ ते १०० वर्षे अगोदर मुरलेले असू शकते. या पातळीपेक्षा राज्यातील २४ तालुक्यांत १ मीटरने पाण्याची पातळी खालावली आहे. तर सहा तालुक्यांत पाण्याची पातळी तब्बल तीन मिटर म्हणजेच ११ फुट खोल गेली आहे तर २२ तालुक्यांत १ ते २ मीटरने पाण्याची पातळी खोल गेल्याचा निष्कर्ष भूजल सर्वेक्षणात काढण्यात आला आहे.

राज्यात १४९ तालुके कायम दुष्काळी आहेत. महाराष्ट्र शासनाने १६ ऑक्टोंबर २०१५ रोजी राज्यात ४०हजार गावांपैकी एकूण १४७०८ गावांत दुष्काळ जाहीर केला आहे. राज्यात १९७२ नंतर प्रथमच असा दुष्काळ जाहीर झाला आहे. ज्या गावांतील पैसेवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे त्या गावांचा दुष्काळी गावांत समावेश आहे.या वर्षी दुष्काळ जाहीर करणारे महाराष्ट्र हे दुसरे राज्य असून या आधी कर्नाटकने ऑगस्ट मध्ये राज्याचा दुष्काळ जाहीर केला आहे. महाराष्ट्राच्या एकूण २० जिल्ह्यांतील गावांचा दुष्काळी यादीत समावेश आहे. महाराष्ट्रातील सरासरी पावसाच्या जुन ते सप्टेंबर महिन्यात १८९ तालुक्यांमध्ये ७५% पेक्षा कमी पर्जन्यमान झाले आहे. राज्यात १४७०८ गावांची पैसेवारी ५०% पेक्षा कमी तर २४३४५ गावांची पैसेवारी ५०% पेक्षा जास्त आहे.

## महाराष्ट्रातील दुष्काळी गावांची जिल्हा निहाय संख्या :

| जिल्हा | गावसंख्या | जिल्हा | गावसंख्या |
|---|---|---|---|
| नाशिक | १५७७ | उस्मानाबाद | ८३७ |
| नांदेड | १५६२ | नंदुरबार | ८८५ |
| बीड | १४०३ | हिंगोली | ७०७ |
| औरंगाबाद | १३५३ | धुळे | ६१४ |
| लातुर | ९४३ | अ.नगर | ५३५ |
| जालना | ९६९ | सांगली | ३६३ |
| परभणी | ८४८ | सातारा | ३४३ |
| गडचिरोली | ३६७ | जळगाव | १२५ |
| पुणे | ७६ | अकोला | ५५ |
| नागपुर | १११ | यवतमाळ | २२ |

महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्यांत अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्याचे धोरण सरकारने १९९९ मध्ये हाती घेतले.यामध्ये २७९८ जल व मृद संधारणाचे प्रकल्प हाती घेण्यात आले.त्यासाठी ८१५ कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला. पण आजपर्यंत केवळ २४९.७१ कोटी इतकाच खर्च झालेला दिसुन येतो.तसेच दुष्काळ निर्मुलनासाठी विविध प्रकारच्या शासकीय योजना राबविल्या जात आहेत. उदा.- जलयुक्त शिवार योजना, आकस्मीक पाणीपुरवठा योजना, रोजगार हमी योजना, बंधारे घालुन पाणी अडवा,पाणी जिरवा योजना,

सुक्ष्म जलसिंचन योजना, एकात्मीक पाणलोट विकास योजना, विशेष घटक योजना, राष्ट्रीय पीक विमा योजना इ. अशा अनेक योजना दुष्काळग्रस्तांसाठी शासनाकडून राबविल्या जात आहेत. परंतु दुष्काळाचे दुष्टचक्र महाराष्ट्रातील जनतेसाठी संपल्याचे दिसुन येत नाही.

प्रस्तुत शोध निबंधात महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यामधील माण-खटाव तालुका कायमस्वरूपी दुष्काळी म्हणून ओळखला जातो. त्यातील खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटक्या – विमुक्त महिलांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच शासनाने भटक्या – विमुक्त महिलांसाठी कोणकोणत्या योजना राबविल्या आहेत त्यातील निवडक योजनांचा थोडक्यात अभ्यास या शोध निबंधात करण्यात आला आहे.

## १.३. खटाव  तालुक्यातील दुष्काळाचे स्वरुप :-

खटाव तालुका हा सातारा जिल्ह्यातील कायमस्वरुपी दुष्काळी असलेला तालुका आहे. या तालुक्यात महाराष्ट्रातील सर्वात कमी २९ सें.मी. इतकी पावसाची नोंद केली जाते. म्हणजेच खटाव  तालुक्यात २९ सें.मी. इतकाच पाऊस पडत असल्याचे दिसुन येते. मागील तीन वर्षांपासून सतत माण-खटाव मधील जनतेला दुष्काळाशी सामना करावा लागत आहे. जिल्यात एकमेव खटाव तालुका असा आहे की, राजकारण्यांनी आजवर केवळ घोषणांचा पाऊस पाडायचा परंतु पडलेला पाऊस आडविण्यासाठी किंवा बाहेरून उचलुन शेतीला देण्यासाठी ६८ वर्षे लावली आहेत. तालुक्यातील मोठे असलेले  ‘येरळा नदीवरील येरळवाडी तलाव व नेर गावाजवळील नेर तलाव हे दोन तलावाचे

पाणी राष्ट्रीय पेयजल योजनेतून खटाव तालुक्यातील काही गावांना उचलून पाणीपुरवठा केला जातो.या तलावांचे पुरवलेले पाणी अस्वच्छ असून त्यावर कोणत्याही प्रकारचे पाणी शुद्धीकरण प्रक्रिया केली जात नाही.हे पाणी गावातील भटके-विमुक्त दलित वस्तीना पिण्यासाठी १५ दिवसातून एकदा दिले जाते.इतर दिवशी खाजगी टॅकरचे पाणी लोक विकत घेतात. तर खटाव तालुक्यामधून वाहणारी येरळा नदीसह तालुक्यांतील गावा-गावांमध्ये असलेले ओढे,विहीरी,साखळी सिमेंट बंधारे कोरडे पडले आहेत. ब्रिटीश कालीन तलाव आज नामशेष झाले असून शासकीय योजना ह्या सरकारी कार्यालयात कागदावरच आहेत. खटाव तालुक्यात अपवाद वगळता पावसाने तीन-चार वर्षांपासुन दांडी मारली आहे. त्यामुळे तालुक्यातील जनता दुष्काळामध्ये होरपळत आहे. लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.खटाव तालुक्या मध्ये पिक पद्धतीत पण मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे.जास्त पाण्याची पिके घेतली जातात बटाट्याच्या ऊसाचे पिक घेतले जाते.झाडांची संख्या कमी आहे.बोरचे प्रमाण वाढल्यामुळे जमिनीतील पाणी साठा कमी झाला आहे.धरण,बोरवेल,विहिरी यातील पाणी साठा कमी झाला आहे.

गेली चार वर्षे सलग माण-खटाव तालुका दुष्काळाशी सामना करत आहे. सन २०१२ मध्ये तालुक्यात जनावरांना चाऱ्यासाठी शासनाने चारा छावण्या सुरु केल्या होत्या. त्यामध्ये शेतकरी वर्ग एक वर्षभर घरे-दारे सोडून छावण्यांवर जनावारांसकट जनावरांसारखे जीवन जगत होता. तर भटके-विमुकतांच्या वस्त्या मोठ्या स्थलांतरित झालेल्या दिसून येतात.कही प्रमाणात याहीवर्षी

पुन्हा एकदा तीच परिस्थिती निर्माण झाली आहे. परंतु शासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसुन येत आहे. पाऊस न पडल्यामुळे तालुक्यातील खरीप हंगाम वाया गेला आहे. आज तालुक्यांमध्ये १९ गावांमध्ये व ११३ वाड्या-वस्त्यावर १६ टँकरणे पाणी पुरवठा केला जात असुन अजुनही टँकरच्या मागणीचे प्रस्ताव प्रशासनाकडे पडून आहेत. पाण्याशिवाय काहीच शक्य नाही,माणसांना किंवा जनावरांना लागलेली तहान पाणीच भागवू शकते. खटाव तालुक्यातील जनतेची आर्थिक परिस्थिती फारसी समाधानकारक नाही.दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे तालुक्यातील बहुतेक जनता कर्जबाजारी झालेली आहे.

या दुष्काळग्रस्त परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांसाठी किंवा दुष्काळग्रस्तांसाठी राबवलेल्या योजनांमधून पाझरतलाव,नालाबील्डींग, शेततळे, साखळी सिमेंट बंधारे,रोजगार हमी योजने अंतर्गत वृक्षारोपण योजना, रोजगार हमीची कामे एकात्मीक पाणलोट विकास कार्यक्रम, चारा छावणी योजना, तसेच शेतकऱ्यांना उत्पन्नाचे साधन म्हणुन मेंढीपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन जलयुक्त शिवार योजना इ.व्यवसाय सुरु करण्यासाठी शासनाकडून अनुदान तसेच बँकांकडून अल्प व्याजदरात कर्जांचा पुरवठा केला जातो. या सर्व योजनाचे लाभार्थी हे गावातील प्रतिष्ठित लोक आहेत.भटक्या-विमुक्त जाती-जमाती मधील लोकांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही. कारण भटक्या-विमुक्त लोकांच्या शेती अणि शेतिपुरक व्यवसाय नाहीत म्हणून या योजनांचा लाभ या लोकांना घेता येत नाही. महिलांच्या साठी  स्थानिक स्वराज्य संस्थान मध्ये काही ठिकाणी उपक्रम

राबवले जातात,त्यामधे भटक्या विमुक्त महिलांचा सहभाग नाही. त्या विषयी माहिती पुरवली जात नाही.

अशा प्रकारच्या शासकीय योजना दुष्काळग्रस्तांसाठी सुरु केल्या आहेत यांचा ही अभ्यास प्रस्तुत शोध निबंधात सविस्तरपणे करण्यात आलेला आहे.

# प्रकरण २ रे – संशोधन पद्धती

## अनुक्रमणिका


| अ.क्र.नं. | तपशील | पान नं. |
|---|---|---|
| २ | **संशोधन पद्धती** | ७ – १४ |
| २.१. | प्रस्तावना | ७ – ८ |
| २.२. | तथ्य संकलन साधने | ८ – ९ |
| २.३. | नमुना निवड | ९ |

| | | |
|---|---|---|
| २.४. | नमुना निवडीचे निकष | १० |
| २.५. | नमुना निवडीचे समर्थन | १० |
| २.६. | तथ्यांचे विश्लेषण | १० |
| २.७. | संशोधन विषयाची निवड | १० – ११ |
| २.८. | संशोधनाचे महत्व | ११ |
| २.९. | संशोधनाची उद्दिष्टे | ११ |
| २.१०. | संशोधनाची गृहितके | १२ |
| २.११. | संशोधन क्षेत्र | १२ |
| २.१२. | संशोधनाच्या मर्यादा | १२ |
| २.१३. | संशोधन आराखडा | १३ – १४ |


## २.१. प्रस्तावना –


सदर शोध निबंधाचा विषय एका तालुक्यापुरता मर्यादित स्वरूपाचा असून त्यात 'खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्यस्थिती अभ्यास करण्यात आला आहे. दुष्काळ महिलांचा अभ्यास विश्लेषणासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा वापर करून माहिती गोळा केली आहे. संशोधनासाठी सातारा जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांपैकी खटाव तालुक्याची निवड केलेली आहे. खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्यस्थिती अभ्यास करण्यात आला आहे. तसेच खटाव तालुक्यातील एकुण गावांपैकी काही निवडक गावांची या अभ्यासाठी माहिती मिळवण्यासाठी आणि संशोधनासाठी निवड करण्यात आलेली आहे.

खटाव  तालुका हा सातारा जिल्ह्यातील कायमस्वरूपी दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जातो.या तालुक्यात महाराष्ट्रातील अतिशय कमी पावसाची नोंद केली जाते. म्हणून खटाव तालुक्यातील ही दुष्काळाची परिस्थिती समजून घेण्यासाठी आणि दुष्काळामुळे विशेष भटक्या-विमुक्त महिलांना कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते त्यामुळे महिलांच्या आरोग्यावर कोणते परिणाम झाले आहेत.  सरकारकडून कोण-कोणत्या प्रकारच्या उपाययोजना राबवल्या जातात, त्या योजनांमुळे दुष्काळ निवारण होण्यास मदत होते आहे का हे पाहण्यासाठी आणि नवीन काही बदल सुचवण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

## २.२. तथ्य संकलन साधने –

संशोधनाचा हेतू सफल होण्यासाठी माहिती संकलनाच्या विविध मार्गांचा वापर माहिती गोळा करण्यासाठी केलेला आहे. त्यामध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करून माहिती गोळा केली आहे. प्राथमिक व दुय्यम स्तरावर माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण, दस्तऐवज, अनुसूची, अहवाल इ. मार्गांचा अवलंब केला आहे.

**आकृती क्र. २.२.१.**




**अ). प्राथमिक सामग्री –**

खटाव तालुक्यात भटके-विमुक्त महिलांचा सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी चार उद्देश घेऊन ते उद्देश अभ्यासासाठी घेण्यात आले आहेत. दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचा असणारा संबंध अभ्यासण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण पद्धतीचा वापर केला आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी शासकीय कृषी अधिकारी कार्यालय, पंचायत समिती व तहसील कार्यालयातील दुष्काळ निवारण विभाग, विभाग कार्यालय इ.ठिकाणी असणारे अधिकारी व कर्मचारी तसेच प्रत्येक योजनेवर काम करणारे कर्मचारी मजूर, गावातील जाणकार मंडळी वस्ती मधील महिला यांना प्रत्यक्ष भेटून, चर्चा करून व प्रश्नावली भरून घेऊन माहिती संकलित केली आहे.

**ब).दुय्यम सामग्री-**

प्रस्तुत अभ्यासासाठी आवश्यक असणारी दुय्यम सामग्री ही विविध महाविद्यालये,जिल्हा सांख्यिकी विभाग, शासकीय व निमशासकीय संस्था या

सर्वांच्या आधारे आवश्यक असणारी माहिती मिळवली आहे. याशिवाय मासिके, वर्तमानपत्रातील लेख, नियतकालिके दस्तऐवज संदर्भ पुस्तके, सातारा जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, सातारा जिल्हा परिषद कार्यालय,खटाव तालुका कृषी अधिकारी कार्यालय,खटाव तालुका वनविभाग कार्यालय,खटाव तालुका पंचायत समिती व तहसील कार्यालय इ.संस्थाच्या अहवालातून माहिती संकलित केली आहे.

## २.३. नमुना निवड –

खटाव तालुक्यात एकुण १३६ गावे आहेत. त्यापैकी निवडक १० गावांपैकी ६ गावांची निवड अभ्यासासाठी करण्यात आली आहे. नमुना निवड करताना यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला आहे. त्यामध्ये,६ गावांमधून प्रत्येक गावातील २० महिलांचे व शासकीय अधिकारी स्थानिक स्वराज्य संस्था सदस्य यांच्याकडून  प्रश्नावली, मुलाखती,भेटी,निरीक्षणाद्वारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या माहिती गोळा केली आहे.

## २.४. नमुना निवडीचे निकष-

नमुना निवडीसाठी खटाव तालुक्यातील निवडक १० गावांपैकी संशोधनाच्या सोयीसाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने परिसरातील काही निवडक ६ गावांची निवड तालुक्याच्या ठिकाणापासून लोकसंख्या, साक्षरता, वाहतुकीच्या, तालुक्याच्या ठिकाणापासूनचे अंतर यांसारख्या निकषांचे ढोबळ प्रमाण विचारात घेऊन चारही दिशांना समान प्राधान्य देऊन प्रत्येक प्रमाणाच

प्रतिनिधित्व करू शकेल अशा प्रत्येकी २० महिलांचे अशा एकुण १२० महिलांचे निवड साधे नमुना तंत्र वापरून केली आहे.

## २.५.नमुना निवडीचे समर्थन-

वरील नमुना आकार खालील कारणास्तव योग्य आहे.

अभ्यासातील सर्वात महत्वाचा घटक दुष्काळग्रस्त भटके-विमुक्त महिला अथवा व्यक्ती असून तो प्रत्येक दुष्काळ निवारण योजनेच्या प्रमाणाच प्रतिनिधित्व करू शकेल अशा प्रकारच्या १२० महिलांच्या अथवा व्यक्तींच्या प्रतिनिधी स्वरूपातील सर्वसमावेशक नमुना संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधन परिकल्पना पडताळणी करण्यासाठी व दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्यस्थिती विषयी त्यांचे अनुभव, निरीक्षण व मते यांच्या आधारे अध्ययन करण्यास पुरेसा आहे.

## २.६. तथ्यांचे विश्लेषण –

प्राथमिक सामग्री, दुय्यम सामग्री, निवडलेला नमुना यांच्या द्वारे संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी तक्ते, आलेख, सरासरी,सारणी, टक्केवारी, नकाशे,आकृत्या, वृत्तालेख इ.विविध तंत्रांचा वापर करण्यात आला आहे.

## २.७ . संशोधन विषयाची निवड :-

**“खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्यस्थितीचा अभ्यास.”**

सन २०१२-१३ मध्ये महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यातील १८५ तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला विविध गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत होते. अशा दुष्काळग्रस्त भागामध्ये दुष्काळाची परिस्थिती समजून घेणे आणि दुष्काळामुळे भटक्या-विमुक्त महिलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम महिलांनी एकत्रित येऊन दुष्काळ निवारण्यासाठी केलेले उपक्रम यांचा अभ्यास करण्याचे ठरवण्यात आले. सातारा जिल्ह्यातील खटाव तालुका हा कायमस्वरूपी दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जातो खटाव व माण तालुक्या मध्ये भटक्या-विमुक्त लोकांची संख्या जास्त आहे. म्हणून संशोधनासाठी खटाव तालुक्यातील दुष्काळी परीस्थिती समजून घेण्यासाठी शासनाने व वैक्तिक महिलांनी गटाच्या माध्यमातून केलेली कामे. भटके-विमुक्त महिलांचा सामाजिक,आर्थिक शिक्षणिक राजकीय सांस्कृतिक परिस्थिती अभ्यास करून खटाव तालुक्यातील दुष्काळ निर्मुलनासाठी व महिलांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून दीर्घकालीन उपाय सुचवण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

## २.८. संशोधनाचे महत्व :-

केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने दुष्काळ निवारणासंबंधी अनेक योजना राबविल्या जातात.उदा.- एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम योजना, महात्मा गांधी रोजगार हमी योजना , जलयुक्त शिवार अभियान इ. अशा योजना खटाव तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती सुधारण्यासाठी परिणामकारक ठरल्या नाहीत,म्हणून सध्या खटाव तालुक्यातील दुष्काळी स्थिती सुधारण्यासाठी सुरु असणाऱ्या शासकीय योजना व त्यांची

अंमलबजावणी कशा प्रकारे केली जात आहे यासाठी  दुष्काळग्रस्त जनता, शेतकरी, तसेच शासनाला उपाय सुचवण्याच्या दृष्टीने या विषयाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. म्हणून त्या-त्या पातळीवर दुष्काळ संदर्भात संशोधन केले जाते पण त्यामध्ये विशेष भटक्या-विमुक्त लोकांच्या परिस्थिती विषयी पुरेशी माहिती उपलब्ध होत नाही. व तसा अभ्यास खटाव तालुक्या मध्ये झालेला नाही. विशेष महिलांच्या प्रश्नावर अभ्यास करण्याचा प्रयत्न ही झालेला दिसत नाही म्हणून या संशोधनासाठी या विषयाची निवड करण्यात आलेली  आहे.

## २.९. संशोधनाची उद्दिष्टे :-

या विषयाचा अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत.

१. दुष्काळाची सद्यस्थिती समजून घेणे .

२. दुष्काळामुळे महिलांवर होणारे परिणाम.

३. दुष्काळामुळे महिलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम.

४. दुष्काळ निवारण्यासाठी महिलांनी केलेले प्रयत्न पडताळून पाहणे.

## २.१०. संशोधनाची गृहितके :-

या विषयाचा अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत.

१. खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांची सद्यस्थिती हलाकीची आहे.
२. खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे महिलांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.
३. दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांना शासकीय योजनांचा पुरवठा होत नाही.
४. दुष्काळी भागातील महिलांना दुष्काळी स्वरुपाची माहिती नाही.

## २.११. संशोधन क्षेत्र :-

संशोधनासाठी सातारा जिल्ह्यातील कायमस्वरूपी दुष्काळी तालुक्यांपैकी (माण, खटाव, कोरेगाव इ.) खटाव तालुक्याची निवड केलेली आहे. तसेच खटाव तालुक्यातील एकुण १३६ गावांपैकी निवडक १० गावांपैकी ६ गावांची निवड करून त्या ठिकाणी भटके-विमुक्त महिलांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी प्रमुख उद्देश ठरवण्यात आलेले आहेत.म्हणून फक्त खटाव तालुक्यापुरतेच संशोधनाचे क्षेत्र मर्यादित ठेवण्यात आले आहे.

## २.१२. संशोधनाच्या मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन अभ्यासाच्या मर्यादा पुढीप्रमाणे आहे.

१. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी भौगालिक क्षेत्राची मर्यादा ही सातारा जिल्ह्यातील ‘खटाव तालुका’ या एका तालुक्यापुरती मर्यादित असल्याने संशोधन निष्कर्षदेखील या एका तालुक्यापुरतेच मर्यादित आहेत.

२. संशोधनासाठी शासनाने राबविलेल्या दुष्काळग्रस्तांसाठीच्या शासकीय योजनां विशेष महिलांच्यासाठी राबविले जाणारे उपक्रम निवडक ४ उद्देशांची अध्ययनासाठी निवड करण्यात आलेली आहे. या उद्देशांचे अध्ययन करण्यासाठी तालुक्यातील एकुण गावांपैकी निवडक ६ दुष्काळी गावांची मर्यादित निवड अध्ययनासाठी करण्यात आलेली आहे.
३. दुष्काळी भागातील भटके विमुक्त महिलांची सद्यस्थितीचा अभ्यास करताना शासनाने राबविलेल्या योजनांविषयी उपलब्ध होणारी माहिती, प्रश्नावली, मुलाखती,भेटी,निरीक्षणे,वस्ती पातळीवरील लोकांच्या बैठका वेगवेगळी मासिके व अहवाल यावर आधारित आहे.

## २.१३. संशोधन आराखडा –

प्रस्तुत शोध निबंधात संशोधन आराखडा खालीलप्रमाणे दर्शविण्यात आला आहे.

**प्रकरण १. प्रस्तावना –**

या प्रकरणामध्ये प्रस्तावना, संशोधनाचा विषय, भारतातील दुष्काळी परिस्थिती,महाराष्ट्रातील दुष्काळाचे स्वरूप आणि सातारा जिल्ह्यातील दुष्काळाचे स्वरूप, खटाव तालुक्यातील दुष्काळ, संशोधन विषयाची निवड, संशोधनाचे उद्देश, संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाचे महत्त्व इ. घटकांचा अभ्यास केला आहे.

**प्रकरण २. खटाव तालुक्याचा भौगोलिक अभ्यास-**

या प्रकणात १). सातारा जिल्हा दृष्टीक्षेप २). खटाव तालुका एक दृष्टीक्षेप या दोन मुद्द्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. मुद्दा १ मध्ये सातारा जिल्ह्याचा थोडक्यात ओझरता दृष्टीक्षेप घेतला आहे. आणि मुद्दा २ मध्ये खटाव तालुक्याचा संपूर्ण भौगोलिक अभ्यास केलेला आहे. म्हणजेच खटाव तालुका भौगोलिक रचना, क्षेत्रफळ, हवामान, तापमान, जमीन, पाऊस इ. तसेच माण तालुक्याची लोकसंख्या, साक्षरता प्रमाण, व शैक्षणिक सुविधा इ. आणि खटाव तालुक्यातील उद्योगधंदे, सोयी-सुविधा, बाजारपेठा व शेती हंगाम, जलसिंचन सुविधा व पीकपद्धती इ. चा अभ्यास केला आहे.

**प्रकरण ३. खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांनसाठीच्या शासकीय योजना व दुष्काळाचे स्वरूप**

या प्रकरणात खटाव तालुक्यातील दुष्काळाची स्थिती, स्वरूप इ.चा आढावा घेऊन त्या ठिकाणी दुष्काळ निर्मुलनासाठी शासनाने राबविलेल्या विविध योजनांपैकी खालीलपैकी काही निवडक योजनांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या योजनाचा अभ्यास करणे महत्वपूर्ण आहे.

खटाव तालुक्यात दुष्काळग्रस्तांसाठी राबविण्यात येणाऱ्या निवडक योजनांचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

१. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम

२. महात्मा गांधी रोजगार हमी योजना

३. मागेल त्याला शेततळे योजना

४. जलयुक्त शिवार अभियान

५. विशेष घटक योजना
६. सुधारीत राष्ट्रीय कृषी विमा योजना इ. योजनांचा सविस्तर अभ्यास यामध्ये करण्यात आला आहे .

**प्रकरण ४. संशोधन पद्धती आणि आराखडा –**

प्रस्तुत प्रकरणात संशोधन पद्धती यामध्ये प्रस्तावना, तथ्य संकलन साधने, प्राथमिक तसेच दुय्यम साधनांची माहिती, नमुना निवड, नमुना निवडीचे निकष, नमुना निवडीचे समर्थन, तथ्यांचे विश्लेषण, संशोधनाच्या मर्यादा,इ.माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच संशोधन आराखडा म्हणजेच प्रस्तुत शोध निबंधासाठी जी प्रकरणे घेतली आहेत त्या प्रकरणांची माहितीचा अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रकरण ५. माहितीचे संकलन –**

या प्रकरणात प्राथमिक तसेच दुय्यम साधनसामग्रीच्या सहाय्याने प्रश्नावली भरून घेण्यात आलेल्या मतांद्वारे माहितीचे सविस्तर संकलन तक्त्यांच्या सहाय्याने करण्यात आले आहे. दुय्यम साधनसामग्रीच्या सहाय्याने देखील माहितीचे संकलन करण्यात आले आहे. उदा. मासिके, अहवाल, वर्तमानपत्रे इ.)

**प्रकरण ६. निष्कर्ष व उपाययोजना –**

यामध्ये शासनाने दुष्काळग्रस्तांसाठी राबविलेल्या योजनांमधील दोष आणि ते दोष दूर करण्यासाठीच्या उपाययोजना यामध्ये शेतकऱ्यांना, गावकऱ्यांना किंवा दुष्काळग्रस्त महिलांना येणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाय यांचे विवेचन करण्यात आले आहे.

**संदर्भ ग्रंथ व प्रश्नावली –**

यात, संशोधनासाठी लागणारी माहिती उपलब्ध करण्यासाठी विविध पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, अहवाल इ. तसेच इन्टरनेट च्या सहाय्याने काही उपलब्ध करण्यात आली आहे त्याच्या संदर्भातील वेबसाईट यांचा संदर्भ देण्यात आलेला आहे. तसेच या विषयाच्या माहितीचे विश्लेषण किंवा शासनाने राबविलेल्या योजनांचा उपयोग कशा पद्धतीने होईल, योजना राबविल्या जातात किंवा नाही अशा प्रकारची माहिती घेण्यासाठी माहितीचे विश्लेषण करण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात आली ती या शोधनिबंधाच्या शेवटी जोडण्यात आली आहे.

अशा पद्धतीने संशोधन विषयाचा सविस्तर अभ्यास करण्यात आलेल

# प्रकरण ३ रे. – खटाव तालुक्याचा भौगोलिक अभ्यास

## अनुक्रमणिका

| अ.क्र.नं. | तपशील | पान नं. |
|---|---|---|
| ३ | **खटाव तालुक्याचा भौगोलिक अभ्यास** | १५ - २४ |
| ३.१ | **सातारा जिल्हा दृष्टीक्षेप** | १५ – १७ |
| ३.२. | **खटाव तालुका : एक दृष्टीक्षेप** | १७ – २४ |
| | ३.२.१. भौगीलिक रचना, क्षेत्रफळ, हवामान,तापमान, जमीन, पाऊस इ | १८ – २० |
| | ३.२.२. लोकसंख्या , साक्षरता प्रमाण व शैक्षणिक सुविधा : | २० – २१ |
| | ३.२.३. उद्योगधंदे, सोयी- सुविधा व बाजारपेठा | २१ - २३ |
| | ३.२.४. शेतीहंगाम , जलसिंचन सुविधा व पीकपद्धती | २३ - २४ |


## ३.१. सातारा जिल्हा दृष्टीक्षेप :-

सन १९४९ पूर्वी सातारा जिल्ह्याला सातारा प्रांत म्हणून संबोधले जात होते. १९६० मध्ये सातारा जिल्हा कायदेशीर दृष्टया अस्तित्वात आला. सध्या सातारा जिल्ह्यात सातारा, कोरेगांव, जावली, वाई, महाबळेश्वर, पाटण, कराड,

फलटण, खटाव, माण, आणि खंडाळा हे अकरा तालुके आहेत. सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील बाजूस आणि दक्षिण भागात मध्यभागी स्थित आहे. भौगोलिकदृष्ट्या त्याचा विस्तार दक्षिण पठारांच्या पश्चिम सीमावर्ती भागात १७.५० ते १८.११ उत्तर अक्षांश आणि ७३.३३ ते ७४.५४ पूर्व रेखांश आहे.जिल्ह्याचा आकार आटोपशीर असून त्याचा पूर्व-पश्चिम विस्तार सुमारे १४५ किलोमीटर आणि दक्षिणोत्तर विस्तार सुमारे १२० किमी आहे.सातारा जिल्ह्याच्या उत्तरेला पुणे, पूर्वेला सोलापूर, दक्षिणेला सांगली आणि पश्चिमेला रत्नागिरी जिल्हा व उत्तर –पश्चिमेला रायगड जिल्हा आहे. उत्तरेकडील या जिल्ह्याची सीमा नीरा नदीने निर्धारीत केलेली असून पश्चिम आणि नैऋत्य कडील सीमा सह्याद्रीच्या मुख्य रांगांमुळे सुनिश्चित झाल्या आहेत.

सातारा जिल्ह्याचे प्राकृतिक स्वरूप लक्षात घेता यात फार मोठी विविधता आढळते. जिल्ह्याचे भूस्वरूप, हवामान, वनसंपदा आणि मनुष्याचे आर्थिक व्यवहार याबाबींवरही यांचा प्रभाव जाणवतो.जिल्ह्याचा एक भागात सह्याद्रीच्या रांगा त्यांची शिखरे व त्यांच्याशी निगडीत असलेले उंच पठारी प्रदेश आहेत. दुसऱ्या भागात नीरेचे सखोल खोरे आहे. पश्चिमेकडे सरासरी वार्षिक पर्जन्य ६,२०० मी.मी.पेक्षा अधिक असलेले महाबळेश्वर, तर पूर्वेकडे पावसाची वार्षिक सरासरी ५०० मी.मी. पेक्षा कमी असलेला खटाव तालुका आहे.भौगोलिक अभिलक्षनानुसार जिल्ह्याचे तीन प्रमुख विभाग पडतात.१) पश्चिम विभाग २) मध्य विभाग ३) पूर्व विभाग, जिल्ह्यात प्रामुख्याने चार नद्यांची खोरी आहेत. उत्तरेकडील सर्व प्रदेश नीरा नदीच्या खोऱ्याने व्यापला

असून आग्नेयेस माणगंगा नदीचे खोरे आणि दक्षिणेस येरळा व कृष्णा या नद्यांची खोरी आहेत.

पाचगणी, महाबळेश्वरच्या परिसरास वनसंपदा, वन्यप्राणी पक्षी यांचा निसर्गदत्त वारसा लाभलेला आहे. वैशिष्टयपूर्ण हवामानामुळे या परिसराचे आकर्षण ब्रिटीशपूर्व काळापासून सतत वाढतच आहे. महाबळेश्वर डोंगरावर असलेले पंचनद्यांचे उगमस्थान तसेच या जिल्ह्यातील कराड येथील कृष्णा-कोयना नद्यांचा संगम (प्रिती संगम), वाईचा कृष्णाकाठ, माहुलीचा कृष्णा-वेण्णा संगम अशा स्थानांना विविध पौराणिक संदर्भ लाभले आहेत.

सन २०११च्या जनगणनेनुसार संपूर्ण महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत सातारा जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०,५८२ चौ.किमी.(६.६९%) व जंगल व्याप्त भू-प्रदेश १,४२,०००हेक्टर आहे. सातारा जिल्ह्याची लोकसंख्या ३०,०३,७४१ असून त्यात सरासरी पुरुष १६,००,००० व स्त्रिया १४,००,००० एवढया आहेत.एकुण साक्षरता प्रमाण ७८.५२% तर पुरुष साक्षरता ८८.४५% व स्त्रियांची साक्षरता ६८.७१% एवढी आहे.

जिल्ह्यात जलसिंचानाखालील क्षेत्र २,१०,७२७ हेक्टर (३१%) आहे. सध्या जिल्ह्यात मोठे-२, मध्यम-९, जलसिंचन प्रकल्प आहेत. तर १० मोठे, १३ मध्यम आणि ८० लहान (एकुण-१०३) जलसिंचन प्रकल्पांचे काम कृष्णाखोरे विकास महामंडळांतर्गत चालू आहे. त्यामुळे भविष्यात २,४३,३९२ हेक्टर ओलिताखाली येणार आहे.

या जिल्ह्यात वाई, चाफळ, पाली, शिखर-शिंगणापूर, औंध, पुसेगाव, गोंदावले, म्हसवड इ. धार्मिक तीर्थक्षेत्रे, प्रतापगड, सज्जनगड, भूषणगड, वर्धनगड, वारुगड इ.किल्ले, महाबळेश्वर,पाचगणी,कोयनानगर, संगममाहुली,प्रितीसंगम,ठोसेघर,चाळकेवाडी इ. प्रेक्षणीय स्थळे आहेत. वाई,सातारा, कराड इ.या भागातून मुंबई –पुणे-बेंगलोर हा राष्ट्रीय महामार्ग (एन.एच.४ ) गेलेला आहे.

सातारा जिल्ह्यात प्राथमिक सह.संस्था ८७३, साखर कारखाने १२, सुत गिरण्या ८, एकुण सह.संस्था-५०५९ व सभासद संख्या १७,४०,००० एवढी आहे. वाढते सहकार क्षेत्र, औध्योगीकीकरणातीलवाढ, वाढत्या जलसिंचन सुविधा, आरोग्य सुविधा, शेतीतील सुधारणा, शैक्षणिक क्षेत्रातील बदल, दळण वळणाच्या सोयी, बँकिंग क्षेत्रातील सुविधा इ. मुळे सातारा जिल्ह्याचा विकास मोठया प्रमाणावर होत असलेला दिसून येतो.

## ३.२. खटाव तालुका : एक दृष्टीक्षेप –

सातारा जिल्याच्या पूर्वेला खटाव तालुका आहे. .खटाव तालुक्याला फार मोठी ऐतिहासिक,सामाजिक,शैक्षणिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. खटाव तालुक्याने भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात फार मोठे योगदान दिले आहे. हा पूर्णपणे पावसावर अवलंबून असलेला, तालुका आह अतिशय कमी पर्जन्यमान असलेला, घाट माथ्यावरचा, टेकड्या चढ-उतारांचा व काही सपाटीचा, शेतात ताली टाकलेला कुठे सुपीक तर कुठे नापीक, रेताड, दगड गोट्यांनीयुक्त,मुरमाड असा हा भूभाग आहे. येरळा नदी या तालुक्याला देणगी ठरलेली आहे. परंतु गेल्या

१५ वर्षापासून या भागात अत्यंत कमी पर्जन्यमान आहे. येथील शेती पूर्णपणे तोटयात केली जाते. थोडयाफार पावसाच्या आशेवर पेरण्या केल्या जातात, पुन्हा पावसाची आशा करून शेतकऱ्यांची निराशा होते. पीके जळून जातात. त्यामुळे लोकांच्या हाती पीके लागत नाहीत, ही खटाव तालुक्यातील आजची वस्तुस्थिती आहे.

पेरणी, पाळी, बी-बियाणे यांचा खर्च पूर्णपणे वाया जातो. नदीलगतचा शेतीचा भूभाग आहे. तेथे नदीवर तलाव बांधला आहे या तालावावाचे पाणी शेतीला पुरवले जात नाही. त्या तलावाचे पाणी लोकांना पिण्यासाठी वापरले जाते. तलावाच्या कडेला असणाऱ्या विहिरींना पाणी असते, परंतु पाऊस नसल्याने या विहिरीसुद्धा आटलेल्या आहेत. शासनाने राबविलेल्या योजनांतून पाझर तलाव, नाला बिल्डिंग, शेततळी, व बांध घालून पाणी अडविले जाते. तसेच पाऊस नसल्यास हे तलाव , धरण भरत नाही. त्यामुळे गेल्या सात-आठ वर्षात या भागात दुष्काळ पडल्याने जेथे पिण्यास पाणी नाही. तिथे शेती कशी काय करायची हा मुख्य प्रश्न आहे. त्यामुळे शेळीपालन, मेंढीपालन,इ. थोडक्यात पशुपालन, दुग्धव्यवसाय हे जोडधंदे देखील धोक्यात आलेले आहेत. तसेच या दुष्काळाच्या परिस्थितीमुळे लोकांचे स्थलांतराचे प्रमाणही वाढलेले दिसून येते. खटाव तालुक्यातील बर्याचशा गावांना येरळवाडी तलावामधून पाणी पुरवठा केला जातो.हे पाणी उचलून पुरविले जाते ज्या गावामध्ये शासकीय विहिरीत शासकीय टाकी आहे त्यामध्ये पाणी सोडले जाते. त्या शासकीय विहीर किंवा शासकीय टाकीची स्वच्छता केली जात नाही. या पाण्यावरती कोणत्या ही प्रकारची प्रक्रिया केली जात नाही. लोकांना तशी सूचना ही दिली जात नाही.

प्राथमिक आरोग्य केंदातील कार्यकारी अधिकारी गावामध्ये पुरवलेल्या पाण्याची तपासणी केलेली आढळून येत नाही. ब्रिटीश कालीन तलाव, विहिरी, तळे, लाभलेले आहेत.ते आज नामशेष झाले आहेत. गेल्या वर्षी पासून पाणी फौंडेशन च्या माध्यमातून खटाव तालुक्यातील बर्याच गावांनी पुढाकार घेऊन चांगली काम केली आहेत. त्या गावांना त्याचा चांगला फायदा झाला आहे. यावर्षी पाणी फौंडेशनच्या स्पर्धेमध्ये खटाव तालुक्यातील एकूण ५६ गावांनी सहभाग घेतला आहे.

खटाव तालुक्यातील शेतकऱ्यांची भटक्या-विमुक्त लोकांची आर्थिक परिस्थिती फारशी समाधानकारक नाही. येथील बहुतेक शेतकरी / लोक कर्जबाजारी आहेत. अगदी नगण्य शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारात जातो. पावसा अभावी शेती पडीक ठेवावी लागते.

## ३.२.१. भौगीलिक रचना, क्षेत्रफळ, हवामान,तापमान, जमीन, पाऊस इ.:

### १. भौगोलिक रचना –

खटाव तालुका हा सातार जिल्ह्यात मोडत असून हा तालुका सातारच्या पूर्वेस आहे. खटाव तालुक्यास विशेष अशी ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा आहे. यातील, सीताबाई, महिमानगड, वारुगड, खोकडा, शिखर-शिंगणापूर , संतोषा इ. डोंगर सोडल्यास जमिनीची समुद्रसपाटी पासून उंची ६०० ते ९०० मीटरच्या दरम्यान आहे. या वरील डोंगररांगा शंभू महादेव डोंगराच्या शाखा आहेत.

हा विभाग सह्याद्रीच्या पर्जन्य कमी-कमी होत पश्चिमेकडून पूर्वेकडे वार्षिक पर्जन्यमान कमी-कमी होत जाते. जिल्ह्याच्या एकुण जंगल व्याप्त क्षेत्रापैकी २८.७७% क्षेत्र या विभागात आहे, तरी या विभागाचे क्षेत्रफळाशी प्रमाण फक्त ४.२७ % च आहे.

## २.क्षेत्रफळ-

खटाव तालुक्याचे एकुण क्षेत्रफळ १३६४५७ हेक्टर ( १३१८.६ चौ.किमी ) आहे. खटाव तालुक्याच्या पुर्वेस व उत्तरेस माण तालुका दक्षिणेस खानापूर, पश्चिमेस कोरेगावं हे तालुके आहेत. तसेच या तालुक्यातून येरळा नदी वाहते या तालुक्याच्या परिसरात १३६ गावे आहेत. खटाव तालुक्यात सोलकनाथ, भापशाह, वर्धनगड आणि भूषण गड्या चार टेकड्या आहेत. वडूजच्या उत्तरेस २९ किमी.वर सोलकनाथ टेकडी असून त्यात येरळा नदी उगम पावते. वडूजच्या पश्चिमेस २२ किमी.वर वर्धनगड आहे. या गडाची टेकडी महादेव श्रेणीचाच एक भाग असून तिचा माथा गोलाकार आहे. टेकडीच्या दक्षिणेकडून सातारा–पंढरपूर रस्ता जातो. वडूजच्या नैर्ऋत्येस १८ किमी. वर सपाट माथ्याचा, पण प्रपाती उताराचा खडकाळ भूषणगड किल्ला आहे

सह्याद्रीत काही ठिकाणी खिंडी किंवा ग्रीवा आढळतात. त्यातून घाटमार्ग काढलेले आहेत.

## ३.हवामान-

सातारा जिल्ह्यात गॅझेटीअरनुसार पाच ऋतू पुढीलप्रमाणे कल्पिलेले होते. पावसाळा १० जून ते सप्टेंबर पर्यंत, कोरडे व उष्ण हवामानाचा काळ सप्टेंबर शेवट ते मध्य नोव्हेंबर पर्यंत, हिवाळा नोव्हेंबर ते जानेवारी शेवटपर्यंत पूर्वेकडील वाऱ्यांचा काळ अथवा उष्ण व कोरडे हवामानाचा काळ फेब्रुवारी ते मार्च शेवट आणि उन्हाळा एप्रिल ते १० जून पर्यंत तालुक्यातील हवामान

सामन्यात: कोरडे, उष्ण व सुर्यप्रकाशित असते. हवामानाच्या दृष्टीने वर्षाची चार ऋतूत विभागणी होते. हिवाळा डिसेंबर ते मध्य फेब्रुवारी, उन्हाळा मध्य फेब्रुवारी ते मे, पावसाळा जून ते सप्टेंबर आणि मान्सुनोत्तर काळ ऑक्टोबर – नोव्हेंबर असा असतो.

## ४.तापमान-

हिवाळयात या भागात दैनिक सरासरी कमाल तापमान २८.४ अंश सेल्सिअस तर दैनिक सरासरी किमान तापमान फक्त १६.४ अंश सेल्सिअस असते.मध्य फेब्रुवारी ते मे महिन्याच्या शेवटपर्यंतच्या कालावधीतील तापमान सतत वाढ होत असते.उंच प्रदेशापेक्षा सपाट प्रदेशात तापमान जास्त वाढ होत असते. मे हा सर्वाधिक तापमानाचा महिना असून त्यावेळी मैदानी भागात दैनिक सरासरी कमाल तापमान ३७.५ अंश से. असते. काहीवेळा दुपारनंतर उदभवणाऱ्या झंझावातामुळे तापमानात वाढ होऊन ते सुसह्य होते जूनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात नैऋत्य मोसमी वारे वाहण्यास सुरुवात झाल्यानंतर दिवसाचे तापमान हिवाळयातील तापमानापेक्षा कमी असते. पावसाळा संपल्यावर ऑक्टोबर महिन्यात कमी असते. दिवसाच्या तापमानात वाढ होताना आढळते.

## ५.जमीन -

खटाव  तालुक्यात विविध प्रकारची जमीन आढळून येते, येरळा नदीच्या खोऱ्यात गाळाची काळी जमीन आढळून येते. या  खोऱ्यांपासून जसजसे बाजूला जावे तशी मुरमाड जमीन सुरु होते. आणि त्याच्या पलिकडे डोंगर उतारावर खडकाळ जमीन आहे. जमीनीत पाणी धरण्याची क्षमता कमी असल्याने तेथे

कमी पाण्याच्या पिकांचे उत्पादन घेतले जाते. अशा जमीनीत प्रामुख्याने बाजरी, सुर्यफुल, हरभरा, मटकी, ज्वारी, इ. पिकांचे उत्पादन मोठया प्रमाणात या जमिनीतून घेतले जाते. तर ओलिताखालील म्हणजे बागायती जमिनीतून कांदा, भुईमुग, गहू, ऊस, बटाटा, फळबाग व भाजीपाला इ. पिकांचे उत्पादन या जमिनीतून घेतले जाते.

खटाव तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र (हे.) – १३६४५७ हेक्टर (१३१८.६ चौ.किमी)

लागवडीलायक क्षेत्र - ११४९६८ ( हे.)

ओलिताखालील एकूण क्षेत्र – १६६४४ हेक्टर .

## ६.पाऊस-

महाराष्ट्रातील सर्वात जास्त दुष्काळी तालुका म्हणून खटाव तालुका ओळखला जातो.. पावसाच्या प्रमाणाचा इतिहास पाहिल्यास सातारा जिल्ह्यात खूप मोठा विरोधाभास दिसून येतो. कारण सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर या पश्चिमेकडील तालुक्यात एका दिवसात अगदी विक्रमी पाऊस (१२००)मी.मी. तर खटाव  तालुक्यात संपूर्ण वर्षात पुरेसा पाऊसही पडत नाही. किंबहुना महाराष्ट्रातील सर्वात कमी पाऊस पडतो. चालू वर्षाचा (२०१३) विचार केल्यास महाराष्ट्रातील सर्व नदयांना महापूर आले, पण खटाव तालुक्याची येरळा नदी कोरडी ठणठणीत आहे. मागील दहा वर्षाचा विचार केल्यास सरासरी पावसाचे प्रमाण ४६५ मी.मी. दिसून येते.

पावसाळा हा जून ते सप्टेंबर या कालावधीत असला तरी मे महिन्यातील वळीवाच्या पावसावर महिन्यात मशागती होतात. साधारणतः ऑगस्ट –सप्टेंबर महिन्यात या तालुक्यातील हलका व मध्यम स्वरूपाचा पाऊस पडतो.

# ३.२.२. लोकसंख्या , व शैक्षणिक सुविधा :

## १. लोकसंख्या व साक्षरता प्रमाण –

२०११ च्या जनगणनेनुसार खटाव  तालुक्याची एकुण लोकसंख्या २,६०,४८३  एवढी आहे. त्यामध्ये एकुण पुरुष १,२,८८२१  एवढे व स्त्रिया १,३१,६६२ एवढया आहेत.

## २. शैक्षणिक विकास –

माण तालुक्याचा शैक्षणिक विकास फारसा झालेला नाही. या तालुक्यात प्राथमिक व माध्यमिक शाळा बऱ्यापैकी आहेत. त्यातील सर्व प्राथमिक शाळा जिल्हा परिषदेच्या तर माध्यमिक शाळा विविध शासकीय व खाजगी संस्थांच्या आहेत. एक इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. तालुक्यात फक्त दोनच सिनिअर कॉलेज असल्यामुळे अनेक मुलामुलींना इच्छा असुनही खराब रस्ते, वाहतुकीच्या अपुऱ्या सोयी, जास्त अंतर, हलाखीची आर्थिक परिस्थिती यामुळे १० वी १२ वी नंतरचे शिक्षण घेता येत नाही. बऱ्याचश्या मुला-मुलींना आपल्या आई – वडिलांना शेती कामात, मोलमजुरीत हातभार लावावा लागत असल्याने शिक्षण अर्ध्यावर सोडून ध्यावे लागते.

या परिसरात शासकीय आयटीआय सोडले तर (त्यात फक्त ठराविकच ट्रेड आहेत.) इंजिनियरिंग, वैद्यकीय, डी.एड., बी.एड., व्यवस्थापन कोर्सेस, डिग्री-डिप्लोमा कोर्सेस किंवा रोजगाराभिमुख, व्यावसायिक, धंदेविषयक शिक्षण देणाऱ्या संस्था नसल्यामुळे हा तालुका शैक्षणिक विकासाच्या बाबतीत मागास असल्याचे दिसून येते.

### शैक्षणिक सुविधा –

१. प्राथमिक शाळा – २४४

२. आश्रमशाळा - ४

३. उच्च माध्यमिक शाळा - ११

४. महाविद्यालय -5

५. आयटीआय - ०१. इ. शैक्षणिक सुविधा आहेत

## ३.२.३. उद्योगधंदे, सोयी- सुविधा व बाजारपेठा –

### १. उद्योगधंदे –

खटाव तालुक्यातील लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे पण बहुतेक शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे तेथील परिसरात छोटे छोटे लघुउद्योग, जोडधंदे वाढत आहेत. या परिसरात शेती बरोबर शेळी – मेंढीपालन, दुग्ध, बी- बियाणे विक्री, कुक्कुटपालन, हातमाग, लोकर विणकाम, सुतारकाम, लोहारकाम, कातीवकाम कुंभार उद्योग इ. उद्योग आहेत.

डोंगराळ आणि माळरान जमिनीमुळे बऱ्याच लोकांचा शेळया – मेंढया पालनाचा व्यावसाय आहे. मेषपालनाच्या व्यवसायामुळे लोकरी पासून घोंगडी, जेन बनविण्याचा व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो. दुग्ध उत्पादनासाठी गाई – म्हैशी यांसारखे पाळीव प्राणी तर बैल हे शेतीची मशागत करण्यासाठी मुबलकतेमुळे त्यापासून दोरखंड तयार करण्याचे कामही बऱ्याच ठिकाणी चालते.

तसेच औंध,पुसेगावयेथे तीर्थक्षेत्रे असल्याने काही जातीचे लोक पुजा – अर्चा करणे, तर काही भटके-विमुक्त महिला हाताने बनवलेल्या कलाकुसरीच्या

वस्तू आणि कटलरीचे साहित्य विक्रीचा व्यवसाय करतात. पतसंस्थांचे क्षेत्र विस्तारलेले असल्यामुळे काही लोक पतसंस्थांत नोकरी करतात, तर काही पिग्मी एजंट म्हणून बचती गोळा करण्याचे काम करतात. वर्धनगड,भूषणगड,मायणी,गुरसाळे, खटाव, वडूज,औंध,खाद्गून ही ऐत्यासिक आणि प्रेक्षणीय स्थळे आहेत.

## २. सोयी – सुविधा –

खटाव तालुक्यातून जिल्ह्याच्या ठिकाणापासून या तालुक्याचे अंतर 55 किमी. आहे. तालुक्यातून 1) वडूज-सातारा 2) वडूज-कोल्हापूर 3) वडूज-सांगली 4) वडूज-पंढपूर अशी वाहतूक होते. येरळा नदीवर येरळवाडी व नेर येथे जलसिंचनयुक्त प्रकल्प आहेत. तसेच येळीव न मायणी येथे जलसिंचनयुक्त धरणे बांधली आहेत. या तालुक्यात एकूण 141 महसुती गांवे आहेत. ग्रामपंचायतींची संख्या 133 इतकी आहे. लोकांच्या आरोग्य विषयक सुविधांच्या दृष्टीने 7 प्राथमिक आरोग्य केंद्र व 40 उपकेंद्रे आहेत. ग्रामीण व कुटीर रुग्णालयाची संख्या 3 इतकी असून 2 आरोग्य पथके व 1 आयुर्वेदिक दवाखाना आहे. जनावरांना औषधोपचार करण्याच्या दृष्टीने तालुक्यात श्रेणी 1 चे 9 व श्रेणी 2 चे 9 पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. शैक्षणिक सुविधांच्या दृष्टिने विकास दिसून येतो. सह. पतसंस्थांचा तालुक्यात विस्तार झालेला आहे.

.

## ३. बाजारपेठा-

खटाव तालुक्यात आणि परिसरात मोठया बाजारपेठा नाहीत त्यामुळे बहुतेक शेतकरी आपला माल आठवडे बाजारात नेऊन विकतात, किंवा येईल त्या किंमतीला खाजगी व्यापाऱ्यांना माल विकतात तर जनावरांच्या खरेदी – विक्रीचे व्यवहारही आठवडे बाजारात आणि खास करून मोठ –मोठया यात्रांत

होतात. या परिसरात नागोबा,औंध, आणि पुसेगावची जनावरांची यात्रा प्रसिद्ध आहे. खटाव तालुक्यात २ साखर कारखाने सोडल्यास इतर कोणताही मोठा उद्योग नसल्याने या परिसरातील बाजारपेठांचा मोठया प्रमाणात विकास झालेला नाही.

## ३.२.४. शेतीहंगाम , जलसिंचन सुविधा व पीकपद्धती -

### १. शेतीहंगाम –

खरीप हंगाम जूनमध्ये प्रारंभ होणाऱ्या नैऋत्य मोसमी पावसावर अवलंबून असतो. क्वचित प्रसंगी पडणाऱ्या रोहिणी नक्षत्रातील (मे अखेर ) सरींचा उपयोग शेतीच्या पूर्व मशागतीस होतो. या हंगामात बाजरी, भुईमूग , मका , मटकी, उडीद, चवळी, ही पीके घेतात. खरीप पिकांची पेरणी जून-जुलै च्या मध्यपर्यंत व कापणी सप्टेंबरच्या मध्या पासून नोव्हेंबर अखेर पर्यंत होते. काही खरीप पिकांची कापणी व मळणी जानेवारी पर्यंत असते. रब्बी हंगाम ऑक्टोंबर मध्ये सुरु होऊन मार्च मध्ये संपतो.

### २. जलसिंचन सुविधा –

**जलसिंचनाचे स्त्रोत –**

**अ)विहिरी –**

खटाव तालुक्यातील जास्तीत जास्त विहिरींद्वारे ओलिताखालील शेतीचे क्षेत्र आहे. जर या परिसरात मोठया प्रमाणात पाऊस पडला आणि येरळा नदी दुथडी

भरून गेली तरच आसपासच्या परिसरातील विहिरींना सहा ते आठ माही पाणी उपलब्ध होते.

**आ)  नदी –**

म्हस्कोबाच्या डोंगराळ भागात उगम पावणारी येरळा नदी कोरेगाव व खटाव या तालुक्यांतून वाहत जाऊन पुढे सांगली जिल्ह्यात प्रवेश करते . या भागात पर्जन्यमानही फारच कमी असल्याने पावसाळयात या नदीस फक्त ६० से.मी. ते १.८ मीटर खोल एवढेच पाणी असते कोरडया ऋतूत नदीचे पात्र कोरडे पडलेले दिसते.

**इ ) तलाव –**

येरळा  नदीवर येरळवाडी तलाव आहे,नेर गावाजवळीळ नेर तलाव असे २ तलाव मोठे आहेत.आजूबाजूच्या लोकांना शेतीसाठी आणि पिण्यासाठी पाण्याचा वापर केला जातो.

**ई ) धरण –**

येरळा नदीवर येथे धरण आहे . या धरणाचा फायदा आसपासच्या गावांना शेतीसाठी, गावांना पिण्याच्या पाण्यासाठी होतो.

## ३. पीक पद्धती -

दुष्काळी विभागातील हा तालुका रब्बी खाली मोडतो या तालुक्यात खरीप हंगामात बाजरीचे पीक घेण्यात येते. मात्र रब्बी हंगामात ज्वारी, गहू,

हरभरा, मका, करडई , सुर्यफुल यांसारखी पीके घेतली जातात. या विभागातील मुख्य पीक गहू आहे.बटाट्याच्या शेतीसाठी खटाव तालुका प्रसिद्ध आहे.

# प्रकरण ४ थे. – दुष्काळग भागातील शासकीय योजना

## अनुक्रमणिका



| अ.क्र.नं. | तपशील | पान नं. |
|---|---|---|
| ४ | दुष्काळ भागातील  शासकीय योजना | २५ - ४६ |

| | | |
|---|---|---|
| ४. | **प्रस्तावना** | २५ – २६ |
| ४.१. | एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम | २६ – २९ |
| ४.२. | महात्मा गांधी रोजगार हमी योजना | ३० – ३२ |
| ४.३. | मागेल त्याला शेततळे योजना | ३३ – ३६ |
| ४.४. | जलयुक्त शिवार अभियान | ३७ - ३९ |
| ४.५. | विशेष घटक योजना | ४० – ४२ |
| ४.६. | सुधारीत राष्ट्रीय कृषी विमा योजना | ४३ – ४६ |


## ४. प्रस्तावना :-

खटाव तालुक्यात सलग चार वर्षे पावसाने दडी मारल्यामुळे तालुक्यातील गावे,वाड्या,वस्त्या इ. ठिकाणी असणारे ओढे,विहिरी,नदी,नाले,तलाव,पाट-बंधारे इ. सर्व पाणी साठ्याचे स्त्रोत कोरडे पडले आहेत.तेथील ग्रामीण जनतेला पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. तसेच जनावारांनामध्येही पाणी आणि चाऱ्याच्या कमतरतेमुळे कुपोषणाची वेळ आली आहे.या सर्व गोष्टींचा परिणाम

म्हणजे खटाव तालुक्यात भयंकर दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे. म्हणूनच सरकारने खटाव तालुक्याचा दौरा करून एका समितीमार्फत तालुक्याची पाहणी करून दुष्काळ जाहीर केला आहे. या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्यसरकारकडून विविध विभागांमार्फत दुष्काळ निवारणासाठी वेगवेगळया योजना सुरु करण्यात आल्या आहेत. (उदा.कृषी विभागाच्या योजना,पशुसंवर्धन विभागाच्या योजना, राज्य शासनाची रोजगार हमी योजना,इ.)या विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना कशा प्रकारे खटाव तालुक्यातील दुष्काळाची परिस्थिती नियंत्रित करण्याचे काम करत आहेत त्या शासकीय योजना कोणत्या आणि कशा प्रकारे राबविल्या जातात त्या योजनाचा लाभ कोणत्य लोकांना होतो याचा ही अभ्यास थोडक्यात प्रस्तुत शोध निबंधात पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आला आहे. प्रत्येक योजना ही शेती, पाणी व्यवस्थापन, बचत गटातील महिलांना कर्ज पुरवठा त्यातून महिलांना उद्योग व्यवसायाची निर्मिती, बेरोजगार अशिक्षित लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे.प्रत्येक योजनेची अंमलबजावणी करिता ग्रामपंचायत लेवला समिती तयार करणे.प्रतेक्षात ह्या योजना शेतकरी आणि गावातील प्रतिष्टीत लोकांच्या हिताच्या आहेत असे पडताळणी केल्यास दिसून येते,या योजनांच्या निकषांची पडताळणी केल्यास महिलांच्यासाठी यामध्ये कोणत्या ही प्रकारची आर्थिक तरदूत नाही.बचत गटाच्या महिलांना उद्योग व्यवसायासाठी सहकार्य केले जाते पण त्या बचत गटा मध्ये भटक्या-विमुक्त समाजातीलमहिलांचे बचत गट नाहीत काही प्रमाणत महिलांचे बचत गट आहेत.पण त्या गटातील महिला या योजनेचा लाभ घेता मिळत नाही.काही बचत गटातील महिला घ्या इतर ठिकाणी रोजगारासाठी स्थलांतरित

असतात.भटक्या-विमुक्त लोकवस्तीच्या ठिकाणी या योजनांची माहिती किंवा जनजागृती ही होताना दिसत नाही.या योजनांच्या गावपातळीवरील समितीमध्ये महिलांचा व युवकांचा सहभाग नाही.ज्यांना शेती आहे अशा लोकांच्या हिताच्या ह्या योजना दुष्काळी भागात राबवल्या जातात.त्यामध्ये भटक्या-विमुक्त लोकांचा कुठेच सहभाग दिसून येत नाही.भटक्या-विमुक्त समाजातील तरुणांना या योजनांच्या माध्यमातून कोणत्या ही प्रकारचे उद्योग व्यवसायाचे प्रशिक्षण व माहिती ही दिली जात नाही.ह्या योजनांची अंमलबजावणी गावपातळीवरील प्रतिष्टीत लोकांच्या व राजकीय पुढार्यांच्या सल्याने राबवल्या जातात.या योजना राबवताना ही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला दिसून येतो.सामान्य जनतेला लाभापासून वंचित ठेवले जाते. भटक्या-विमुक्त समजाच्या लोकांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून ह्या योजना महत्वपूर्ण ठरू शकतात म्हणून या योजनांचा संशोधनच्या दरम्यान अभ्यास करण्यात आला आहे.

खटाव तालुक्यात दुष्काळग्रस्तांसाठी राबविण्यात येणाऱ्या निवडक योजनांचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

१. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम
२. महात्मा गांधी रोजगार हमी योजना
३. मागेल त्याला शेततळे योजना
४. जलयुक्त शिवार अभियान
५. विशेष घटक योजना
६. सुधारीत राष्ट्रीय कृषी विमा योजना

## ४.१. <u>एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम योजना (IWMP)</u>:-

दि.२६ फेब्रुवारी २००९ रोजी केंद्र शासनाने एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमास मंजुरी दिली आहे. केंद्र शासनाच्या भूमी संसाधन विभागाने 'दुष्काळ प्रवण क्षेत्र कार्यक्रम', 'वाळवंट विकास कार्यक्रम' आणि 'एकात्मिक पडिक जमीन विकास कार्यक्रम' या योजनांच्या एकत्रीकरणातून 'एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम हि योजना तयार केली आहे.

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूसंसाधन विभागामार्फत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम सन २००९-१० पासुन कार्यान्वित करण्यात आला आहे. या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाचा निधी ९०:१० या प्रमाणात उपलब्ध होतो या कार्यक्रमांतर्गत मृद व जलसंधारण कामांव्यतिरिक्त मत्ता नसलेल्या लाभार्थ्यांना उपजीवीका तसेच शेतकऱ्यांसाठी उत्पादन पद्धती आणि सूक्ष्म उद्योजकता या बाबींसाठी आर्थिक तरतूद आहे.प्रस्तुत कार्यक्रमात प्रशिक्षण व संस्था बांधणी प्रशिक्षण, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, सनियंत्रण व मूल्यमापन आणि प्रकल्प अमलबजावणीसाठी प्रशासकीय खर्चाची तरतूद केली आहे.

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम ही योजना भारत सरकार व राज्य सरकार यांनी संयुक्तपणे राबवण्याची योजना आहे.यासाठी केंद्र सरकार ९० % आणि राज्य सरकार १० % निधी उपलब्ध करून देते.महाराष्ट्रात ४३ हजार गावे असून त्यातील ३५७१७ गावे कोरडवाहू आहेत. १५९ लाख हेक्टर क्षेत्र हे अवर्षणग्रस्त आहे. हि योजना सुरु झाल्यापासून ८२८ प्रकल्प मंजूर झाले

असून त्यांचे मूल्य ४४७० कोटी रुपये आहे. एकात्मिक पाणलोट विकास व व्यवस्थापन योजनेचा प्रती हेक्टरी खर्च १२ हजार रुपये असून, दुर्गम भागामध्ये तो १५ हजार रुपये आहे.या योजनेच्या माध्यमातून अवर्षणग्रस्त महाराष्ट्रातील सिंचनाचे क्षेत्र निश्चित वाढू शकते, तसेच शहराकडे जाणारा ओघ थांबविला जाऊ शकतो. संशोधना मुलाखती दरम्यान भटक्या-विमुक्त समाजातील महिलंशी चर्चा करत असताना ह्या योजनेची त्यांना माहिती नाही अणि त्याचा लाभ ही या जमातीतील लोकाना भेटत नाही .स्वतःच्या हक्काची शेती नसल्यामुळे शासनाच्या ही योजना दुष्काळी भागातील भटक्या जमातीतील लोकांना घेता येत नाही. ह्या योजना दुष्काळ भागातील भटके विमुक्त समाजातील लोकांच्या विकासाची नाही असे दिसून येते.

### ४.१.१. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत येणारे घटक-

या योजने अंतर्गत जी कामे केली जातात, किंवा या योजनेतील प्रमुख घटक पुढीलप्रमाणे :

१. टेरेसिंग, बंडिंग, ट्रेचिंग,नैसर्गिक कुंपणाचे काम करणाऱ्या वनस्पतींची लागवड करणे,इ. माध्यमातून ओलावा व मृदा संवर्धन करणे.
२. शेततळे, पाझरतलाव, साखळी सिमेंट बंधारे,सलग समतल चर इ. पर्जन्यजल संचयन योजना राबवणे.
३. विविधलक्षी झाडे, झुडपे,गवत लागवड करणे तसेच नवीन जमीनक्षेत्र विकसित करणे.
४. नैसर्गिक पुनर्निर्माणासाठी प्रोत्साहन देणे.
५. कृषी वनीकरण व फळबाग विकासाकरिता प्रोत्साहन देणे.

६. तंत्रज्ञान प्रसाराच्या उपायांची उपलब्धता करून देणे.

### ४.१.२.योजनेची ठळक वैशिष्टये:

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाची वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

१. पाणलोट विकासाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या कृषी आधारीत स्वयंरोजगाराच्या संधीद्वारे समाजघटकांची आर्थिक उन्नती साधने, ग्रामसभा व लोकसहभागातून स्थानिक परिस्थिती व उपलब्ध नैसर्गिक व पायाभूत साधन सामग्रीचा विचार करून प्रकल्प नियोजन करणे, मृद व जलसंधारण कामांसोबतच स्थानिक संसाधनावर आधारित स्वयंरोजगाराचे दीर्घकालीन नियोजन करणे.
२. पाणलोट विकास कार्यक्रमाबरोबरच पाणलोट प्लस कार्यक्रमाचे नियोजन व त्याची अंमलबजावणी करणे.
३. पाण्याच्या ताळेबंदाविषयी जनजागृती व सक्षमतेने पाणी वापर यासंदर्भात प्रबोधन करणे.
४. दीर्घकालीन शाश्वत रोजगारनिर्मितीवर भर देणे व कृषी आधारित अर्थव्यवस्था बळकट करणे, दीर्घकालीन शाश्वत देखभाल-दुरुस्ती कायमस्वरूपी सहभागी पध्दतीने करण्यासाठी पाणलोट देखभाल निधी उभारणे.
५. दुष्काळप्रवण क्षेत्र, वाळवंटी क्षेत्र व पडिक जमीन विकास घटक एकत्रित करणारा कार्यक्रम आहे.

६. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम हा १००० ते ५००० हेक्टर क्षेत्र असलेल्या सुक्ष्म पाणलोट क्षेत्राचा समूह आहे.
७. या योजनेचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे हि योजना ९०% केंद्र पुरस्कृत व १० % राज्यपुरस्कृत आहे. याचा कार्यकाळ ४ ते ७ वर्षांचा आहे.
८. या योजनेत सर्वसाधारण क्षेत्रासाठी प्रतीहेक्टर १२००० रु. तर डोंगराळ भागासाठी प्रतिहेक्टर १५००० रु.खर्च केला जातो.
९. हि योजना म्हणजे गाव, जिल्हा,राज्य, व केंद्र पातळीवर संस्थात्मक संरचना असणारा कार्यक्रम आहे.

### ४.१.३. पाणलोट क्षेत्र निवडीचे निकष :-

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत निवडल्या जाणाऱ्या पाणलोट क्षेत्रासाठी पुढील निकष ठरवले गेले आहेत.

१. गरिबी निर्देशांक. (गरीब लोकसंख्येची टक्केवारी )
२. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी.
३. त्या क्षेत्रात दिली जाणारी प्रत्यक्ष रोजंदारी.
४. लहान व सीमांत शेतकऱ्यांची टक्केवारी.
५. भूमिगत पाण्याची स्थिती.
६. दुष्काळप्रवण क्षेत्र व वाळवंटी क्षेत्रातील आर्द्रता निर्देशांक.
७. पर्जण्याधारित कृषी क्षेत्र .
८. पेयजल स्थिती.
९. नापीक जमीन.
१०. जमिनीची उत्पादन क्षमता. इ. निकष ठरविण्यात आले आहेत.

ही योजना राबविण्यासाठी राज्य स्तरीय नोडल यंत्रणा राष्ट्रीय पर्जन्यधारित कृषी प्राधिकरण यांच्या सूचनांनुसार राज्याने पाणलोट विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये समन्वयासाठी राज्यस्तरीय समन्वयासाठी म्हणून वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेची स्थापना केलेली आहे. तसेच जिल्हा स्तरावर पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र स्थापन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी हे अध्यक्ष, तर जिल्हा अधीकक्षक कृषी अधिकारी प्रकल्प व्यवस्थापक आहेत.

## तालुका स्तरावरील यंत्रणा:-

तालुका स्तरावर एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमासाठी कृषी विभाग,वनविभाग,सामाजिक वनीकरण विभाग,भूजल सर्वेक्षण विभाग, यापैकी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा मान्यता देईल त्यानुसार प्रकल्प कार्यान्वित यंत्रणा म्हणून काम पाहतात. तसेच एकूण मंजुर प्रकल्पांपैकी १/४ प्रकल्पांत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून निकष व अटी पूर्ण करणाऱ्या स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम पाहतात. तसेच प्रत्येक प्रकल्पासाठी पाणलोट विकास पथकाची स्थापना करण्यात येते हे पथक पाणलोट समितीला मार्गदर्शन करते.

## पाणलोट समिती:-

ग्रामस्तरावर पाणलोट समितीच्या सक्रीय सहभागाने प्रकल्पातील विकास कामे करण्यात येतात.

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम ही योजना अभ्यासावरून दुष्काळ निवारणासाठी अत्यंत महत्त्वाची योजना असल्याचे दिसून येते.

## ४.२. <u>महात्मा गांधी रोजगार हमी योजना</u> :-

ग्रामीण भागातील जनतेला रोजगार आणि उत्पन्नाचे साधन बनलेल्या 'महात्मा गांधी रोजगार हमी योजनेने २ फेब्रुवारी२०१६ रोजी दहा वर्षे पुर्ण केली आहेत. जागतिक स्तरावर देखील नावाजल्या गेलेल्या या योजनेला भरपूर प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.त्या दृष्टीकोनातून संशोधनाच्या अभ्यास विषयानुसार दुष्काळ निवारणाच्या दृष्टीने मनरेगा हि योजना कशा प्रकारे राबवली आहे त्याचा घेतलेला आढावा.

दुष्काळ आणि नापिकीमुळे ग्रामीण भागात ठराविक कालखंडानंतर ओढवणाऱ्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी ग्रामीण जनतेला किमान रोजगारची हमी देणारी योजना राबविणारे 'महाराष्ट्र' हे देशातील पहिले राज्य आहे. महाराष्ट्राच्या या रोजगार हमी योजनेपासून प्रेरणा घेत केंद्र सरकारने २ फेब्रुवारी २०१६ पासून महात्मा गांधी रोजगार हमी योजना सुरु केली आहे,त्यालाच मनरेगा असे म्हटले जाते.

**"महात्मा गांधी रोजगार हमी योजना कायदा (मनरेगा) म्हणजे, ग्रामीण भागातील कुटुंबातील एका प्रौढ व्यक्तीला एका आर्थिक वर्षामध्ये १०० दिवसांसाठी अकुशल काम उपलब्ध करून देणे होय."**

मनरेगामार्फत वेगवेगळया विभागातील योजनांची कामे पूर्ण केली जातात. मनरेगा अंतर्गत रोजगार निर्मितीचे प्रमाण २०१५ पर्यंत ७६% इतके झालेले आहे. तसेच आतापर्यंत मनरेगा योजने अंतर्गत खर्च झालेल्या एकूण रक्कमेपैकी सुमारे ६४% रक्कम ही कृषी व अनुषंगिक क्षेत्राशी संबंधीत कामकाजावर खर्च करण्यात आली आहे. तसेच एकूण ९४% मजुरी कामगारांच्या खात्यावर थेट जमा करण्यात आली आहे.या योजनेच्या खर्चाचे वाटप केंद्र सरकारकडून ७५% आणि राज्य सरकारकडून २५% अशा प्रकारे केले जाते.

मनरेगा कायद्याच्या अनुसूची १ मध्ये दिलेल्या यादीनुसार मजुरी, रोजगार पुरविताना ८ प्रकारच्या रोजगार क्षेत्रांमध्ये मान्यताप्राप्त कामे उपलब्ध करून दिली जातात.त्यात जलसंवर्धन व जलसंधारण , दुष्काळी स्थितिरोधन सिंचन कालवे, खासगी जमिनीवरील विकासकामे, पारंपारिक जलसाठ्याचे नूतनीकरण, पूरनियंत्रण आणि ग्रामीण दळणवळण इ. क्षेत्रामध्ये रोजगार निर्मिती केली जात असे परंतु सध्या मनरेगा योजनेनुसार ३० नवीन प्रकारच्या कामांचा समावेश करण्यात आला आहे. यांमध्ये पोल्ट्री, मत्स्य व्यवसाय, पाणलोट क्षेत्र कार्यक्रम, स्वच्छता कामे, कृषी परिस्थितीक झोन इ.कार्यक्षेत्रे आहेत. मनरेगा ही एकच अशी योजना आहे जी ग्रामपंचायत आपल्या पुर्ण अखत्यारीखाली राबवू शकते, शिवाय त्यासाठी ग्रामपंचायतीला सरासरी १५ लाख रुपयांपेक्षा जास्त निधी दिला जातो.

### ४.२.१. मनरेगा योजनेचा उद्देश :-

मनरेगा योजनेचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे आहेत:

१. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास मागणीनुसार आर्थिक वर्षातून किमान १०० दिवसांच्या मजुरी रोजगाराची हमी देणे जेणेकरून ग्रामीण भागात विहित गुणवत्ता आणि टिकाऊपणा असलेली उत्पादक मालमत्ता तयार होईल.

२. गरिबांच्या उपजीविकेचे स्त्रोत मजबूत करणे.

३. सामाजिक समावेशन सुनिश्चित करणे.

४. पंचायत राज संस्थांना बळकट करणे.

### ४.२.२. मनरेगा योजनेची वैशिष्टये :-

मनरेगा योजनेची वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत:

१. प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील अकुशल अंग मेहनतीचे काम करण्यास इच्छुक प्रौढ सदस्य ग्रामपंचायतीमध्ये आपले नाव, वय, व पत्त्याची नोंदणी करू शकतो,ही नोंदणी ५ वर्षांसाठी वैध असते. नोंदणी केल्यापासून १५ दिवसांच्या आत ग्रामपंचायत नोंदणीकृत कुटुंबास जॉब कार्ड जारी करते.

२. अर्जदाराने कामासाठी अर्ज केल्यापासून १५ दिवसांच्या आत त्यांच्या घरापासून ५ कि.मी. अंतराच्या परिसरात त्याला रोजगार पुरविला जातो. ५ कि.मी. अंतरापलीकडील कामासाठी त्यांना १०% अधिक मजुरी मिळते. कामाची मागणी केल्यापासून १५ दिवसांच्या आत काम न मिळाल्यास प्रतिदिन बेरोजगारी भत्ता दिला जातो.

३. कामाच्या ठिकाणी पाळणागृह, पेयजल, आरामकक्ष व प्रथमोपचार या सुविधा पुरविणे आवश्यक असते.

४. योजनेअंतर्गतच्या कामांमध्ये महिलांसाठी ३३% आरक्षणाची सोय आहे.

५. किमान ५०% कामे (खर्चाच्या दृष्टीने ) ग्रामपंचायतीकडून आमलात येणे आवश्यक आहे.

६. कंत्राटदार आणि रोजगार विस्थापित करणाऱ्या यंत्रसामग्रीच्या वापरास प्रतिबंध आहे. कामाची गुणवत्ता व टिकाऊपणा यासाठी यंत्राची गरज असणाऱ्या अपवादात्मक कामांसाठी यंत्रसामग्रीच्या वापरास परवानगी आहे.

७. योजनेअंतर्गत कामाचे निर्धारण, अंमलबजावणीचे परीक्षण व योजनेचे सामाजिक लेखापरीक्षण ग्रामसभेच्या माध्यमातून केले जाते.

८. मनरेगा योजनेंतर्गत ग्रामपंचायतीने नोंदणी अर्ज स्वीकारणे, अर्जाची छाननी करणे, कुटुंबाची नोंद करणे, जॉब कार्ड जारी करणे,कामाचे अर्ज स्विकारणे, अर्जदारास १५ दिवसांच्या आत रोजगार पुरविणे, कामाची व मजुरीची नोंद ठेवणे, लेखे ठेवणे, कायद्याच्या व योजनेच्या माहितीचा प्रसार करणे व महिन्यातून किमान एक दिवस रोजगार दिवस म्हणून साजरा करणे.

९. मनरेगा कायद्यानुसार केंद्र सरकार प्रत्येक आर्थिक वर्षासाठी मजुरी दर सुचित करते. सुचित मजुरी दरापेक्षा अधिक मजुरी दयावयाची झाल्यास त्याची तरतूद राज्य सरकारच्या तिजोरीतून करण्यात येते. पुरुष व स्त्रियांना कामानुसार सारखीच मजुरी दिली जाते.

मनरेगा योजनेमुळे दुष्काळासारख्या परिस्थितीमध्ये ग्रामीण भागातील कामगारांना शाश्वत व किमान उपजीविकेची सोय होते. या योजनेमुळे स्थलांतर व वेठबीगारीस आळा बसला आहे. तसेच मनरेगा योजनेंतर्गत देण्यात येणारी मजुरी मजुरांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येते. रोजगार उपलब्धतेमुळे ग्रामीण महिलांचे सबलीकरण होण्यास मदत झाली आहे. मनरेगायोजनेमुळे हाती घेण्यात आलेल्या कामांमुळे ग्रामीण भागात शाश्वत मालमत्तांची निर्मिती झाली आहे त्यामुळे ग्रामीण विकासास चालना मिळत आहे. म्हणून सलगच्या दुष्काळामुळे मोडकळीस आलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी मनरेगा योजनेला सध्यातरी पर्याय अस्तित्वात नाही, असे अभ्यासावरून दिसून येत आहे.

## ४.३. ' मागेल त्याला शेततळे' योजना :-

### ४.३.१. प्रस्तावना :-

राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचनाची उपलब्धता वाढविणे तसेच संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी 'मागेल त्याला शेततळे' ही योजना जाहीर करण्यात आली आहे. दुष्काळावर मात करण्यासह

शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी संरक्षित आणि शाश्वत सिंचन सुविधा निर्माण करण्यास प्रोत्साहन मिळावे, यासाठी 'मागेल त्याला शेततळे' ही योजना अनुदान पध्दतीने राबविण्यास राज्य मंत्रीमंडळाच्या ९ फेब्रुवारी २०१६ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

शेततळयांची कामे खाजगी क्षेत्रावर करण्यात येतात, ही कामे सर्वसाधारणपणे ७००मि.मी. व त्यापेक्षा जास्त पर्जन्यमान असलेल्या भागामध्ये व ज्या भागात जमिनीचा उतार ३ टक्क्यांपेक्षा कमी असेल अशा ठिकाणी २० गुणिले २० गुणिले ३ आकाराचे शेततळी घेण्यात येतात. जास्त पावसाच्या प्रदेशामध्ये पाण्याचा तात्पुरता निचरा होण्यासाठी शेततळी अत्यंत उपयुक्त असून पावसाचा ताण पडल्यास या शेततळयातील पाणी पिकांना सिंचन करण्यासाठी वापरता येते. शेततळयामुळे भूभागातील पाणीसाठ्यात वाढ होते. शेततळयांचा मुख्य उद्देश म्हणजे भूपृष्ठावरून वाहून जाणारे पावसाचे पाणी साठवून या पाण्याचा उपयोग संरक्षित जलसिंचनासाठी करण्याचा असला तरी भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता या कामाचा पुनर्भरणासाठी व अपवादात्मक परिस्थितीत जलनि:सारणासाठी सुध्दा होतो असे दिसून आले आहे. शेती उत्पादनामध्ये शाश्वतता आणणे तसेच दुष्काळावर कायमस्वरुपी मात करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने शेततळयासाठी ५० हजार रुपये इतके कमाल अनुदान निश्चित केले आहे. या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात ५१ हजार ५०० शेततळी बांधण्यात येणार असून त्यापेक्षा जास्त मागणी आल्यास त्या प्रमाणात उद्दिष्टामध्ये वाढ करण्यात येणार आहे.

### ४.३.२. योजनेचे उद्देश :-

'मागेल त्याला शेततळे'या योजनेचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत:

१. लाभार्थी:- टंचाईग्रस्त भागातील ज्या गावात मागील पाच वर्षात किमान एक वर्ष तरी ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी जाहीर झाली आहे अशा गावांमध्ये प्राधान्याने पहिल्या टप्प्यात ५१ हजार ५०० इतकी शेततळी घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यापेक्षा जास्त मागणी प्राप्त झाल्यास हा लक्ष्यांक वाढवण्यात येईल. दारिद्रयरेषेखालील व्यक्ती व ज्या शेतकरी कुटुंबात आत्महत्या झाली आहे. अशांच्या वारसांची प्राधान्याने निवड करण्यात येणार आहे. प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर शेततळयांची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जेष्ठता यादीतून लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.

२. या योजनेंतर्गत सात प्रकारच्या आकारमानाची शेततळी निश्चित करण्यात आली आहेत. त्यातील सर्वात मोठे शेततळे ३० बाय ३ मीटर तर सर्वात लहान शेततळयासाठी १५ बाय ३ मीटर असे आकारमान निश्चित करण्यात आले आहे.

३. सर्वात मोठया शेततळयासाठी कमाल ५० हजार रुपये इतके अनुदान निश्चित करण्यात आले आहे, तर इतर शेततळयांसाठी त्यांच्या आकारमानानुसार अनुदान प्राप्त होणार आहे. अनुदानाशिवाय जास्तीचा खर्च शेतकऱ्याला करावा लागणार असून शेततळयाचे काम पुर्ण झाल्यावर अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

४. जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा व समन्वय समिती या योजनेवर देखरेख करणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या

अध्यक्षतेखालील समिती सनियंत्रण व अंमलबजावणी करणार असून तालुका पातळीवरील समिती शेततळयांना मान्यता देणार आहे.

५. 'मागेल त्याला शेततळे' ही योजना कृषी आयुक्तालयामार्फत राबविण्यात येणार असून रोजगार हमी योजना विभाग तिचे कार्यान्वयन करणार आहे.

६. 'मागेल त्याला शेततळे' या योजनेसाठी लागणारा निधी Drought Mitigation Measures योजना या अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये रुपये ५० कोटी पुरवणी मागणीद्वारे व सन २०१६-१७ मध्ये रुपये २०७.५० कोटी इतका निधी मदत व पुनर्वसन विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. रोहयो विभाग, नोडल विभाग म्हणून ही योजना कार्यान्वीत करीत आहे.

**४.३.३.शेततळे व्याख्या :-**

पावसाच्या अनियमितपणा आणि लहरीपणा यावर बंधन घालणे आपल्या हातात जरी नसले तरी पावसाच्या पाण्याचे योग्य रितीने व्यवस्थापन केल्यास कोरडवाहू शेतीमधील अडचणींवर थोडयाफार प्रमाणात मात करता येते. महाराष्ट्रातील बऱ्याचशा कोरडवाहू जमिनी या काळया मातीच्या आहेत. यातून पडणाऱ्या पावसाचे पाणी हे जास्त प्रमाणात जमिनीवरून वाहते. साधारणत: हे प्रमाण पडणाऱ्या पावसाच्या ३० टक्के पर्यंत असते. असे हे पाणी अडवून, साठवून आणि नंतर गरजेच्या वेळी उपयोग घेणे हे शेततळयांच्या माध्यमातून शक्य आहे.

'शेतजमिनीतून वाहून जाणारे पाणी आपत्कालीन वेळी पिकास उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खोदलेल्या तळयास शेततळे असे म्हणतात'. शेततळी ही दोन

प्रकारची असतात. एक म्हणजे खोदून खड्डा तयार करणे व त्याचा तलाव करणे व दुसरे म्हणजे नाल्यात आडवा बांध टाकून पाणी अडवून तयार केलेला तलाव होय.अशा शेततळयाच्या वेळी शेतातील चांगली जमीन वाया जाणार नाही याची काळजी घेण्यात येते.

### ४.३.४. 'मागेल त्याला शेततळे' योजनेचे फायदे :-

'मागेल त्याला शेततळे' योजनेचे फायदे खालीलप्रमाणे आहेत:

१. शेतात तळे करून भुपृष्ठावरून वाहून जाणारे पाणी त्यात साठविणे व त्याचा उपयोग जलसिंचनासाठी करणे. पावसाच्या अनियमितपणामुळे जेव्हा पावसाअभावी पिकास ताण पडतो, अशा वेळी तळयात साठविलेल्या पाण्यामधून एखादे दुसरे पाणी पिकास देता आल्यास पिक हमखास येते.
२. आपत्कालीन स्थितीत पिकास पाणी देण्यासाठी पाणी उपलब्ध होते.
३. पुरक सिंचनामुळे पिकांच्या उत्पादनात वाढ होते.
४. मत्स्य संवर्धनासाठी उपयोग होतो.
५. भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण होते.

### ४.३.५.आकारमान निहाय शेततळे:-

आकारमान निहाय शेततळयाचे पृष्ठभागावरील क्षेत्रफळ ( चौ.मी.) आणि अपेक्षित खोदकाम (घ.मी.) खालीलप्रमाणे:

**अ) इनलेट आऊटलेट सह् शेततळे :-**

| अ.क्र. | आकारमान (घ.मी.मध्ये) | पृष्ठभागावरील क्षेत्रफळ (चौ.मी.) | होणारे खोदकाम (घ.मी.) | अनुज्ञेय अनुदान (रुपये). |
|---|---|---|---|---|
| १ | १५*१५*३ | २२५ | ४४१ | २२११० |
| २ | २०*१५*३ | ३०० | ६२१ | २९७०६ |
| ३ | २०*२०*३ | ४०० | ८७६ | ४०४६७ |
| ४ | २५*२०*३ | ५०० | ११३१ | ५०००० |
| ५ | २५*२५*३ | ६२५ | १४६१ | ५०००० |
| ६ | ३०*२५*३ | ७५० | १७९१ | ५०००० |
| ७ | ३०*३०*३ | ९०० | २१९६ | ५०००० |

**आ) इनलेट आऊटलेट विरहित शेततळे :-**

| अ.क्र. | आकारमान (घ.मी.मध्ये) | पृष्ठभागावरील क्षेत्रफळ (चौ.मी.) | होणारे खोदकाम (घ.मी.) | अनुज्ञेय अनुदान (रुपये). |
|---|---|---|---|---|
| १ | २०*१५*३ | ३०० | ६२१ | २६२०६ |
| २ | २०*२०*३ | ४०० | ८७६ | ३६९६७ |
| ३ | २५*२०*३ | ५०० | ११३१ | ४७७२८ |
| ४ | २५*२५*३ | ६२५ | १४६१ | ५०००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | ३०*२५*३ | ७५० | १७९१ | ५०००० |
| ६ | ३०*३०*३ | ९०० | २१९६ | ५०००० |

वरीलप्रमाणे या योजनेंतर्गत विविध आकारमानाच्या शेततळयापैकी कोणत्याही एका आकारमानाच्या शेततळयाची मागणी करता येते. अशा प्रकारे ही योजना राज्यभर राबविली जात आहे.

## ४.४. <u>'जलयुक्त शिवार अभियान' योजना</u> :-

### ४.४.१. प्रस्तावना :-

राज्यात सतत उदभवणारी टंचाई परिस्थिती विचारात घेऊन 'सर्वांसाठी, पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९' अंतर्गत 'जलयुक्त शिवार' अभियान राज्य शासनाने हाती घेतले आहे. २०१४-१५ मध्ये भुजल पातळीत २ मीटरपेक्षा जास्त घट झालेल्या १८८ तालुक्यातील २ हजार २३४ गावे तसेच शासनाने टंचाई परिस्थिती किंवा दुष्काळ जाहीर केलेल्या २२ जिल्ह्यातील १९ हजार ५९ गावांमध्ये हे अभियान प्राधान्याने राबवण्यात येत आहे. भविष्यात राज्याच्या उर्वरित भागात पाणी टंचाई निर्माण होऊ नये यासाठी उपाययोजना करण्यावरही भर दिला आहे. या अभियानात विविध विभागाकडील योजना, अशासकीय संस्था आणि लोकसहभाग यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

शासनाने ५ डिसेंबर २०१४ रोजी स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे या अभियानाची घोषणा केली आहे. जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रम हा शासनाचा एक महत्वकांक्षी प्रकल्प असल्याचेही शासनाने वेळोवेळी जाहीर केले आहे. अपुऱ्या आणि अनियमित पावसामुळे राज्यात टंचाई परिस्थिती निर्माण झाल्याने कृषी क्षेत्रावर त्याचा विपरित परिणाम होत आहे. या बाबी राज्याच्या विकासात एक आव्हान ठरत आहेत. राज्यात गेल्या चार दशकात पाण्याच्या पुरेशा उपलब्धते अभावी कोरडवाहू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनात मोठया प्रमाणात चढ-उतार दिसून येत आहेत. निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असणारी ही परिस्थिती बदलण्यासाठी हे अभियान एकात्मिक पध्दतीने तसेच लोक सहभागातून सर्व विभागांच्या समन्वयाने नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यात आला आहे. हे अभियान राबवल्यास पिण्याचे पाणी व पिकास संरक्षित सिंचन देण्याची व्यवस्था निश्चितपणे निर्माण होईल. गेल्या दोन वर्षात राज्यात पाणी अडविणे आणि जिरवण्यासाठी जलसंधारणाच्या राबवलेल्या विविध प्रणालीमुळे पाणी टंचाईवर मात करण्यास मदत झाली आहे. या सर्व कार्यक्रमांची फलश्रुती विचारात घेऊन 'जलयुक्त शिवार' अभियान राज्य शासनाने प्रभाविपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

**४.४.२. उद्देश :-**

'जलयुक्त शिवार' अभियानाचे काही प्रमुख उद्देश पुढीलप्रमाणे आहेत:

१. पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारातच अडविणे.

२. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे.

३. राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे, शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.
४. राज्यातील सर्वांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करण्याची शाश्वती निर्माण करणे.
५. भुजल अधिनियमांची अंमलबजावणी करणे.
६. विकेंद्रीत पाणी साठे निर्माण करणे.
७. पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नवीन कामे हाती घेणे.
८. अस्तित्वात असलेल्या व निकामी झालेल्या जलस्रोतांची पाणी साठवण क्षमता वाढविणे. उदा. बंधारे, गाव तलाव, पाझर तलाव, सिमेंट बंधारे इ.
९. जलस्त्रोतातील गाळ लोकसहभागाने काढून पाणीसाठा वाढविणे.
१०. पाण्याच्या ताळेबंदाबाबत आणि कार्यक्षम वापराबाबत प्रभावी जनजागृती तसेच वृक्ष लागवडीस प्राधान्य देणे.

**४.४.३. 'जलयुक्त शिवार' अभियाना अंतर्गत करण्यात येणारी कामे:-**

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे.

१. पाणलोट विकासाची कामे, साखळी सिमेंट नालाबांधाचे खोलीकरण आणि रुंदीकरणासह कामे करण्यात येणार आहेत.
२. जुन्या जलसंरचनांचे पुनर्जीवन करणे.
३. कोल्हापूर पद्धतीच्या व साठवण बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे.
४. पाझर तलाव, लघुसिंचन तलाव दुरुस्ती करणे.
५. नूतनीकरण व क्षमता पुनर्स्थापित करणे.

६. पाझर, गाव साठवण, शिवकालीन, ब्रिटीशकालीन, आणि निजामकालीन तलावातील माती व नालाबांधातील गाळ काढणे.
७. मध्यम व मोठया प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेनुसार प्रत्यक्ष वापर होण्यासाठी उपाययोजना करणे.
८. छोटे ओढे / नाले जोड प्रकल्प राबविणे.
९. विहीर, बोअरवेल पुनर्भरण, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत तसेच पाणी वापर संस्थांचे बळकटीकरण करणे.
१०. कालवा दुरुस्ती या उपाययोजनांवर भर देणे.

**४.४.४. जलयुक्त शिवार अभियानाची अंमलबजावणी :-**

जलयुक्त शिवार अभियानाची अंमलबजावणी पुढीलप्रमाणे यशस्वीरित्या करण्यात आली आहे.

१. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विभागीय स्तरावर समन्वय समिती .
२. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती.
३. उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती नेमण्यात आली आहे.

या सामित्यांच्याद्वारे जलयुक्त शिवार अभियानाची अंमलबजावणी यशस्वीरित्या करण्यात येत आहे.

राज्यात जलयुक्त शिवार अभियानासाठी विविध विभागाकडील विविध योजनांतर्गतउपलब्ध निधीची एकत्रित सांगड घालुन जलसंधारणाची कामे हाती

घेण्यात येत आहेत. यामध्ये कृषी, वन, सामाजिक वनीकरण, लघु सिंचन, जलसंपदा, जिल्हा परिषदेकडील कृषी व लघुसिंचन, पाणी पुरवठा व स्वच्छता, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा अशा जिल्हास्तरीय यंत्रणांमध्ये समन्वय राखून हे अभियान राबविण्यात येत आहे. याबरोबरच नाविन्यपूर्ण योजनांसाठी जिल्हा नियोजन समितीकडे उपलब्ध असलेला ३.५ टक्के निधी तसेच राज्य व जिल्हा स्तरावर उपलब्ध असलेला मदत व पुनर्वसन निधी जलयुक्त शिवार अभियानासाठी प्राधान्यक्रमाने वापरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तसेच जेसीबी चा वापर करून नाल्यातील गाळ काढणे तसेच खोलीकरण रुंदीकरण कामे घेण्याचे अधिकार शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या अभियानाचा आराखडा तयार करणे, प्रभावी अंमलबजावणी, समन्वय व संनियंत्रणासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांची तालुकास्तरावर तर जिल्हाधिकाऱ्यांची जिल्हा स्तरावर नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सर्वांसाठी पाणी- टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई/ दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी ‘जलयुक्त शिवार’ अभियान राज्यात राबवण्यात येत आहे.

## ४.५. <u>विशेष घटक योजना</u> :-

### ४.५.१. प्रस्तावना :-

अनु.जाती व नवबौध्द शेतकऱ्यांना दारिद्रय रेषेचे वर आणणेसाठी अर्थसहाय्य देणेची योजना म्हणून 'विशेष घटक योजना' ओळखली जाते. अनुसूचित जाती / नवबौध्द (वि.घ.यो.) तसेच आदिवासी उपाय योजना क्षेत्रातील / आदिवासी उपाययोजना क्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी १०० टक्के अर्थसहाय्य देण्याची योजना सन १९९३-९४ पासून महाराष्ट्र राज्यात राबवण्यात येत आहे. सन २०१२-१५ मध्ये ही योजना कार्यान्वित आहे.

विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जाती/जमाती व नवबौध्द लाभार्थ्यास ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गटवाटप, शेळया गटवाटप, तलंगा गटवाटप करण्यात येते. या योजनेंतर्गत ज्यांच्याकडे शासकीय अनुदानातील दुधाळ जनावरे आहेत, त्यांना प्रशिक्षणही दिले जाते. भाकड काळासाठी पशुखाद्य १०० टक्के अनुदानावर वाटप केले जाते. तसेच जंतनाशक व खनिज मिश्रणाचा पुरवठा ५० टक्के अनुदानावर केला जातो.

### ४.५.२. योजनेचा उद्देश :-

अनु.जाती व नवबौध्द शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये सुधारणा करून त्यांना मिळणाऱ्या शेती उत्पन्नात वाढ करणे. तसेच सदर वर्गवारीतील शेतकऱ्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावणे. हे विशेष घटक योजनेचे प्रमुख उद्देश आहेत.

### ४.५.३. योजनेच्या अटी व शर्ती :-

या योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. लाभार्थी शेतकऱ्याजवळ त्याचे स्वत:चे नावे ६ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी शेतजमीन असावी.

२. लाभार्थी हा अनु.जाती किंवा नवबौध्द जातीचा असावा .
३. संबंधीत लाभार्थीचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.५००००/- चे आत असावे.
४. शेतकरी स्वत: शेती विकासाची कामे हाती घेण्यास उत्सूक असावा.
५. वैयक्तिक लाभार्थी निवडताना महिलांना प्राधान्य राहील.
६. राज्य शासनाच्या समाजकल्याण कार्यालयाकडून पॉवर टिलरचा लाभ घेतलेल्या अगर त्यासाठी निवड केलेल्या लाभार्थीस लाभ दिल्यापासून पुढील ३ वर्षे सदर योजनेचा लाभ घेता येणार नाही.

**४.५.४. अनुदानाच्या बाबी :-**

या योजनेंतर्गत येणाऱ्या अनुदानाच्या बाबींचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे.

अ. जमिन सुधारणा, निविष्ठा, अवजारे, इनवेल, बोअर, पपसंच, पाईपलाईन, जुनी विहीर दुरुस्ती, नवीन विहीर, बैलजोडी, रेडेजोडी, बैलगाडी, शेततळे, तुषार / ठिबक सिंचन संच, ताडपत्री तसेच परसबाग इत्यादी बाबींसाठी अनुदान देय आहे.

आ. वरील बाबींपैकी जे लाभार्थी नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणार आहेत अशा लाभार्थींना जास्तीत जास्त रु. १०००००/- कमाल मर्यादेपर्यंत तर नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणार नाहीत अशा लाभार्थींना रक्कम रु.५००००/- कमाल मर्यादेपर्यंत वरीलपैकी केवळ एका घटकासाठी अनुदान देय आहे.

इ. जे लाभार्थी नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणार आहेत त्यांना इतर बाबींचा लाभ देय राहणार नाही.

ई. सदर योजनेंतर्गत निवड झाल्यापासून दोन आर्थिक वर्षापर्यंत लाभ देण्यात येईल.

योजनेच्या लाभासाठी ग्रामपंचायतीमार्फत अर्ज करावा लागेल. त्यानुसार ग्रामसभेत लाभार्थ्यांची शिफारस केली जाईल. पंचायत समितीमार्फत प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे जाईल. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीकडून लाभार्थ्यांची निवड करण्यात येते.

**विशेष घटक योजने अंतर्गत मंजुर बाबी व कमाल अनुदान मर्यादा तक्ता पुढीलप्रमाणे :**

| **अ.क्र.** | **मंजुर बाब** | **अनुदानाची टक्केवारी** | **अनुदानाची कमाल मर्यादा (रु.) मृदसंधारण निकषानुसार** |
|---|---|---|---|
| १ | जमीन सुधारणा (१ हे. | १०० | ४०००० /- |

| | | | |
|---|---|---|---|
| | मर्यादित ) | | |
| २ | पिक संरक्षण / शेतीची सुधारीत अवजारे | १०० | १०००० /- पर्यंत |
| ३ | प्रात्यक्षिकासाठी निविष्ठा वाटप<br>(१ हे. मर्यादित ) | १०० | ५००० /- पर्यंत |
| ४ | बैलजोडी / रेडेजोडी (स्थानिक बाजार भावानुसार ) | १०० | ३०००० /- पर्यंत |
| ५ | बैलगाडी | १०० | १५००० /- पर्यंत |
| ६ | जुनी विहीर दुरुस्ती | १०० | ३०००० /- पर्यंत (नाबार्डच्या निकषानुसार ) |
| ७ | इनवेल बोअरिंग | १०० | २०००० /- पर्यंत (नाबार्डच्या निकषानुसार) |
| ८ | पाईप लाईन | १०० | २०००० /- पर्यंत (३०० मी.पर्यंत नाबार्ड निकषानुसार) |
| ९ | पंपसंच | १०० | २०००० /- पर्यंत |
| १० | नवीन विहीर (रोहयो अंतर्गत) | १०० | रु.७००००/- ते १००००० /- पर्यंत |
| ११ | शेततळे | १०० | ३५००० पर्यंत मृदसंधारण निकषानुसार |
| १२ | परसबाग (फलोत्पादन निकषानुसार ) | १०० | रु.२०० प्रति गुंठा |
| १३ | तुषार / ठिबक सिंचन संच | १०० | रु.२५००० /- प्रती हेक्टर पर्यंत |
| १४ | ताडपत्री पुरवठा | १०० | रु.१०००० /- पर्यंत शासनाने निश्चित केलेल्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | दराप्रमाणे . |

अशा प्रकारे विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जाती /जमाती व नवबौध्द शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याची योजना कृषी विभागामार्फत राबवण्यात येत आहे.

## ४.६. <u>सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना</u> :-

### ४.६.१. प्रस्तावना :-

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात कृषी उत्पादनवाढीच्या दरात सलग चौथ्या वर्षी लक्षणीय घट आल्यामुळे भारतीय शेती संकटात असल्याच्या अगोदरच्या संकेतांची प्रचीती येत आहे.गेल्या तीन वर्षांपासून निसर्गाने चालु ठेवलेले तांडवनृत्य हे या अस्थिरतेचे मुख्य कारण आहे. जसे गेल्या वर्षी देशात पर्जन्याचे सरासरी प्रमाण ८८% एवढे राहीले. मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात पर्जन्यमान कमी राहिल्याने तीन वर्षे खरीपाची पेरणी वाया गेली. नंतरच्या रब्बी हंगामातही अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळाने रब्बीचे अतोनात नुकसान झाले. या सर्वांचा परिणाम म्हणजे धान्योत्पादनात ५% पेक्षा जास्त प्रमाणात घट होते आहे.देशातील संपुर्ण शेतीक्षेत्र आणि विशेषतः कोरडवाहू शेतकऱ्यांना संकटांशी मुकाबला करावा लागत आहे. निसर्गाच्या प्रकोपामुळे सन २०११-१२ मध्ये राज्यातील १०० तालुके अवर्षणग्रस्त होते.

सन२०१२-१३ मध्ये ही संख्या १३६ पर्यंत वाढली सन २०१३-१४ मध्ये अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेती उत्पादन घटले. गेल्या वर्षात म्हणजे २०१४-१५ मध्ये २२६ तालुके अवर्षणग्रस्त होते, आणि यावर्षीच्या रब्बी हंगामात गारपीट आणि अवकाळी पावसाने पुन्हा उभ्या पिकांना झोडपले. तात्पर्य गेल्या चार वर्षात निसर्गाच्या प्रकोपाचे बळी ठरलेल्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अतिशय बिकट झाली आहे. चालु वर्षात पुन्हा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेती क्षेत्राची स्थिती आणखी भयावह होणार हे नक्की. ह्या सर्व परिस्थितीवर मात करण्यासाठी दुष्काळी परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना शेतीत झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून शासनाने सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजनेस सुरवात केली आहे.

### ४.६.२. राष्ट्रीय कृषी विमा योजना :-

राष्ट्रीय कृषी विमा योजनेची सुरुवात १९९९-२००० पासून करण्यात आली आहे. ही योजना १९९९-२००० च्या रब्बी हंगामापासून राबवण्यात येत आहे. या योजनेचा उद्देश नैसर्गिक आपत्ती आणि किड रोगांमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण मिळावे, पिकांच्या नुकसानाच्या परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित रहावे यासाठी राज्यात “राष्ट्रीय कृषी विमा योजना” सुरु करण्यात आली.

या योजनेंतर्गत ‘प्रिमियम दर हा एकूण रकमेच्या बाजरी आणि तेलबियांसाठी ३.५%, इतर खरीप पिकांसाठी २.५%, गव्हासाठी १.५% आणि इतर रब्बी पिकांसाठी २% होता, ही पिक विमा योजना खरीप हंगामातील १६ व रब्बी हंगामातील ८ शेतीपिकांसाठी राबवण्यात येत आहे.

### ४.६.३. सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना :-

राष्ट्रीय कृषी विमा योजना अधिक अनुकूल करण्यासाठी या योजनेच्या अध्ययनासाठी एक संयुक्त गट स्थापन केला. या गटाने आपल्या प्रस्तावामध्ये अनेक बदल सुचविले. या सुधारणा लागू करण्यासाठी सरकारने प्रायोगिक तत्वावर मंजुर केले. तेव्हा ही सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना सन २०१०-११ मध्ये रब्बी हंगामात निवडक ५० जिल्ह्यात राबवण्यात आली. त्यानंतर सन २०१२च्या खरीप हंगामात ४४ जिल्ह्यात राबवण्यात आली होती. पुढे सन २०१२-१३ मध्ये रब्बी हंगामात ३५ जिल्ह्यात ही योजना राबविण्यात आली.

### ४.६.४. योजनेचे उद्देश :-

सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजनेचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१. नैसर्गिक आपत्ती, किडी, आणि रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास नुकसानीच्या प्रमाणात शेतकऱ्याला विमा संरक्षण मिळावे.
२. पिकांच्या नुकसानीच्या प्रमाणात विमा संरक्षण मिळावे.
३. पिकांच्या नुकसानीच्या परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राहील यासाठी राज्यात केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खरीप हंगाम २०१४ पासून राज्यात राष्ट्रीय पिक विमा कार्यक्रमांतर्गत ‘सुधारित राष्ट्रीय कृषी विमा’ योजना राबवण्यात येत आहे.

### ४.६.५. विमा संरक्षणाच्या बाबी :-

सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजनेंतर्गत नैसर्गिक आग , वीज कोसळणे, वादळ, गारपीट, चक्रीवादळ, पूर, भूस्खलन, दुष्काळ, किड व रोग या

शेतकऱ्यांना टाळता न येण्याजोग्या कारणांमुळे झालेल्या नुकसानीस विमा संरक्षण देण्यात येणार आहे.

### ४.६.६. योजनेची वैशिष्टये :-

सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजनेची वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१. ही योजना कर्जदार शेतकऱ्यांना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी सक्तीची आहे.
२. कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत भाग घेण्याची कार्यपद्धती राष्ट्रीय कृषी विमा योजनेप्रमाणेच आहे.
३. या योजनेत विमा हप्ता दर खरीप हंगामासाठी ११%, रब्बी हंगामासाठी ९% व नगदी पिकांसाठी १३% असा मर्यादित ठेवण्यात आला आहे.
४. या योजनेसाठी पिकांचा जोखीमस्तर ८०% ठेवण्यात आला असून वास्तवदर्शी दराने विमा हप्ता आकारण्यात येणार असल्याने नुकसान भरपाईची रक्कम संबंधित विमा कंपनीकडून अदा केली जाणार आहे.
५. उंबरठा उत्पन्न निश्चित करण्यासाठी मागील सात वर्षांतील नैसर्गिक आपत्ती आदींची दोन वर्षे वगळून किमान पाच वर्षांच्या पिकांचे सरासरी उत्पन्न विचारात घेतले जाणार आहे.
६. गारपीट, भूस्खलन, दुष्काळ यांसारख्या स्थानिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिक नुकसानीस वैयक्तीक स्तरावर विमा संरक्षण दिले जाणार आहे.

७. हंगामातील प्रतिकुल परिस्थितीत शेतकऱ्यांच्या अपेक्षित उत्पन्नामध्ये सरासरी उत्पन्नाच्या ५०% पेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर हवामान घटकांची आकडेवारी किंवा उपगृहाद्वारे प्राप्त होणाऱ्या छायाचित्रांना अनुसरुन किंवा राज्य शासनाकडील बाधित क्षेत्राचा अहवाल या प्रातिनिधिक निर्देशांकांच्या आधारे अपेक्षित नुकसान भरपाई रक्कमेच्या २५% रक्कम आगाऊ देण्यात येणार आहे. ती अंतिम नुकसान भरपाईतून समयोजित करण्यात येणार आहे.
८. किनारपट्टीच्या प्रदेशात चक्रीवादळामुळे शेतात कापलेल्या पिकांना (कापणीनंतर दोन आठवड्यांपर्यंत ) विमा संरक्षण देय आहे.
९. हवामान आधारित पिक विमा योजनेसाठी निवडण्यात आलेले जिल्हे व पिके या योजनेतून वगळण्यात आले आहेत.

**४.६.७. योजनेत समाविष्ट पिके व शेतकरी :-**

सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजनेंतर्गत अन्नधान्य पिके, (कडधान्य, तृणधान्य), तेलबिया, कांदा, कापूस या पिकांना विमा संरक्षण देण्यात येणार आहे. ही योजना राज्यात खरीप हंगामासाठी अधिसूचित केलेल्या ग्रामपंचायत स्तरावर किंवा महसूल मंडल /मंडलगट स्तरावर किंवा तालुका/ तालुकागट स्तरावर अधिसूचित पिकांसाठी राबवण्यात येणार आहे. अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित पिके घेणारी कुळे अगर भाडेपट्ट्याने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसह सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत.

## ४.६.8. योजना कार्यान्वीत करणारी यंत्रणा :-

सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना राज्यात भारतीय कृषी विमा कंपनीबरोबरच केंद्रशासनाने मान्यता दिलेल्या व निवडण्यात आलेल्या इतर खासगी कंपन्यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार आहे. ही योजना कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपुर या विभागांतील प्रत्येक जिल्ह्यांच्या महसूल विभागांतर्गत भारतीय कृषी विमा कंपनी, मुंबईद्वारे ही योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.

सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असून त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य कायम राखण्यास निश्चितच मदत होणार आहे.शेतकऱ्यांनी उच्च प्रतीचे आधुनिक तंत्रज्ञान आणि सामग्री वापरावी यासाठी त्यांना या योजनेद्वारे प्रोत्साहन मिळणार आहे.या योजनेचा राज्यातील अधिकांश शेतकऱ्यांना लाभ घेणे आवश्यक आहे.

# प्रकरण ५ वे –माहितीचे संकलन

## अनुक्रमणिका


| अ.क्र.नं. | तपशील | पान नं. |
|---|---|---|
| ५ | **माहितीचे संकलन** | ४७ – ६२ |
| ५.१. | प्रस्तावना | ४७ – ४८ |
| ५.२. | माहितीचे संकलन | ४९ – ६१ |


## ५.१. प्रस्तावना:-

खटाव तालुक्यातील दुष्काळीभागातील भटके-विमुक्त महिलांच्या सद्य स्थितीचा अभ्यास करताना अशी माहिती मिळाली की, खटाव तालुका हा सातारा जिल्ह्यातील सर्वांत जास्त दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जातो. खटाव तालुक्यामध्ये महाराष्ट्रातील सर्वात कमी म्हणजेच २९ सें.मी. इतकी पावसाची नोंद केली जाते, त्यामुळे खटाव तालुक्यास सर्वात कमी पावसाचा / पर्जन्यछायेचा प्रदेश म्हणूनही ओळखले जाते. या विषयाचा अभ्यास करताना मागील तीन वर्षांची माहिती व आकडेवारी संकलीत केली आहे. तसे पाहायला गेले तर २००२ नंतर वारंवार या तालुक्याला दुष्काळाच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागले आहे.हा अभ्यास करताना दुष्काळा मुळे सर्वात जास्त महिलांना सामोरे लागत आहे असे दिसून आले. हा अभ्यास करत असताना दुष्काळ हा सर्व बाजूनी कसा पडलेला आहे.याचा ही चिक्तसक अभ्यास करण्यात आला.दुष्काळा मुले भटक्या-विमुक्त महिलांची रोजगारासाठी, पाण्यासाठी,

आरोग्याची, मुलांच्या शिक्षणाची, जनावरांची कशी फरफट होत आहे. याचा ही प्रतेक्षात मुलाखतीच्या, गावपातळीवरील लोकांच्या बैठका,संबधित विभागाचे अधिकारी शासकीय योजना या सर्व घटकांचा बारकाईने अभ्यास करण्यात आला आहे.खटाव तालुक्याची भौगोलिक शैक्षणिक परिस्थिती शेती या सर्व घटकांनवरती पण प्रकाश टाकण्यात आला आहे.भटक्य-विमुक्त महिलांना पाणी व्यवस्थापन विषयी कोणत्याही प्रकारची माहिती नाही.अभ्यासाठी निवडलेल्या कार्यक्षेत्रा मध्ये भटक्या-विमुक्त महिलांच्या विकासाच्या दृष्टीने कोणत्या ही शासकीय योजना नाहीत.ग्रामपंचायत मध्ये महिलांचा सहभाग नाही.वस्ती मध्ये सांडपाण्याची व्यवस्था नाही.वापराचे पाणी तलावाचे १५ दिवसातून एकदा सोडले जाते. त्या पाण्यावरती कोणत्या ही प्रकारची प्रक्रिया केली जात नसल्याचे दिसून आले आहे. मुलांच्या बालविवाह,महिलांच्या हिंसा.व जातीय-भेदभाव शिक्षणाचा अभावहे ही प्रश्न महिलांच्या अभ्यास करताना विचारात घेण्यात आले आहेत. केला खटाव  मधील जनतेला वारंवार दुष्काळाशी सामना करावा लागत आहे. जिल्यात एकमेव तालुका असा आहे की, राजकारण्यांनी आजवर फक्त घोषणांचा आणि आश्वासनांचा पाऊस पाडायचा परंतु पडलेला पाऊस आडविण्यासाठी किंवा बाहेरून पाणी उचलून शेतीला व लोकांना  देण्यासाठी ६८ वर्षे लावली आहेत. तालुक्यात एकमेव मोठे असलेले येरळवाडी धरण कोरडे पडत चालले आहे. तर म्हस्कोबाच्या डोंगराळ भागात उगम पावणारी येरळा नदी कोरेगाव व खटाव या तालुक्यांतून वाहत जाऊन पुढे सांगली जिल्ह्यात प्रवेश करते.तसेच गावो-गावातील ओढे, विहिरी, साखळी सिमेंट बंधारे, मागील १० वर्षापासून कोरडे पडलेले दिसून येतात, हे उपलब्ध माहिती आणि प्रत्यक्ष पाहणी करून निदर्शनास आले आहे.दुष्काळाशी सामना करताना सर्वात जास्त

महिलांना सामोरे जावे लागते.कारण पाण्याशी महिलांचा जवळचा संबंध आहे.त्यातून भटक्या-विमुक्त महिलांची भटकंती-रोजंदारी यामध्ये महिलांना वेगवेगळया समस्यांना सामोरे जावे लागत आहे.ही परस्थिती सद्याची स्थिती आहे.आणि आव्हानात्मक आहे.

टँकरणे ने तालुक्यातील लोकांना पाणी पुरवले जाते पण ,ते पाण्याचे टँकर भटक्या-विमुक्तच्या वस्तीवर कधी येताना दिसत नाहीत.त्यामुळे लोक खाजगी टँकरचे पाणी विकत घेतात.ते पाणी विकत घेणे परवडत नाही. खटावच्या जनतेला वारंवार तोंड द्यावे लागत असल्यामुळे तेथील जनतेचे स्थलांतर होण्यास सुरुवात झाल्याचे दिसून आले म्हणूनच ही परिस्थिती समजून घेण्यासाठी ह्या विषयाचा करण्यात आला आहे.

प्रस्तुत शोध निबंधाच्या माहितीचे संकलन करण्यासाठी खटाव तालुक्यातील निवडक ६ गावांमधून प्रत्येकी २० महिलांचे व ६ ग्रुप मिटिंग आणि इतर विभागीय अधिकारी यांच्या मुलाखती घेऊन त्यांच्याकडून एक प्रश्नावली भरून घेऊन मिळालेल्या माहितीचे संकलन यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

## ५.२. माहितीचे संकलन :

दुष्काळी भटके-विमुक्त महिलांच्या मुलाखती घेऊन त्यांच्याकडून एक प्रश्नावली भरून घेऊन मिळालेल्या माहितीचे संकलन यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

### ५.२.१.दुष्काळाची सद्यस्थिती समजून घेणे –

खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्यस्थितीचा अभ्यास करत असताना प्रथमतः खटाव तालुक्याची दुष्काळी परिस्थिती समजून घेणे गरजेचे होते. म्हणून महाराष्ट्राचा दुष्काळ ,तालुका,आणि जिल्हा अशी रंचना करून प्रत्येक भागावर चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. याची सविस्तर माहिती प्रकरण एक मध्ये मांडणी करण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्यातील खटाव हा दुष्काळी तालुका आहे. खटाव तालुक्या मध्ये भटक्या-विमुक्त समाजाची लोकसंख्या सर्वात जास्त आहे . सद्या खटाव तालुक्या मध्ये लोकांना पिण्यासाठी पाणी नाही. लोक ३ ते ४ किमी अंतरावर जाऊन विकत पाणी आणतात. शासकीय विरीच्या माध्यमातून येरळवाडी नदीवर धरण आहे त्या धरणाचे उचलून पाणी ग्रामपंचायत पेयजल योजनेच्या मदतीने गावागावामध्ये पुरवले जाते. हे पाणी लोकांना आरोग्याच्या दृष्टीने धोक्याचे आहे. हे पाणी लोकांना विकत दिले जाते.१५ दिवसातून एकदा पाणी सोडले जाते.ते ही १५ ते २० मिनिट सोडले जाते. त्यामध्ये लोकांना ८ दिवस पुरेल एवढे ही पाणी मिळत नाही . पाणी सोडण्याच्या वेळा ही ठरलेल्या नसल्या मुळे कधी रात्रीच्या २ वाजता पाणी सोडले जाते तर कधी दुपारच्या उन्हाच्या फाटक्या मध्ये १ वाजता सोडले जाते त्यामुळे महिलांच्या रोजगारावर परिणाम होतो उशिरा गेल्यामुळे रोजगार कापला जातो तर पाण्याची वाट पाण्यात मुलांची शाळा बुडते. महिलांना कमी रोजगारामध्ये काम करावे लागते मजुरी पण कमी मिळते..बर्याच गावांना या धरणाचे पाणी असल्यामुळे मोटारी सातत्याने स्पोट होतात.त्यामुळे तर पाणीच येते नाही.त्या मोटारी दुरुस्त करण्यासाठी ग्रामपंचायतिला परवडत नाही म्हणून लोकांच्या वापरायच्या पाण्याची पण फरफट होते.महिलांना डोक्यावरून १ किमी अंतरावरून

पिण्यासाठी पाणी आणावे लागते..मुलांच्या प्राथमिक शाळेमध्ये पाण्याची टाकी आहे पण त्यात पाण्याची व्यवस्था नाही. ती टाकी अस्वच्छ असते मुलांना घरून पिण्यासाठी पाणी घेऊन जावे लागते.१ लिटर पाणी घरापासून शाळेपर्यंतघेऊन जाने मुलांना ओजे झेपत नाही.मुलांच्या शौचालय मध्ये पाण्याची सोय नाही. भटक्या-विमुक्त फिरस्ती करणर्या महिलांना रोजगारासाठी दिवस भर उन्हामध्ये फिरावे लागते रोजची चूल पेटेल एवढे ही पैसे मिळत नाहीत.त्यामुळे दुष्काळी भागातील महिलांना रोजगारासाठी पुणे,मुंबई,रत्नागिरी,नाशिक,कोल्हापूर या भागनमध्ये स्थलांतर व्हावे लागते.त्यामुळे मुलांच्या शिक्षणावर परिणाम होतो आणि मुलांचे  शाळाबाह्यचे प्रमाण वाढले जाते.घरी कोण नसल्यामुळे मुलींच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण होतो त्यामुळे बालविवाह चे प्रमाण वाढले आहे. खटावतालुक्या मध्ये मोठ्या प्रमाणावर लोकानी बोरवेल मारलेल्या दिसून आहेत.त्यामुळे जमिनीतील पाणी साठी पूर्णतः कमी झालेला असून हातपंप आणि विहिरींना पाजार नाही.नद्काठ्च्या ज्या शेतकऱ्यांची जमिनी आहेत त्यांनी जास्त पाण्याची पिके घेतल्यामुळे धरणातील पाण्याचासाठा कमी होऊवून लोकांना पिण्याच्या पाण्याचे अडचणी निर्माण झाल्या आहेत.तालुक्यामध्ये रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.शासकीय योजना ह्या कागदावरच आहेत प्रत्येक्षात त्याची कामे होताना दिसत नाहीत.लोकांन पर्यंत त्याची माहिती ही पुरवली जात नाही,त्या योजनांची जनजागृती केली जात नाही. ही माहिती प्रत्येक्षात वस्तीपातळीवरील लोकांशी चर्चा करून व निरीक्षणाच्या माध्यमातून गोळा करण्यात आली आहे.

खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्य-स्थितीचा अभ्यास या संशोधन विषयची माहिती संकलित करीत असताना खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील महिलांच्यावर होणारे परिणाम या बद्दलची माहिती व मुलाखतीना विचारलेल्या प्रश्नांची प्रतिक्रिया पुढील तक्ता नुसार दर्शवण्यात आली आहे.

**तक्ता क्र.१. तुमचे शिक्षण झाले आहे का?**

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक | २५ | २०.८३ |
| २ | माध्यमिक | २८ | २३.३३ |
| ३ | उच्च माध्यमिक | ५ | ४.१७ |
| ४ | अशिक्षित | ६२ | ५१.६७ |
| **एकुण** | | **120** | **१००%** |

वरील तक्ता क्र.१ मधील आकडेवारीवरून असे दिसून आले की,खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचे शिक्षणाचे प्रमाणात प्रमाण पाहिल्यास असे दिसून येते कि ५१.६७ % महिला ह्या अशिक्षित असल्याचे दिसून येते.२०.८३% महिला ह्या प्राथमिक इयत्ते पर्यंत शिकलेल्या आहेत.२३.३३% महिला माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे.व ४.१७% महिला ह्या उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे.

असे दिसून येते कि आज ही भटक्या-विमुक्त समाजामध्ये महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येते. सही पुरते शिक्षण मुलीना आले कि बस झाले असा समज आज ही भटक्या-विमुक्त समाजातील लोकांच्या मध्ये असल्याचे दिसून आले.उच्च शिक्षणासाठी घरातून परवानगी मिळत नाही.आर्थिक परिस्थिती ही नसल्यामुळे उच्चशिक्षण घेण्यासाठी दुसर्या गावाला जावे लागते बसच्या सोई नसल्यामुळे आणि पाससाठी आर्थिक खर्च येतो.त्यामुळे पुढील शिक्षण पूर्ण करता आले नाही. असे ही काही महिलांनी मुलाखतीच्या दरम्यान सांगितले.आणि बाहेर गावी शिक्षणास गेल्यावर संरक्षणाचा प्रश्न येतो रस्त्याने येताना जाताना अडचणी येतात.रस्ते माळरानातून जातात. रस्त्याला वहातुक कमी असते.गावामध्ये १२ वी पर्यंत शिक्षणाची सोय असली तरी वस्ती वरून शाळेचे अंतर हे २ ते ३ किमी असल्यामुळे दररोज चालत एवड्या लांब जाने शक्य होत नाही.असे ही महिलांनी शिक्षणाविषयी समस्या सांगितल्या.ज्या महिला उच्च शिक्षण घेतलेल्या आहेत त्या महिला ही पारंपारिक व्यवसाय करताना दिसतात.

## ५.२.२. – दुष्काळ भागातील भटके-विमुक्त समाजातील महिलांची वैवाहिक परिस्थिती?

खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त समाजातील महिलांची वैवाहिक परिस्थिती विषयी माहिती खालील तक्ता क्र. २ मध्ये नोंदविलेल्या आहेत.

**तक्ता क्र.२. तुम्ही विवाहित आहात का ?**

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विवाहित | १०२ | ८५.% |
| २ | अविवाहित | ७ | ५.८३ % |
| ३ | विधवा | १० | ८.३३ % |
| ४ | परितक्त्या | १ | ०.८३ % |
| ५ | घटस्पोटीत | ० | |
| | **एकूण** | **१२०** | **१०० %** |

तक्ता क्र. २ वरून असे निदर्शनास आले की , संशोधन विषयाच्या माहिती संकलनासाठी निवडलेल्या एकुण १२० महिला१०२ महिला विवाहित आहेत ७ महिला अविवाहित आहेत १० महिला विधवा आहेत तर ० घटस्पोटीत आहेत.भटक्या- विमुक्त समाजातील महिलांना जातपंचायत असल्यामुळे घटस्पोट होत नाही.ही प्रथा या समाजात नाही.विधवा पुनर्विवाह केले जात नाहीत.विधवा महिलांना शासकीय योजेनेचा लाभ मिळालेला नाही त्या विषयी त्यांना माहिती नाही.शासकीय अधिकाऱ्या कडून महिलांना योग्य ती माहिती पुरवली जात नाही.

**५.२.३. विवाहाच्या वेळीची वयोमर्यादा ?–**

माहितीचे संकलन करित असताना भटक्या-विमुक्त समाजातील महिलांच्या विवाहाविषयी महिलांच्या प्रतिक्रिया व येणाऱ्या समस्या जाणून

घेण्यात आल्या त्या प्रतिक्रियांची माहिती तक्ता क्र.३ मध्ये दर्शवण्यात आली आहे.

**तक्ता क्र.३. – विवाहाच्या वेळीची वयोमर्यादा**

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वय वर्ष १५ | ५५ | ४५.८३% |
| २ | वय वर्ष १६ | २४ | २०% |
| ३ | वय वर्ष १७ | १८ | १५% |
| ४ | वय वर्ष १८ | १५ | १२.५०% |
| ५ | वय वर्ष १९ च्या पुढे | ८ | ६.६७% |
| **एकुण** | | **१२०** | **१०० %** |

वरील तक्ता क्र.३वरून असे निदर्शनास आले कि, खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचे विवाहाचे वययाविषयी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.४५.८३ % महिलांचे मत आहे कि मुलींचे लग् हे वयाच्या १५ व्या वर्षी केले जाते. २०% महिलांचे मत आहे कि मुलींची लग्नाचे वय १६ व्या वर्षी केली जातात.१५%महिलांनी सांगितले कि मुलीचे १७ व्या वर्षी विवाह केले जातात.१२.५०% महिलांचे मत आहे कि १८ वर्ष असताना केले जाते आणि ६.६७% महिलांचे मत आहे कि विवाहाचे वय हे १९ वर्ष आहे.यामध्ये असे दिसून येते कि मुलींच्या बालविवाह चे प्रमाण हे जास्त

आहे.याविषयी महिलांची चर्चा करताना त्यांनी वेगवेगळी मते मांडली.भटक्या-विमुक्त समाजातील मुलींची लग्न ही लहान वयात केली जातात.बालविवाह करण्याची प्रमुख करणे महिलांनी सांगितली.भटक्या-विमुक्त समाजात स्वतंत्र न्याय पंचायत असल्यामुळे इतर जातीमध्ये मध्ये मुली पळून जाऊ नयेत म्हणून लग्न केली जातात.समाजाच्या आजूबाजूला मुलीना संरक्षण नाही.मुलीनवर्ती अत्याचाराचे प्रमाण वाढत असताना आमच्या मुलींच्या सरक्षणाची जबाबदारी प्रामुख्याने आई-वडिलांवरती येते.आम्ही फिरास्तीसाठी बाहेरगावी जातो.त्यामुळे मुलींचा लवकर विवाह केले जातात अशी प्रतिक्रिया महिलांनी दिली. ही एक सामाजिक हिंसा आहे असे निरीक्षणातून लक्षात आले.हा ही एक प्रकारचा दुष्काळी भागातील महिलांच्या संदर्भात सामाजिक दुष्काळच आहे.

याचा अर्थ खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील शालेय मुलींना मोफत पासची कोणतेही सोई अद्याप सुरु केलेली नाही.त्यामुळे उच्च शिक्षणामध्ये मुलींचे शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे.

### ५.२.४. तुमच्याकडे रेशन कार्ड कोणत्या प्रकारचे आहे ?–

खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील भटके-विमुक्त महिलांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करताना कुटुंब कडे रेशन कार्ड असल्याचे ही माहिती गोळा करण्यात आली आहे.दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांची रेशन-धान्य आणि रेशन कार्ड विषयी मुलाखती दरम्यान महिलांनी सांगितलेल्या प्रतिक्रिया व मांडलेल्या अडचणी खालील तक्ता क्र.४ मध्ये दर्शविल्या आहेत.

**तक्ता क्र.४.** तुमच्याकडे रेशन कार्ड कोणत्या प्रकारचे आहे ?

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पिवळे | ४० | ३३.३३% |
| २ | केशरी | ५६ | ४६.६७% |
| ३ | पांढरे | १ | ०.८३% |
| ४ | रेशनकार्ड नाही | २३ | १९.१७% |
| | **एकुण** | **१२०** | **१०० %** |

वरील तक्ता क्र. ४.नुसार एकूण ३३.३३ % महिलांकडे पिवळे रेशन कार्ड आहे. ४६.६७% महिलांच्याकडे केशरी रेशनकार्ड उपलब्ध आहे.०.८३%महिलांना कडे पांढरे रेशनकार्ड आहे १९.१७% महिलांकडे रेशन कार्ड उपलब्ध नाही.खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके- विमुक्त महिलांचा अभ्यास करताना रेशनकार्ड याविषयी माहिती जाणून घेण्यात आली.रेशन कार्ड मिळवताना बर्याच महिलांना अडचणी येतात.शासकीय अधिकारी कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी सातत्याने कार्यालयीन चकरा घालण्यास लावतात. रेशन कार्ड हे महत्वाचे असल्यामुळे इतर कोणतीच कामे करता येत नाहीत.वहातुकीच्या सोई उपलब्ध नसल्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करताना अडचणी निर्माण होतात. अपुरी माहितीच्या अभावामुळे महिलांना रेशन कार्ड मिळवताना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागते. गावपातळीवरील अन्तोदय दारिद्र रेषेखालील लोकांची यादीची तपासणी करता त्यामध्ये गावातील उच्च घरातील व ज्या लोकांना जमिनी आहेत अशा लोकांची नावे या यादीमध्ये समाविष्ट आहेत.याची प्रत्येक्षात पाहणी करण्यात आली आहे.

भटक्या-विमुक्त समाजातील लोकांची चालू यादीमध्ये एकही कुटुंब नाही अशी परीस्थित गावामध्ये आहे. रेशनकार्ड कडून देतो असे बोलून भटक्या-विमुक्त लोकांची पैशासाठी पिळवणूक केली जाते.अशिक्षित पणाचा इतर लोक फायदा घेतात आणि भटक्यांची आर्थिकदृष्ट्या फसवणूक केली जाते.असे ही महिलांनी सांगितले.

### ५.२.५. शैक्षणिक परिस्थिती ?-

खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्य स्थितीचा अभ्यास करताना शैक्षणिक परिस्थीचा अभ्यास करण्यात आला आहे. याबद्दलच्या प्रतिक्रिया खालील तक्ता क्र.५ मध्ये दर्शविण्यात आल्या आहेत.

**तक्ता क्र.५. गावामध्ये शैक्षणिक सुविधा आहे का ?**

| **अ.क्र.** | **तपशील** | **उत्तरदात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | १२० | १००% |
| २ | नाही | ० | |
| | **एकुण** | **१२०** | **१००%** |

वरील तक्ता क्र.५ नुसार खटाव तालुक्यातील एकूण १००% महिलांनी गावामध्ये शैक्षणिक सुविधा असल्याचे सांगितले आहे त्यापैकी ०.८३% महिलांनी प्राथमिक शाळेची सुविधा आल्याचे सांगितले आहे.४९.१७%महिलांनी उच्च माध्यमिक पर्यंत शैक्षणिक सुविधा असल्याचे सांगितले आहे.आणि ५०% महिलांनी महाविद्यालयीन शिक्षणाची सोय

असल्याचे सांगितले आहे.६६.६७%मुल शाळेत दाखल आहेत.आणि ३३.३३% मूल शाळाबाह्य आहेत.शाळाबाह्य असल्याची वेगवेगळी करणे महिलांनी सांगितली आहेत त्यापैकी ३.३३% मुल स्थलांतरीत असल्याचे सांगितले आहे.४.१७%मुलांची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे शाळाबाह्य आहेत. २.५०% मुलांना शाळेची आवड नाही २३.३३% मुल शाळेसाठी अपात्र आहेत.खटाव तालुका हा शैक्षणिकदृष्ट्या विकसित आहे.४९.१७% मुल ही पुढील उच्चशिक्षणासाठी तालुक्याच्या ठिकाणी शिक्षणासाठी  घेण्यासाठी जातात. सरासरी मुलाच्या शिक्षणाला वार्षिक खर्च ५ हजार ते १० हजार पर्यंत येतो.असे महिलांनी सांगितले आहे. प्राथमिक शाळेच्या ठिकाणी मुलांच्या पिण्याच्या पाण्याची सोय नाही,मुलांनी घरातून पाण्याची बोटल सोबत घेऊन जावे लागते.मुलांच्या दररोजच्या दप्तारचे ओझे एवढे असते घरापासून शाळेचे अंतर हे १ ते दीड किमी आहे.तिथ पर्यंत जाई पर्यंत मुल कांटाळ करतात आणि शाळात जाण्याची टाळाटाळ करतात.बर्याचशा मुलांना शाळा बुडवून पाणी भरण्यासाठी  घरी यावे लागते.पाणी येण्याची वेळा ठरलेल्या नसल्यामुळे पाणी आल्यावर लहान मुल देखील पाणी भरण्यास मदत करतात.ज्यांच्या घरी मोठी माणसं  रोजगाराला जातात त्यांची घरी असणारी  लहान मुलं शाळा बुडवून घरात पाणी भरण्यास थांबतात.म्हणजे दुष्काळा मुले मुलांच्या शिक्षणावर ही परिणाम होताना दिसतो. बर्याचशा महिलांनी मुलांच्या शिक्षणाविषयी वेगवेगळी मते मांडली आहेत.भटक्या-विमुक्त मुलांना शाळेतून कोणतेही शालेय मटेरियल मोफत मिळत नाही परीक्षा फी भरावी लागते.शाळेचा गणवेश चा खर्च पण पालकांना करावा लागतो.मुलांना शाळे पर्यत जाण्या येण्यासाठी बसची सोय नाही.मुलीना शिष्यवृत्ती मिळते ती ही वेळेत भेटत नाही त्यामध्ये मुलींचे

शिक्षण पूर्ण करणे अशक्य आहे.एका कुटुंबामध्ये ४ ते ५ मुल असल्यामुळे एवड्या मुलांचा शैक्षणिक खर्च परवडत नाही.त्यांमध्ये दुष्काळी भाग पाण्याची अडचण रोजगार नाही अशा वेळी मुलांना मोफत शिक्षण मिळाले पाहिजे असे महिलांनी सांगितले.

### ५.२.६. – महिलांचे आरोग्य स्थिती :

खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्यस्थितीचा अभ्यासाची माहिती संकलित करताना महिलांच्या आरोग्याची परिस्थिती विषयी महिलांच्या समस्या जाणून घेण्यात आल्यासर्व भटके-विमुक्त महिलांच्याविशेष:शेती व शेती बाह्य व्यवसायात असलेल्या महिलांच्या जगण्यावर दुष्काळाचा काय व कसा परिणाम होतो.आधीच दुर्लक्षित गेलेल्या महिलांना पोषणाच्या रोजगाराच्या कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते.महिलांच्या रोजच्या किचकट कामात आणखी कोणत्या कामाची भर पडते.महिलांच्या समस्या दुष्काळात कसे रूप धारण करतात महिला या सर्वांचा सामना कसा करतात.या विषयी खूपच कमी लिखाण केले गेले आहे.आणि त्यामुळे या संदर्भातील जानही कमी आहे.दुष्काळ पुरुषांवर आणि महिलांवर निश्चितच वेगवेगळा परिणाम करतो.शिवाय दुष्काळची समाज ही वेगळी असते.प्रत्यक्षात ग्रामीण भागातील भटके विमुक्त महिलांच्या जगण्यातील दुष्काळाची भीषणता समजून घेणे आणि दुष्काळाचे महिलांवर होणारे वेगवेगळे परिणाम.त्यापैकी महिलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम ही एक महत्वाची समस्या आहे.दुष्काळा परिस्थिती त्यामध्ये रोजगाराच्या संध्या कमी प्रमाणत पाण्याची टंचाई त्यामुळे ज्या ठिकाणी जसे पाणी भेटेल ते पाणी पिण्यासाठी

वापरले जाते.तशा मध्ये आठवडी बाजार मध्ये पालेभाज्या कमी असल्या तरी महागाई जास्त असल्यामुळे महिलां विकत घेत नाहीत.त्यामुळे पोषक आहार ही कमी प्रमाणात शरीरास मिळतो,दुषित पाण्या मुळे सातत्याने पोटदुखी, जुलाब, उलट्या,शरीराला इजा, सांधे वात,मूत्रपिंडाचे त्रास,असेआजारांना महिलांना सामोरे जावे लागत असल्याचे महिलांनी मुलाखती दरम्यान सांगितले.ग्रामीण भागातील महिला व्यसन करताना दिसतात.व्यसन करण्याची करणे ही वेगळी सांगितली जातात काम लवकर होतात.त्यामुळे भूख पण मरते.पण त्या व्यसना मुळे महिलांच्या अंगातील शक्ती कमी होण्यास मदत होते शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन थकवा जाणवतो अशा वेळी महिला दवखान्यात पण जात नाहीत,सर्व आजार अंगावर काढतात,पाणी टंचाई, घरातील कामाचा ताण, कौटुंबिक हिंसा,या सगळया समस्येमुळे महिलांच्या आरोग्यावर परिणाम होतो,मासिक पाळी मध्ये महिलांना पोट दुखणे,हातापायाला गोळे येणे,असे त्रास होतात,अशा वेळी महिलांना मासिक पाळीच्या वेळी घरातून बाजूला बसावे लागते,दररोजची काम करावी लागतात त्याच बरोबर बाहेरची ही काम करावी लागतात.जनावरांना पाणी पाजणे डोंगराला चरायला घेऊन जाने धुनी-भांडी करणे,फिरस्ती करणाऱ्या महिला दिवस भर आजूबाजूला फिरस्तीला जातात.महिलांना आराम मिळत नाही.सकस आहार मिळत नाही.महिलांच्या शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण ही कमी आहे. महिलांना आरोग्याची माहिती नाही.मासिक पाळीच्या समस्यानवरती महिला उघडपणे बोलत नाहीत.ग्रामीण भागातील महिला मासिक पाळी मध्ये सुती कपडा वापरता.तो कपडा स्वच्छ धुतला जात नाही,आणि सुता कपडा उन्हात वळवला जात नाही.त्यामुळे महिलांच्या गुप्त ठिकाणी इजा असल्याचे ही महिलांनी सांगितले आहे. मासिक

पाळी विषयी अंधश्रद्धा ही मानली जाते.महिलांच्यामध्ये आरोग्याविषयी जनजागृती आणि माहितीचा अभाव असल्याचे दिसून आले.आरोग्या विषयी मुलाखती मध्ये महिलांनी दिलेल्या प्रतिक्रियाची  माहिती खालील तक्ता क्र.६ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता.क्र.६.आपल्या गावात शासकीय आरोग्य केंद्र उलब्ध आहे का ? -**

| **अ.क्र.** | **तपशील** | **उत्तरदात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | १००% | १००% |
| २ | नाही | ० | |
| **एकुण** | | **१२०** | **१००.००%** |

वरील तक्ता क्र.६ मध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार, खटाव तालुक्यातील अभ्यासाठी निवडलेल्या गावांन मध्ये १००% शासकीय आरोग्य केंद असल्याचे महिलांनी सांगितले आहे.

### ५.२.७. असल्यास कोणते ?

खटाव तालुक्यात शासकीय आरोग्य केंद्राची माहिती आणि आकडेवारी खालील तक्ता क्र.७ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता.क्र.७. असल्यास कोणते**

| **अ.क्र.** | **तपशील** | **उत्तरदात्यांची** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|

| | | संख्या | |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक आरोग्य केंद्र | १२० | १००% |
| २ | उपजिल्हा आरोग्य केद्र | | |
| ३ | जिल्हा रुग्णालय | | |
| ४ | खाजगी | | |
| **एकुण** | | **१२०** | **१००.००%** |

वरील तक्ता क्र.७ मधील माहितीनुसार, असे निदर्शनास येते कि, प्राथमिक आरोग्य केंद्रची गावामध्ये सुविधा आहे पण भटक्या-विमुक्त समाजातील महिलांन पर्यंत आरोग्य विषयी माहिती पुरवली जात नाही.व त्यांच्या मध्ये आरोग्य विषयी जनजागृती ही केली जात नाही.

### ५.२.८.आरोग्य केंद्रात उपचार होतो का ?–

खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील महिलांच्या आरोग्य केंद्रातील उपचार होतो कि नाही याविषयी च्या प्रतिक्रिया खालील तक्ता क्र.८ मध्ये दर्शविण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४० | ३३.३३% |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | नाही | ८० | ६६.६७% |
| | **एकुण** | **१२०** | **१००.००%** |

**तक्ता.क्र.८. आरोग्य केंद्रात उपचार होतो का?**

वरील तक्ता क्र.८ मध्ये नोंदविलेल्या प्रतिक्रियांनुसार, खटाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रा मध्ये उपचार विषयी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत .४०% महिला चे मत हे उपचार होतो. असे सांगितले आहे व ६६.६७% महिलांनी उपचार होत नाही असे म्हंटले आहे. याचा अर्थ शासकीय आरोग्य केंद्र मध्ये महिलांनी योग्य ती माहिती मिळत नाही आणि उपचार ही केले जात नाहीत. या सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रा विषयी स्थानिक लोकांशी चर्चा केली असता प्राथमिक आरोग्य केंद्रा मध्ये कोणत्या प्रकारची तत्काळ सेवा पुरवली जात नाही.पेशंटला सातारा घेऊन जावे लागते.रात्रीच्या वेळी डॉ.उपस्थित नसतात नर्स असतात त्यामुळे त्यांना जमेल तेवढाच उपचार केला जातो .जिल्याच्या ठिकाणी पेशंटला शिफ्ट केले जाते.प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये चालणारे उपक्रम हे ग्रामपंचायत ठिकाणी ही घेतले जातात पण त्याची सूचना भटक्या-विमुक्त महिलांच्या वस्ती वरती पुरवली जात नाही असे आढळून आले. याचाच अर्थ, खटाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील होणारे उपक्रमाची माहिती महिलांपर्यंत पोचवणे गरजेचे आहे. महिलांच्या आरोग्याच्यादृष्टीने त्याची जनजागृती करणे महत्वाचे आहे.

### ५.२.९.आपणास कोणते व्यसन आहे का –

संशोधन विषयाची माहिती संकलित करित असताना, खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्य स्थितीचा अभ्यास करताना महिलांना असलेले व्यसन व त्याचे परिणाम या विषयी ही माहिती गोळा करण्यात आली आहे . खालील तक्ता क्र.९ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता.क्र.९.आपणास कोणते व्यसन आहे का ?–**

| **अ.क्र.** | **तपशील** | **उत्तरदात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | मिसरी | ४९ | ४०.८३% |
| २ | तंबाखू | २४ | २०.% |
| ३ | सुपारी | १ | ०.८३% |
| ४ | पान | | |
| ५ | व्यसन नाही | ४६ | ३८.३३% |
| | **एकुण** | **१२०** | **१००.००%** |

वरील तक्ता क्र. ९ मध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार ,खटाव तालुक्यातील भटक्या-विमुक्त महिलांच्या मध्ये व्यसनाचे प्रमाण दर्शवले आहे. ४०% महिला मिसरी घासतात ,२०% महिला तंबाखू खातात,०.८३% महिला सुपारी खातात, आणि ३८% महिला व्यसन करत नाहीत तंबाखू मुले कर्क रोग होतो वस्ती मध्ये कर्क रोग मध्ये छातीचा आणि तोंडाचा कर्क रोगाला बळी पडलेल्या महिलांची ही माहिती इतर महिलांनी दिली.

### ५.२.१० तुमच्या घरी न्हाणीघर व शौचालय आहे का -

खटाव तालुक्यातील पाणी टंचाई चा प्रश्न गंभीरच आहे पण त्याच प्रमाणे महिलांच्या दृष्टीने नान्हीघर व शौचालयचा प्रश्नही महत्वाचा आहे. न्हाणीघर व शौचालय याबाबतच्या प्रतिक्रिया खालील तक्ता क्र.१० मध्ये नोंदविलेल्या आहेत.

**तक्ता.क्र.१०. तुमच्या घरी न्हाणीघर व शौचालय आहे का**

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | न्हाणीघर आहे | ३१ | २५.८३ % |
| २ | शौचालय आहे | | |
| ३ | न्हाणीघर व शौचालय दोन्ही आहे | ६१ | ५०.८३% |
| ४ | दोन्ही ही नाही | २८ | २३.३३% |
| **एकुण** | | **१२०** | **१००.००%** |

वरील तक्ता क्र.१० मध्ये नोंदविलेल्या माहितीवरून असे दिसून आले की, खटाव २५.८३% महिलांना न्हाणीघर आहे. ५०.८३% महिलांकडे शौचालय आणि न्हाणीघर आहे.२३.३३% महिलांच्या घरी शौचालय आणि न्हाणीघर नाही.१/६७% महिला शेजारच्या न्हाणी घरात अंघोळ करतात १७.५०%

महिला कुडाच्या कपड्याचा आडोसा लावून अंघोळ करतात.तर ४.१७% महिला उघड्यावर अंघोळ करतात.२०% महिला सार्वजनिक संडास चा वापर करतात.१.६७%शेजारच्या संडासचा वापर करतात.२६.६७% महिला उघड्यावर शौचास जातात.०.८३% महिला शेतात जातात. सार्वजनिक शौचालय मध्ये पाण्याची व्यवस्था नाही.दरवाजे नाहीत,ग्रामपंचायत कडून ते स्वच्छ केले जात नाहीत.लाईट ची सोय नाही रात्रीच्या वेळी महिला उघड्यावर शौचालयास जातात.घरगुती संडास आहेत पण पाणी नसल्यामुळे महिलांना उघड्यावरच शौचालयास जावे लागते.रात्रीच्या वेळी महिला उघड्यावरच शौचालयास जाताना त्यांना सुरक्षित वाटत नाही.

.

## ५.२.११मासिक पाळीच्या वेळी तुम्हास बाजूस बसावे लागते का ?–

खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील भटके-विमुक्त महिलांच्या मासिक पाळीच्या दरम्यान येणाऱ्या समस्या त्यामुळे महिलांना होणारे त्रास आणि अंधश्रद्धा या संदर्भातील माहितीचा तपशील पुढील तक्ता क्र.११ मध्ये दर्शविली आहे.

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ७५ | ६२.५०% |
| २ | नाही | ४५ | ३७.५० |

| | | | |
|---|---|---|---|
| | **एकुण** | **१२०** | **१००.००%** |

**तक्ता.क्र.११.मासिक पाळीच्या वेळी तुम्हास बाजूला बसावे लागते का ? –**

वरील माहितीवरून असे दिसून येते की,खटाव तालुक्यातील ६२.५०% महिलांना पाळीच्या वेळी बाजूस बसावे लागते. तर ३७.५०% महिलांना पाळीच्या वेळी बाजूस लागत नाही.मासिक वेळी महिलांना घरातील व घराबाहेरील सर्व काम करावी लागतात.७५.८३%महिला पाळीच्या वेळी सुती कपडा वापरतात ११.६७%महिला सॅनिटरि नॅपकीन वापरतात.१२.५०% महिला सॅनिटरि पॅड वापरतात.मासिक पाळीच्या वेळी १६.६७%महिला १ वेळा कपडा बदलतात ३५%महिला २ वेळा कपडा बदलतात. ९.१७% महिला ६ महिने कपडा बदलतात ३९.१७%महिला कपडा बदलत नाहीत.५०%महिला मासिक पाळीच्या वेळी वापरलेला कपडा २ महिने काळा पर्यंत वापरतात.१७.५०% महिला ४ महिने,१४.१७% महिला २ महिने तर ५.८३% महिला यापेक्षा जास्त काळ कड्याचा वापर करतात.पाळीच्या वारलेला कपडा २१.६७% महिला कचरा कुंडीत टाकून देतात.६५.%महिला जाळून टाकतात.१३.३३% महिला वाहत्या पाण्यात टाकून देतात.७४.१७% महिलांना मासिक पाळीच्या वेळी शारीरिक मानसिक त्रास होतो.२५.३३% महिलांना त्रास होत नाही.अशा वेळी २५%महिला सरकारी दवाखान्यात जातात.२७.५०% महिला खाजगी दवाखान्यात जातात१.६७% महिला घरगुती उपचार करतात तर २०% महिला दवाखान्यात जात नाहीत. घरात मध्ये महिलांच्या दवाखान्यावर ४६.६७% महिलांच्या १००ते १००० खर्च

होतो ३०% महिलांच्या १०००ते २००० ७.५०% महिलांच्या २०००ते ३००० हजार होतो १०% महिलांच्या ३०००ते ४००० हजार खर्च होतो.५.८३% महिलांच्या ५००० हजारच्या पुढे खर्च होतो घरामध्ये ३६.६७% पुरुषांच्या दवाखान्यावर १००ते १००० हजार खर्च होतो ४०% २०००ते ३००० खर्च होतो १२.५०% १०००ते २००० खर्च होतो.४.१७% २००० ते ३०००खर्च होतो.तर ६.६७% पुरुषांच्या दवाखान्यावर ५००० च्या पेक्षा जास्त खर्च होतो. तसेच कुटुंबा मध्ये आरोग्य विमा काढणाऱ्या महिलांची संख्या ७.५०% आहे तर ९२.५०% कुटुंबा मध्ये आरोग्य विमा काढलेला नाही. यावरून असे समजते कि कामाचा अतिरिक्त ताण,आहाराचे कमी प्रमाणत आणि निकृष्ट दर्जा,सततचे ताण-तणाव यांचा महिलांच्या आरोग्यावर जास्त दुष्परिणाम होतो हे निश्चित पाठदुखी,कंबरदुखी,सोबत थकवा,चक्कर येणे,भूक न लागणे,अशक्तपणा यासारख्या अनिमियाच्या लक्षणांमध्ये वाढ झाल्याचे लक्षात आले आहे.शिवाय कुणी बोलायला नाही,मार्दर्शन उपलब्ध नाही त्यामुळे आपल्या अडचणी अंगावरच काढण्याचे प्रमाण वाढल्याने दुष्काळात महिलांच्या अनारोग्यात भरच पडल्याचे लक्षात आले.यासंदर्भात बोलत असताना मायणी गावातील एका महिलेने सांगितले “ टेंशन आल्यावर कोणाच्या दारात जायला बंर वाटत नाही.मला टेंशन आलं की मी लांब जाऊन तंबाखू खाते.” मासिक पाळीदरम्यान स्वच्छतेबद्दल बोलत असताना अनेक महिलांनी सांगितले कि,पाण्याअभावी पाळीचे कपडे एकदाच धुवावे लागतात.मासिक पाळी सुरु असताना कामाचा ताण मत कमी होत नाही.आणि त्यामुळे अशक्तपणा जाणवतो.रोजच्या पायपीटीमुळे मासिक पाळीदरम्यान जांघेत आणि योनिमार्गावर फोड आणि खाज येत असल्याचे अनेकजणींनी सांगितले.दररोज

जाणवणाऱ्या छोट्यामोठ्या दुखण्याकडे सर्रासपणे दुर्लक्ष केले जाते.असे यावरून दिसले.वरील सर्व उदाहरणावरून लक्षात येते कि दुष्काळी भागात ज्या पद्धतीने आयुष्य महिला जगत असतात त्या सर्वांचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो. महिलांच्या आरोग्याच्या आणि आरोग्य विषयी शासकीय योनांची माहिती नाही.आरोग्य संदर्भात जनजागृती नाही आणि  अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त प्रमाणात आहे.

**५.२.१२.–पाण्याची स्थिती :**

खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्यस्थितीच्या  अभ्यासाची माहिती संकलित करताना पाणी प्रश्नावर महिलांनी केलेल्या कामाची पडताळणी करण्यात आली आहे दुष्काळामुळे महिलांना येणार्या अडचणी याची सविस्तर माहिती  खालील तक्ता.क्र.१२ मध्ये नोंदविलेल्या आहेत.

**तक्ता.क्र.१२.गावात पाण्याचे स्त्रोत कोण कोणते आहेत?**

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | नदी | | २.५० |
| २ | सार्वजनिक विहीर | ३ | २.५० |
| ३ | शासकीय विहीर | १०० | ८३.३३% |
| ४ | हातपंप | १७ | १४.१७% |
| | **एकुण** | **१२०** | **१००.००%** |

वरील तक्ता क्र.१२ मध्ये दर्शविण्यात आलेल्या प्रतिक्रियांवरून असे दिसून येते की, खटाव तालुक्यातील तालुक्यातील ८३.३३% महिलांचे मत आहे कि गावांन मध्ये शासकीय विहिरीचे पाणी नळकनेक्शन च्या माध्यमातून गावाला पाणी पुरवठा केला जातो. या शासकीय विहिरी पाझर पाण्याच्या नाहीत त्या विहिरी मध्ये येरळ वाडी नदीवरील धरणाचे पाणी उचलून आणले गेले आहे. आणि ते पाणी लोकांना पुरवले जाते. १४.३७% हातपंप चा वापर करतात. तर २.४४% सार्वजनिक विहिरीच्या माध्यमातून पाणी मिळते.

### ५.२.१३.आपणास पिण्याचे पाणी शुद्ध मिळते का?–

खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्य स्थितीच्या अभ्यासाची माहिती संकलित करताना महिलांनी पाणी शुद्धिकरणा विषयी दिलेल्या प्रतिक्रियांची माहिती पुढील तक्ता क्र.१३ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता.क्र.१३ आपणास पिण्याचे पाणी शुद्ध मिळते का?**

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची | टक्केवारी |
|---|---|---|---|

| | | संख्या | |
|---|---|---|---|
| १ | होय | २४ | २०% |
| २ | नाही | ९६ | ८०% |
| **एकुण** | | **१२०** | **१००.००%** |

वरील तक्ता क्र.१३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या माहितीवरून, एकुण १२० महिलांनपैकी २४ म्हणजेच २०% महिलांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळते तर १२० महिलांनपैकी ९६ महिलांनी म्हणजेच ८०% महिलांनी पिण्याचे पाणी शुद्ध मिळत नाही.जे पाणी मिळते ते वापराचे पाणी मिळते. ते ही १५ दिवसातून एकदा मिलते त्यामुळे वापराचे पाणी पण विकास घ्यावे लागते. पिण्याचे पाणी खाजगी टॅकरचे पानी ५० रुपये देऊन विकत घ्यावे लगते. अशी प्रतिक्रिया दिली आहे.२.५०% महिलांना हातपंपाचे पाणी शुद्ध मिळते.१५% महिलांना स्वताचे नळकनेक्शनच्या माध्यमातून पिण्याचे शुद्ध पाणी मिळते. २.५०% महिलांना बोरवेल चे साह्याने पाणी मिळते. शासकीय विहिरी वरती महिलांची भांडणे लागतत .ज्या लोकांच्या स्वतःच्या बोरवेल आहेत.ते लोक पण पाणी देण्यास टाळाटाळ करतात तिथे महिलांना चांगली वागणूक मिळत नाही. १००% महिलांचे मत आहे कि विकत घेतलेले पाणी महिलांना परवडणारे नाही.दररोज ३००ते ४०० रुपये चे पाणी विकत घेणे परवडणारे नाही. कुटुंबा मध्ये सदस्य संख्या जास्त असल्यामुळे एक ब्यालर पानी पुरत नहीं, ग्रामपंचायतीकडून लोकानां पाणी पुरवठा होत नाही. पाण्याच्या योजना ह्या कागदावरच आहेत प्रत्येक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही.

### ५.२.१४ वापरलेले/टाकाऊ  पाणी कोठे टाकता ?–

खटाव तालुक्यातील सांडपाण्याच्या व्यवस्थेची माहिती जाणून घेण्यासाठी विचारलेली माहिती  खालील तक्ता.क्र.१४ मध्ये नोंदविलेल्या आहेत.

**तक्ता.क्र.१४वापरलेले /टाकाऊ पाणी कोठे टाकता ?**

| **अ.क्र.** | **तपशील** | **उत्तरदात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | घराबाहेर | ४९ | ४९.१७ % |
| २ | नाल्यामध्ये | ४३ | ३५.८३% |
| ३ | रस्त्यावर | १४ | ११.६७% |
| ४ | इतर ठिकाणी | ४ | ३.३३% |
| **एकुण** | | | **१००.००%** |

वरील तक्ता.क्र.१४ मध्ये नोंदविलेल्या प्रतिक्रियांवरून असे दिसून येते कि, एकुण १२० महिलांपैकी ४९ महिला म्हणजेच ४९.१७% महिला टाकाऊ पाणी हे घराबाहेर टाकतात ३५.८३% महिला नाल्यामध्ये ११.६७% महिला पाणी रस्त्यावर फेकतात तर ३.३३% महिला पाणी इतर टिकाणी टाकतात.३५% महिलांनी सांगितले कि घराच्या बाहेर नाल्याची व्यवस्था आहे.६२.५०% महिलांनी सांगितले कि घराबाहेर नाल्याची व्यवस्था नाही.९०% महिलांना पाणी पुरवठा व स्वच्छता समितीविषयी माहिती नाही.१०% महिलांना समिती विषयी माहिती आहे.९८.३३% महिलांचे मत आहे कि ग्रामपंचायत कोणत्याच

समितीवर सदस्य म्हणून नाहीत .१.६७% महिला दक्षता समिती आहे.१०.८३% महिलांना शासकीय योजनाविषयी माहिती आहे. ३.३३% महिलांना एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम विषयी माहिती आहे .३.३३% महात्मा गांधी रोजगार हमी योजना विषयी माहिती आहे. १.६७% महिलांना मागेल त्याला शेततळे तर २.५०% महिलांना विशेष घटक योजनेविषयी माहिती असल्याचे सांगितले आहे . ८९.१७% महिलांना शासकीय योजनांची माहिती नाही.९९.१७% महिलांनी पाणी प्रश्नावरती वैक्तिक किंवा गटाच्या सहायाने कोणत्या ही प्रकारची कामे केलेली नाहीत .०.८३ % महिलांनी अंगणात झाडे लावली आहेत. ७.५०% महिलांनी सांगितले कि घरगुती वापरासाठी ५० लिटर पाणी लागते .३६.६७% महिलांनी सांगितले कि ५०ते ६०लितर पाणी वर्प्न्यासाठी लागते .२१.६७% महिलांनी ६०ते ७०लितर पाणी लागते. आणि ३४.१७% महिलांनी १०० लिटरच्या पुढे पाणी लागते असे सांगितले आहे.

याचा अर्थ खटाव तालुक्यातील भटके-विमुक्त महिलांना पाणी व्यवस्थापन विषयी कोणत्या ही प्रकारची माहिती नाही .त्याविषयी महिलांच्या मध्ये जनजागृती नाही.

### ५.२.१५. शासकीय योजना मिळवताना कोण-कोणत्या अडचणी निर्माण होतात -

खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील भटके-विमुक्त महिलांच्या सद्यस्थितीच्या अभ्यासाची माहिती संकलित करित असताना शासकीय

योजनांबाबत महिलांच्या आलेल्या सूचनांच्या प्रतिक्रिया खालील तक्ता.क्र.१५ मध्ये दर्शविल्या आहेत.

**तक्ता.क्र. १५. शासकीय योजना मिळवताना कोण-कोणत्या अडचणी निर्माण होतात**

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कागदपात्रांची पूर्तता | ५३ | ४४.१७% |
| २ | दप्तरी दिरंगाई | ९ | ७.५०% |
| ३ | शैक्षणिक अहर्ता | ३१ | २५.८३% |
| ४ | सुशीराची व अपुरी माहिती | २७ | २२.५०% |
|  | **एकुण** | **१२०** | **१००.००%** |

वरील तक्ता.क्र. १५ मध्ये दर्शविलेल्या प्रतिक्रियांवरून, एकुण १२० महिलांपैकी ५३ म्हणजेच ४४.१७% महिलांनी सांगितले आहे कि शासकीय योजना मिळवताना कागद पात्रांची पूर्तता करताना अडचणी निर्माण होतात. ७.५०% महिलांनी सांगितले कि शासकीय योजना मिळवताना दप्तरी दिरंगाई

केली जाते.२५.८३% महिलांनी सांगितले कि शासकीय योजना मिळवताना शैक्षणिक अहर्ता लागते. २२.५०% महिलांनि सांगितले कि शासकीय योजनांची अपुरी व उशिरा माहिती असल्यामुळे लाभ घेता येत नाही. शासकीय योजनांबाबत काही सूचना आहेत

ज्या महिलांना शासकीय योजना मिळवताना अडचणी आणि पायपीट करावी लागली आहे अशा महिलांनी आणि इतर लोकांनी काही सूचना सुचवल्या आहेत. त्या सूचना खालीलप्रमाणे मांडण्यात आल्या आहेत.

१. शासकीय योजना राबविताना भ्रष्टाचाराचे प्रमाण नष्ट करावे.
२. शासकीय योजनांची माहिती महिलांना लवकर मिळावी म्हणून शासनाने त्या योजनांची जाहिरातबाजी करावी.
३. शासकीय योजनांद्वारे करण्यात येणाऱ्या कामांची तपासणी शासनाच्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांकडून करण्यात यावी त्यामुळे कामाचा दर्जा उत्तम राखला जाईल.
४. शासकीय योजनांतर्गत मिळणाऱ्या अनुदानाची व योजनेविषयी खरी व पुर्ण माहिती लोकांना देण्यात यावी.
५. शासकीय योजनांतर्गत दुष्काळग्रस्त भागातील भटके-विमुक्त महिलांच्या रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.
६. दुष्काळ निर्मुलनासाठी शासनाच्या प्रत्येक कार्यालयातून जनजागृती झाली पाहिजे, महिलांना शेतकऱ्यांना त्याची जाणीव करून दिली पाहिजे.
७. वनविभागाकडून मोठया प्रमाणावर वृक्षांची लागवड केली पाहिजे त्यासाठी पाण्याची सोयही वनविभागाच्या योजनांमधून करण्यात यावी.

व महिलांच्या साठी योजना सुरु करण्यात याव्या.इ अशा प्रकार च्या सूचना खटाव तालुक्यातील महिलां आणि सहभागी लोकांच्या कडून आल्या आहेत

अशा प्रकारे वरीलप्रमाणे प्रश्नावलीच्या सहाय्याने खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील भटके-विमुक्त महिलांच्या सद्य स्थितीच्या अभ्यासाची माहिती संकलित करण्यात आली आहे.

### ५.२.१६ आर्थिक स्थिती :

खटाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील भटके-विमुक्त महिलांच्या सद्यस्थितीच्या अभ्यासाची माहिती संकलित करित असताना.महिलांच्या आर्थिक स्थिती विषयी माहिती संकलित करण्यात आली आहे. महिलांच्या आलेल्या प्रतिक्रिया खालील तक्ता.क्र.१६ मध्ये दर्शविल्या आहेत.

**तक्ता.क्र. १६ आपले रोजगाराची साधने कोण कोणती आहेत**

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नोकरी | २ | १.६७% |
| २ | फिरस्ती | १९ | १५.८३% |
| ३ | घरकाम | १५ | १२.५०% |
| ४ | मोलमजुरी | ६८ | ५६.६७% |
| ५ | व्यवसाय | ३ | २.५०% |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | गृहिणी | १३ | १०.८३% |
| | **एकुण** | **१२०** | **१००.००%** |

वरील तक्ता.क्र. १६ मध्ये दर्शविलेल्या प्रतिक्रियांवरून, एकुण १२० महिलांपैकी २ म्हणजेच १.६७ महिला नोकरी करतात १९ म्हणजेच १५.८३% महिला फिरस्ती ला जातात १२.५०% महिला धुणीभांडी करतात.५६.६७% महिला मोलमजुरी करतात २.५०% महिला स्वतःचा व्यवसाय करतात.१०.८३% महिला गृहिणी आहेत .रोजगारा संदर्भातील अडचणी ह्या वेगवगेळया असल्याचे दिसून आले आहे. ७७.५०% महिलांचे वार्षिक उत्पन्न हे १०००० ते २०००० एवढे आहे .१०.८३% महिलांचे वार्षिक उत्पन्न हे २०००० ते ३०००० एवढे आहे.०.८३% महिलांचे उत्पन्न हे ३०००० ते ४०००० हजार एवढे आहे.६७.५०% महिलांचे मत आहे कि गावात रोजगार उपलब्ध होतो .२१.६७% महिलांना गावात रोजगार उपलब्ध होत नाही.१३.३३% महिलांचे सांगितले कि गावात ३० दिवस काम मिळते. ७.५०% महिलांनी सांगितले आहे कि २० दिवस गावात रोजगार उपलब्ध होतो.२५%महिलांचे मत आहे कि महिन्यातून १५ दिवस काम मिळते.२०.८३% महिलांनी सांगितले आहे कि महिन्यातून ८ दिवस काम उपलब्ध होते.२०%महिलांनी प्रतिक्रिया दिली कि कामाचा मोबदला १०० ते १२५ आहे .मिळतो १६.६७% महिलांनी सांगितले कि १२५ते १५० रुपये रोज मिळतो .२२.५०% महिलांचे मत आहे कि १५०ते २०० रूपे हाजरी मिळते.५.८३% महिलांना २००ते २५० मोबदला मिळतो.५%महिलांना ३०० च्या पुढे हाजरी मिळते.५९.१७ % कमवलेल्या पैसे वापरण्याची परवानगी

आहे.१९/१७%महिलांना कमवलेला पैसा वापरण्याची परवानगी आहे.२०% महिला कमवलेला पैसे नवर्याकडे देतात.७६.६७% महिलांचे स्वतःचे बँकेत खाते आहे.२३.३३%महिलांचे बँकेत खाते नाही ५६.६७%महिला बँकेत स्वतः व्यवहार करतात १७.५०%महिलांचे बँक खाते त्यांचे नवरे करतात.२.५०% घरातीलइतर पुरुष लोक करतात.३०.८३%महिलांनी बचतगटा मधून कर्ज घेतलेले आहे.५.८३%महिलांनी बँकेकडून कर्ज घेतले आहे .५.८३% महिलांनी सावकार कडून कर्ज घेलेले आहे .५%महिलांच्या नावे जमीन आहे ०.८३%महिलाच्या नावे पैसे आहेत.९४.१७% महिलांच्या नावे कोणत्या ही प्रकारची आर्थिक मालमत्ता आहे.११.६७%महिलांना शेती आहे ८८.३३%महिलांना शेती नाही.१०.८३% महिलांना माळरान जमीन आहे.

## ५.२.१७.सामाजिक व् राजकीय परिस्थिति :

खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटक्या-विमुक्त महिलांचा सद्य स्थितीच्या अभ्यासाची माहिती गोळा करताना भटक्या विमुक्त समाजाची सामाजिक परिस्थिती विषयी महिलांची चर्चा करण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थिती आणि त्यामध्ये सामाजिक प्रथांचा पगडा यामुळे महिलांचा सामाजिक विकास झालेला दिसत नाही.जात पंचायती कायद्याने बंध केल्या

असल्या तरी त्या प्रत्येक्षात  समाजात काम करताना दिसतात.काही महिलांनी सांगितले कि समाजात जात पंचायत कायद्याने बंध झाल्यापासून समाजात मुलांच्या लग्नाचा हुंडा पूर्वी ५ ते १० हाजार एवढा होता आत्ता त्याची किंमत ४ लाख ८ लाखात झाली असून लोकांना मुलांच्या विवाहाची काळजी येऊन पडली आहे. मुलांना कर्जबाजारी व्हावे लागत आहे.त्यामध्ये दुष्काळी परिस्थिती रोजगार नाही.मुलांची वेळेत लग्न न झाल्यामुळे समाजात हिंसेचे प्रमाण वाढले आहे. मुलींचा हुंडा घेतला जातो .त्यामुळे मुलीना हिंसेला बळी पडावे लागते. हुंडा ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे जातपंचायत असायला पाहिजे. असे काही महिलांनी सांगितले. जातपंचायतमध्ये महिलांना सहभागी करून घेतले जात नाही पण पोलीस यंत्रणा आम्हाला परवडणारी नाही तिथे ही आमची दाद घेतली जात नाही.याविषयी महिलांनी दिलेल्या माहिती नुसार महिलांच्या प्रतिक्रिया खालील तक्ता क्र १७ .मध्ये दर्शवल्या आहेत.

**तक्ता.क्र. १७. तुमच्या समाजाची जात पंचायत आहे का ?**

| अ.क्र. | तपशील | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ७९ | ६५.८३% |
| २ | नाही | ४१ | ३४.१७% |
| | **एकुण** | **१२०** | **१००.००%** |

वरील तक्ता.क्र. १७ मध्ये दर्शविलेल्या प्रतिक्रियांवरून, एकुण १२० महिलांपैकी ७९ म्हणजेच ६५.८३% महिलांनी सांगितले आहे कि समाजाची जात पंचायत आहे.४१ म्हणजेच ३४.१७% महिलांनी सांगितले कि समाजाची जातपंचायत नाही. ५.८३%महिला जातपंचायत च्या बैठकीस जातात आणि ९४.१७%महिला जात पंचायतच्या बैठकीस जात नाहीत.५.८३% महिला ग्रामपंचायत विषयी माहिती आहे. तर ९४.१७% महिला ग्रामपंचायत विषयी नाही. २१.६७%महिला ग्रामपंचायत मध्ये जातात.७८.३३%महिला ग्रामपंचायत मध्ये जातात नाहीत २१.६७% महिला ग्रामपंचायत मध्ये पाण्याचे अडचणी मांडतात.

याचा अर्थ भटक्या-विमुक्त महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्था विषयी माहिती नाही आणि त्याविषयी जनजागृती ही नाही.

# प्रकरण ६ वे – शिफारशी व सूचना

## <u>शिफारशी</u> :-

खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्य स्थितीचा अभ्यास करत असताना विविध प्रश्नांच्या सहाय्याने व मुलाखत तंत्राने माहितीचे संकलन करत असताना खटाव तालुक्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महिलांच्या परिस्थितीचा अब्यास करत असताना.असे लक्षात येते की,मुळातच सामाजिक,आर्थिक,राजकीय शैक्षणिक सांस्कृतिकदृष्ट्या दुय्यम ,मानल्या गेलेल्या आणि विकासाच्या कोसो दूर परिघाबाहेरच्या पिचल्या गेलेल्या महिलांची दुष्काळामुळे अधिकच ससेहोलपट होते.परिणामी भटके-विमुक्त महिलांच्या विषयी विकासाच्या दृष्टीकोनातून कोणत्या ही प्रकारची शासकीय अंमलबजावणी करताना दिसत नाहीत त्यानुसार लिखाण केले गेले नाही.आज ही ग्रामीण भागात महिलांना सोबत जातीय भेदभाव केला जातो.दुष्काळी

भागातील महिलांच्या वरती फारसे कोणी लिखाण करत नाहीत.पाण्याशी महिलांचा अगदी जवळचा संबंध आहे.त्यामुळे पाणी व्यवस्थापन त्याच्याशी निगडीत योजना ह्या महिलांना विचारात घेऊन केल्या गेल्या पाहिजेत पण प्रत्येक्षात तसे होताना दिसत नाही. या अभ्यासातील सूचना आणि शिफारशी ह्या प्रत्येक्षात महिलाच्या मुलाखती गावपातळीवरील बैठका शासकीय अधिकारी मुलाखती ह्या प्रश्नावलीच्या स्वरूपामध्ये संकलित केली आहे.

१. माहितीचे संकलन करत असताना खटाव तालुक्यातील दुष्काळाची करीत असताना समोर आलेलेली प्रमुख करणे,म्हणजे,झाडे लावलेली नाहीत झाडांचा प्रमाण कमी आहे.जास्त पाण्याची पिके घेतली जातात ऊस लागवडीचे प्रमाण जास्त आहे.पिक पद्धतीत झालेलाल बदल दिसून आले आहेत .
२. खटाव तालुक्यातील मुक्त करण्यासाठी गावोगावी कमी पाण्याची पिके घेणे,झाडे लावणे, स्थानिक स्वराज्य ससंस्थांनी ग्रामसभेत ठरव केले पाहिजेत.त्यामध्ये महिलांचा प्रत्येक्ष सहभाग असला पाहिजे.
३. खटाव तालुक्यातील भटके-विमुक्त शासनाच्या योजनांचा लाभ मिळवत असताना अपुरी व उशिराची माहिती मिळाली असल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे कागदपत्रांची दिरंगाईसुद्धा कारणीभूत आहे.
४. शासकीय योजनांचा लाभ मिळवत असताना मुलाखतीद्वारे असे दिसून आले की, ४४.१७ % लोकांना शासकीय अधिकाऱ्यांकडून कागदपत्रांची पूर्तता मध्ये दिरंगाई होताना दिसते. त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांना लाचही

द्यावी लागते असे निदर्शनास आले.त्याचप्रमाणे जवळजवळ ८९.१७% महिलांना  शासनाच्या योजनांची कोणत्याही प्रकारची माहिती नाही. शासकीय योजनांची जनजागृती झाली पाहिजे..

५. शासकीय योजनांमुळे दुष्काळग्रस्त असलेल्या भटके-विमुक्त महिलांचा प्रश्न सुटताना दिसत नाही,

६. दुष्काळामुळे मुलींच्या उच्च शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. दुष्काळी भागातील भटके-विमुक्त व दुर्लक्षित समाजातील मुलीना मोफत बस-पास मिळाला पाहिजे.

७. दुष्काळी भागातील भटके-विमुक्त सामाजामध्ये मुलींच्य बालविवाहचे प्रमाण वाढलेले आहे ते कमी करण्यासाठी समाजात जनजागृती केली पाहिजे.

८. खटाव तालुक्यातील शासकीय योजनांची अंमलबजावणी करतना त्यामध्ये प्रमुख महिला केंदरीत असल्या पाहिजेत. विशेष भटके-विमुक्त महिलांनचा सहभाग वाढला पाहिजे. शासकीय योजनांच्या नियोजना मध्ये भटके-विमुक्त महिलांचा सहभाग असला पाहिजे. शासकीय योजनांन मधून भटके-विमुक्त महिलांना रोजगार उपलब्ध झाला पाहिजे.

९. खटाव तालुक्यातील ८८.३३% महिला ह्या भूमिहीन असल्याचे दिसून आले आहे.शेती व शेतीबाह्य व्यवसायाचे प्रशिक्षण आणि उपक्रम महिलांच्यासाठी राबवले गेले पाहिजेत.

१०. खटाव तालुक्यातील ८०% महिलांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही.त्यामुळे त्वचा रोग,युरीन स्टोन किडनी स्टोन,सांधे वात जुलाब उलट्या पोट दुखी, केस गळणे असे आजार होतात .त्यामुळे  ज्या

ठिकाणावरून पाणी सोडले जाते त्या ठिकाणीणावरून पाणी फिलटरिंग करूनच सोडले पाहिजे.

११. दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांच्या मध्ये मासिक पाळीला घेऊन अंधश्रद्धा आहेत,१ते २ किमी अंतरावरून पिण्याचे पाणी आणल्यामुळे महिलांना मणक्याचे त्रास होताना दिसत आहे. तसेच महिलांच्या गर्भाशयाला सूज येणे,मासिक पाळी मध्ये अस्वच्छता त्यामुळे महिलांच्या आरोग्यावर सर्वात जास्त परिणाम होताना दिसत आहे.महिलांना मध्ये अनिमियाचे प्रमाण वाढलेले आहे.

१२. भटके-विमुक्त महिलांनच्यामध्ये आरोग्यविषयी माहितीचा अभाव आहे. आरोग्याची जनजागृती करण्याची गरज आहे.

१३. दुष्काळी भागातील महिलांची चळवळ उभी राहिली पाहिजे .योजनांची कोनट्रॅकची पद्धत बंद केली पाहिजे,प्रत्येक्षात लोकांनी त्याची अंमलबजावणी केली पाहिजे.

१४. खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त एकूण ४१ म्हणजेच ३४.१७% महिलांनी १०० लिटर पाणी वापरासाठी लागते असे म्हंटले आहे. ६२.५०% महिलांनी घराबाहेर नाल्याची व्यवस्था नाही ४९.१७% महिला वापरलेले पाणी घराबाहेर टाकून देतात तर ११.६७% महिला रस्त्यावर पाणी फेकून देतात .सांडपाण्याची व्यवस्था केली पाहिजे,

१५. वापरलेले पाणी जमिनीत मुरवले पाहिजे.त्यासाठी उपाय योजना केल्या पाहिजेत सांडपाण्याची व्यवस्था करून पुन्हा सांडपाणी शेती

,व्यवसाय ,आणि झाडे लावण्यासाठी केला पाहिजे  पाहिजे विशेष महिलांनच्यामध्ये जनजागृती केली पाहिजे.

१६. बोरवेल,विहिरी धरण तलाव यांचे पुनर्भरण झाले पाहिजे,जमिनीत पाण्याचा साठा वाढला पाहिजे त्यासाठी जनजागृती केली पाहिजे. ही पाणी व्यवस्थापनाची कामे .पारंपारिक पद्धतीने केली जाऊ शकतात.

१७. पडलेल्या पाण्याची व्यवस्थापन केले पाहिजे .पाण्याचे समान वाटप केले पाहिजे भूमिहीन लोकांना त्यांच्या वाट्याचे पाणी मिळाले पाहिजे,ते पाणी विकून ते स्वत:चा उदरनिर्वाह करतील किंवा व्यवसाय उभा करतील त्यामुळे भटके-विमुक्त लोकांचे स्थलांतर थांबेल. त्यांच्यात विकास होइल.

१८. ९९.१७% महिलांना पाणी व्यवस्थापन विषयी कोणतेही वैक्तिक किवा गटाच्या माध्यमातून केलेली नाहीत.कारण त्यांना पाणी व्यवस्थापन याविषयी कोणत्या ही प्रकारची माहिती नाही.त्यांच्यात जागृती करण्याची गरज आहे.

१९. महिलांच्या मध्ये मानसिक ताणताणावाचे प्रमाण वाढलेले आहे.त्यामुळे महिलांच्या मध्ये व्यसनाचे प्रमाण वाढले असल्यामुळे महिलांच्या आरोग्य धोक्यात आहे  मानसिक आरोग्यावर काम केले पाहिजे.

## सूचना :-

१. सर्व योजनांचा फायदा हा भटके विमुक्त महिलांच्या पर्यंत झाला पाहिजे.
२. योजनांचा लाभ मिळवताना होणारी दिरंगाई कमी झाली पाहिजे.
३. प्रत्येक लाभार्थ्यास असणारे नियम व आटी समान असायला हव्यात.
४. शासकीय योजना ह्या ,महिला केंद्रित असल्या पाहिजेत.
५. स्थलांतरामुळे महिलांमध्ये असुरक्षितेची जाणीव बळावते,बालविवाहाचे प्रमाण वाढते त्यामुळे ,गावामध्ये रोजगार उपलब्ध करून दिला ,पाहिजे भटक्या-विमुक्त महिलांच्यासाठी आरोग्याचे उपक्रम राबवले पाहिजेत.
६. महिलांना कामाच्या वेळेनुसार कामाचा मोबदला मिळाला पाहिजे.
७. पाण्यासाठी महिलांची पायपीट होती ती थांबवण्यासाठी गावपातळीवरील पाणी व्यवस्थापनची कामे सुरु केली पाहिजेत,त्यामध्ये महिलांना सहभागी केले पाहिजे.त्यातून लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. महात्मा गांधी रोजगार हमीची कामे भटक्या-विमुक्त महिलांना मिळाली पाहिजे त्याची जनजागृती महिलांच्या मध्ये झाली पाहिजे.
८. पाणी फौंडेशन मध्ये गावांनी भाग घेतला पाहिजे.
९. भटक्या विमुक्त महिलांना पाणी व्यवस्थापनाची प्रशिक्षणे दिली.पाहिजे

# प्रकरण ७ वे – निष्कर्ष

खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके विमुक्त महिलांचा सद्य स्थितीचा अभ्यास करताना त्यातील निवडक उद्देशाचा अभ्यास केला आहे.

**उद्देश -**

१. दुष्काळाची सद्यस्थिती समजून घेणे .

२. दुष्काळामुळे महिलांवर होणारे परिणाम.

३. दुष्काळामुळे महिलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम.

४. दुष्काळ निवारण्यासाठी महिलांनी केलेले प्रयत्न पडताळून पाहणे.

खटाव तालुक्यातील भटकेविमुक्त महिलांचा सद्य स्थितीचा अभ्यास करताना विविध प्रश्नांच्या माध्यमातून खटाव तालुक्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महिलांच्या परिस्थीचा अभ्यास करत असताना लक्षात आले कि, मुळातच सामाजिक,आर्थिक,राजकीय शैक्षणिक सांस्कृतिकदृष्ट्या दुय्यम मानल्या गेलेल्या महिलांची दुष्काळामुळे अधिकच ससेहोलपट होते परिणामी.

अतिरिक्त कामाचा ताण येतो.मुलींच्या बाबतीत याचा परिणाम म्हणून त्यांची शाळा बंध होते. रोजगाराच्या वेळा आणि मोबदला या संदर्भातील अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.स्थलांतरामुळे महिलांमध्ये असुरक्षितेचे जाणीव होते,त्यामुळे बालविवाह प्रमाण वाढते.अगोदरच समाजमान्य असणाऱ्या कौटुंबिक हिंसेमध्ये वाढ होते.पुरेसा आणि पोषक आहार न मिळाल्यामुळे आरोग्याच्या तक्रारी वाढतात.आरोग्याकडे वारंवार दुर्लक्ष केल्याने साधेसाधे आजारही बर्याचदा उग्र स्वरूप धारण करतात असे दिसून आले .

वरीलखेरीज महिलांची कामाच्या ठिकाणी होणारी पिळवणूक व असमान वेतन यामुळेही महिलांचे खच्चीकरण होते,हा मुद्दा महिलांच्या श्रीमानां किंमत न देणारा असयाचे दिसते.दुष्काळामुळे कुटुंबाची घडी बदलते,गावाचा पोट बदलतो,राजकीय समीकरणे बदलतात,राज्याच्या अर्थकारणात बदल होतो.बदल होत नाही तो महिलांच्यास्थितीत. किंबहुना जातीयव्यवस्था,वर्गव्यवस्था आणि पितृसत्ता यामुळे स्त्रियांची परिस्थिती अधिकच बिकट होत जाते.या संदर्भात समोर ठेऊन दुष्काळी भागातील स्थैर्याबाबत किंवा उपाय योजनाबाबत पाऊल उचलले गेले पाहिजे. अशा प्रकारे भटके-विमुक्त महिलांची परिस्थिती आटोक्यात आण्यासाठी दिलेल्या शिफारशी आणि सुचानन वरती काम केले पाहिजे.

अशा प्रकारे खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांच्या सद्यस्थिती या विषयाचा अभ्यास करून वरील निष्कर्षापर्यंत आलेली आहे.

# **संदर्भ**

१. अर्थसंवाद त्रैमासिक – ऑक्टोंबर – डिसेंबर २०१५,

२. ग्रामीण अर्थव्यवस्था विशेषांक – अर्थसंवाद त्रैमासिक – एप्रिल – जून २०१५

३. शेतकऱ्यांसाठीच्या शासकीय अर्थसहाय्याच्या व अन्य विविध योजना-(लेखक)-मनोज आवळे

४. योजना – मासिक – जल महात्म्य – जुलै- २०१४, २०१६ इ.

५. लोकराज्य – मासिक – वेध पावसाचा - मे, जून, जुलै २०१३, २०१४, २०१५, २०१६ इ.

६. तुकाराम जाधव, ‘महाराष्ट्रातील दुष्काळ’ महाराष्ट्र वार्षिकी -२०१२.

७. शांताराम बोकील, ‘ महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी’ अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर.

८. प्रा.नारायण काळे, महाराष्ट्रातील पाणी प्रश्न- अभ्यास व जलसंधारण

९. दैनिक सकाळ, ‘दुष्काळाच्या ग्लोबल झळा’.

१०. डॉ.एस. जी. शिंदे, डॉ. बी.डी.खेडकर, महाराष्ट्रातील जलसिंचन धोरण वाणिज्य विद्या जाने.-मार्च-२०१

११.पर्यायी नितीविकास .भारत पाटणकर

**वेबसाईट-**

१. zpsatara.gov.in २. पाणी फौंडेशन

३.www.drought.gov.    ४. mahaegs.maharashtra.gov.in.

# प्रश्नावली

**संशोधन विषयाचे नाव** - सातारा जिल्यामध्ये खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील भटके-विमुक्त महिलांचा सद्य स्थितीचा अभ्यास.

**संशोधकाचे नाव** - शैला यादव

**उतारदात्याचे नाव** - ................................................................ गावाचे नाव- ...............................................

तालुका- ..................................... जिल्हा - ............................... प्रश्नावली क्रमांक ..............................................

**वैक्तिक माहिती**

१) माहिती देणाऱ्या महिलेचे संपूर्ण नाव :

२) संपूर्ण पत्ता :

३) संपर्क क्रमांक :

४) वय :

५) धर्म:    जात :    पोटजात :

६) तुमचे शिक्षण झाले आहे का ?

१) होय    २) नाही

७) होय असल्यास किती ?

१) प्राथमिक    २) माध्यमिक    ३) उच्च माध्यमिक    4) इतर

८) तुम्ही विवाहित आहात का?

१) विवाहित    २) अविवाहित    ३) विधवा    ४) परितक्त्या

५) घटस्पोटीत

९) तुमचे लग्न कोणत्या वर्षी झाले?

१) १५    २) १६    ३) १७    ४) १८    ५) १९ वर्षा नंतर

**ब) कौटुंबिक माहिती:**

| अ.क्र | कुटुंबांतील सदस्यांची नावे | लिंग | नाते | वय | शिक्षण | मुख्य व्यवसाय | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |
| ७ | | | | | | | |
| ८ | | | | | | | |
| ९ | | | | | | | |
| १० | | | | | | | |

१०) आपणाकडे रेशन कार्ड आहे का ?

१) होय    २) नाही

११) असल्यास कोणत्या प्रकारचे?

१) पिवळे        २) केशरी            ३) पांढरे  ४) इतर

१२)    कुटुंबाचा प्रकार ?

१) संयुक्त        २) विभक्त

**शैक्षणिक :**

१३)    आपल्या गावात शैक्षणिक सुविधा आहे का?

१) होय            २) नाही

१४)    होय असल्यास कितीवी पर्यंत?

१) प्राथमिक   २) माध्यमिक    ३) उच्च माध्यमिक    ४) महाविधायलय
५) इतर

१५)    तुमची मुल सद्या शाळेमध्ये दाखल केली आहेत का?

१) होय                 २) नाही

१६)    नाही असेल तर त्याचे कारण?

१) स्थलांतर  २) आर्थिक परीस्थित   ३) शाळेची आवड नाही   ४) इतर

१७)    शिक्षणासाठी येणारा वार्षिक खर्च किती?
१) १००० ते ५०००   २) ५००० ते १००००  ३) १०००० च्या पुढे

१८)    भटक्या जाती जमातीमधील मुलांसाठी गावाजवळ आश्रम शाळा आहे का?

१) होय २) नाही

१९) शिक्षणाबाबत तुमचे मत काय आहे ?

........................................................................................
........................................................................................
......................................................................

**आरोग्य :**

२०) आपल्या गावात शासकीय आरोग्य केंद्र उपलब्ध आहे का ?

१) होय २) नाही

२१) जर असेल, तर कोणते ?

१) प्राथमिक आरोग्य केंद्र २) उपजिल्हा आरोग्य केंद्र ३) जिल्हा रुग्णालय ४) खाजगी

२२) नसेल तर गावापासून किती अंतरावर आहे?

........................................................................................
...................................

२३) आरोग्य केंद्रात उपचार होतो का?

१) होय २) नाही

२४) आपणास कोणते व्यसन आहे का?

१) मिसरी २) तंबाखू ३) सुपारी ४) पान ५) इतर

२५)    तुमच्या घरी शौचालय व न्हाणीघर आहे का?

१) न्हाणीघर आहे  २) शौचालय आहे ३) न्हाणीघर व शौचालय दोन्ही आहे ४) दोन्ही हि नाही

२६)    न्हाणी घर नसेल तर अंघोळ कोठे करता?

१) शेजारच्या घरी  २) कुडाच्या कपड्याच्या आडोसा लावून  ३) उघड्यावर ४) इतर

२७)    तुम्ही शौचालयास कोठे जाता?

१) सार्वजनिक संडास २) शेजारच्या संडास मध्ये ३) उघड्यावर  ४) शेतात  ५) इतर

२८)    तुम्ही उघड्यावर संडासला जात असाल तर तुम्हाला सुरक्षित वाटते का?

१) होय        २) नाही

२९)    मासिक पाळीच्या वेळी बाजूला बसावे लागते का ?

१) होय २) नाही

३०) पाळीच्या दिवसात तुम्ही घरातील / घराबाहेरील कोणकोणती कामे करता?

.............................................................................................
.............................................................................................
...........................................................................

३१) मासिक पाळीच्या वेळी तुम्ही काय वापरता ?

१) सुती कपडा २) सॅनिटरि नॅपकिन ३) सॅनिटरि पॅड ४) इतर

३२) मासिक पाळीच्या वेळी आपण कितीवेळा कपडा बदलता ?

१) १ वेळा २) २ वेळा ३) ३ वेळा ४) बदलत नाही

३३) बदलत नसल्यास त्याची करणे काय?

.............................................................................................
.............................................................................................
..........................................................................

३४) मासिक पाळीच्या वेळी वापरत असलेला कपडा किती काळ वापरता ?

१) २ महिने  २) ४ महिने  ३) ६ महिने ४) यापेक्षा जास्त

३५) पाळीच्या वेळी वापरलेला सुती कपडा/ सॅनिटरि पॅड/ सॅनिटरि नॅपकिन यांची विल्हेवाट कोठे लावता?

१) कचरा कुंडीत टाकून देता २) जाळून टाकता ३) व्हत्या पाण्यात फेकून देता ४) इतर

३६) पाळीच्या वेळी तुम्हाला कोणता त्रास होतो का?
१) होय  २) नाही

३७) होत असल्यास कोणत्या प्रकारचा ?
..............................................................................................
..............................................................................................
............................................................................

३८) त्यावेळी आपण कोणत्या दवाखान्यात जाता?

१) सरकारी २) खाजगी ३) घरगुती उपचार करता ४) वैदुकडे ५) इतर ६) दवाखान्यात जात नाही.

३९) दवाखान्यात आपणास कशी वागणूक मिळते?

......................................................................................................
......................................................................................................
..................................................................................

४०) घरा मध्ये महिलांच्या दवाखान्यावर किती खर्च होतो?

१) १०० ते ५०० २) ५०० ते १००० ३) १००० ते १५०० ४) २००० च्या पुढे

४१) घरामध्ये पुरुषांच्या दवाखान्यावर किती खर्च होतो?

१) १०० ते ५०० २) ५०० ते १००० ३) १००० ते १५०० ४) २००० च्या पुढे

४२) कुटुंबामध्ये आरोग्य विमा काढला आहे का ?

१) होय २) नाही

४३) होय असल्यास कोणत्या प्रकारचा?

..................................................................................................
..................................................................................................
..................................................................................

**पाण्याची सद्यस्थिती व शासकीय योजना:**

४४) गावात पाण्याचे स्त्रोत कोण-कोणते आहेत?

१) नदी २) तलाव ३) सार्वजनिक विहीर ४) हातपंप ५) बोरवेल ६) शासकीय विहीर ७)

४५) आपणास पिण्याचे पाणी शुद्ध मिळते का ?

१) होय २) नाही

४६) मिळत असल्यास कोणकोणत्या साधनांच्या माध्यमातून मिळते ?

१) हातपंप २) सार्वजनिक नळ ३) सार्वजनिक विहीर ४) स्वताचे नळ कनेक्शन
५) बोरवेल ६) इतर

४७) मिळालेले पाणी शुद्ध असते का ?

१) होय २) नाही

४८) नसल्यास आपण त्यावर काय उपाय करता ?

.................................................................................................
.................................................................................................
...............................................................................

४९) घरगुती वापरासाठी आपणास किती लिटर पाणी लागते?

१) ५० लिटर पेक्षा कमी २) ५० ते ६० लिटर ३) ६० ते ७० लिटर ४) १०० लिटरच्या पुढे

५०) तुम्हाला मिळणारे पाणी मोफत मिळते का ?

१) होय २) नाही

५१) नसल्यास किती पैसे देऊन पाणी विकत घेता?

......................................................................................................
......................................................................................................
...................................................................................

५२) विकत घेतलेले पाणी तुम्हाला परवडणारे आहे का ?

१) होय २)नाही

५३) अशुद्ध पाण्यामुळे कोणते आजार होतात?

......................................................................................................
......................................................................................................
.....................................................................................

५४) पिण्याचे पाणी ज्या ठिकाणा वरून आणता तिथे तुम्हाला कशी वागणूक मिळते?

......................................................................................................
......................................................................................................
.....................................................................................

५५) तुमच्या घरापासून तुम्ही किती अंतरावरून पाणी आणता ?

......................................................................................................
......................................................................................................
.....................................................................................

५६) वापरलेले/ टाकाऊ पाणी कुठे टाकता ?

१) घराबाहेर २) नाल्यामध्ये ३) रस्त्यावर ४) इतर ठिकाणी

५७) घराबाहेर नाल्याची सुविधा आहे का ?

१) होय २) नाही

५७) वापरलेल्या पाण्यापासून वैक्तिक पातळीवर आपण काही उपाय योजना केल्या आहेत का?

..............................................................................................
..............................................................................................
..............................................................................

५८) पाणी टंचाई मुळे आपणास कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते ?

..............................................................................................
..............................................................................................
..............................................................................

५९) पाणी प्रश्नावर आपण वैक्तिक किंवा गटाच्या माध्यमातून कोणते उपाय केले आहेत का ?

१) होय २) नाही

६०) असल्यास कोणत्या प्रकारचे ?

..............................................................................................
..............................................................................................
..............................................................................

६१) आपणास पाणी पुरवठा व स्वच्छता समिती विषयी माहिती आहे का ?

१) होय २) नाही

६२) आपण ग्रामपंचायतच्या कोणत्या समितीवर सदस्य म्हणून आहेत का ?

१) होय २) नाही

६३) असल्यास कोणत्या ?

१) पाणी पुरवठा व स्वच्छता व्यवस्थापन समिती २) आरोग्य समिती ३) शाळा व्यवस्थापन समिती ४) महिला दक्षता समिती ५) इतर

६४) आपणास शासकीय योजनांविषयी माहिती आहे का ?

१) होय २) नाही

६५) होय असल्यास कोणत्या?

१) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम २) महात्मा गांधी रोजगार हमी योजना

३) मागेल त्याला शेततळे योजना ४) विशेष घटक योजना

५) सुधारित राष्ट्रीय कृषी पीक विमा योजना. ६) इतर

६६ ) शासकीय योजना मिळवताना कोणत्या समस्या निर्माण होतात ?

१) कागदपत्रांची पुर्तता २) दप्तरी दिरंगाई ३) शैक्षणिक अर्हता ४) उशिराची व अपुरी माहिती

६७ शासकीय योजनांच्या अंमलबजावणीमुळे गावातील पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे का?

१) होय २) नाही

६८) शासकीय योजनांमध्ये आपल्या काही सूचना आहेत का ?

........................................................................................................
........................................................................................................
........................................................................................................
.............................

**आर्थिक,स्थिती**

६९) आपले रोजगाराचे साधन कोणते आहे?

१) नोकरी २) फिरस्ती ३) घरकाम ४) मोलमजुरी ५) व्यवसाय ६) गृहिणी ७) इतर

७०) तुमच्या व्यवसायातून तुम्हाला मिळणारे वार्षिक उत्पन्न किती आहे?

१) १०००० ते २०००० २) २००००१ ते ३०००० ३) ३००००१ ते ४०००० ४) ५०००० च्या पुढे

७१) गावामध्ये रोजगार उपलब्ध होतो का?

१) होय २) नाही

७२) होत असल्यास किती कालावधीसाठी ?

१) ३० दिवस २) २० दिवस ३) १५ दिवस ४) ८ दिवस

७३) मजुरी किती मिळते?

१) १०० ते १२५ २) १२५ ते ते १५० ३) १५० ते २०० ४) २०० ते २५० ५) ३०० च्या पुढे

७४) आपण कमवलेला पैसा स्वताला वापरण्याची परवानगी आहे का ?

१) होय २) नाही

७५) नसल्यास आपण पैसे कोणाकडे देता ?

१) स्वता: कडे ठेवता २) नवरा ३) सासू ४) सासरे ५) इतर

७६) बँकेत स्वताच्या नावाचे खाते आहे का ?

१) होय २) नाही

७७) बँकेचे व्यवहार कोण करतो ?

१) स्वतः २) नवरा ३) सासू ४) सासरे ५) इतर

७८) आपण कोणत्या प्रकारचे कर्ज घेतले आहे का ?

१) होय २) नाही

७९) होय असल्यास कोणाकडून ?

१) बँकेकडून २) सावकार ३) बचत गट ४) इतर

८०) कर्जाची परतफेड कशी करत आहात ?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................८१) तुमच्या नववार कोणत्या प्रकारची मालमत्ता आहे का ?

१) जमीन २) घर ३) दागिने ४) पैसे ५) इतर \

८२) तुम्हला शेती आहे का :

१) होय २) नाही

८३) असल्यास कोणत्या प्रकारची

१) बागायती २) जिरायती ३) कोरडवाहू ४) माळरान

**सामाजिक व राजकीय परिस्थिती :**

८४) तुमच्या समाजाची जातपंचायत आहे का ?

१) होय २) नाही

८५) होय असल्यास तुम्ही त्या बैठकीला जाता का ?

१) होय २) नाही

८६) जातपंचायत विषयी आपले मत काय आहे ?

.................................................................................................
.................................................................................................
.................................................................................

८७) ग्रामपंचायत विषयी आपणास माहिती आहे का ?

१) होय २) नाही

८८) आपण ग्रामपंचायतमध्ये जाता का ?

१) होय २) नाही

८९) आपण ग्रामसभेस गेला आहात का ?

१) होय २) नाही

९०) होय, असल्यास कोणते मुद्दे मांडता ?

.................................................................................................
.................................................................................................
.................................................................................